म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणे.
विषय ........धा.वा........
दा. क्र. ३९५२

अनन्त शुक्ल

# राजवट

IRBK-0103152
IRBK-0103152

केशव भिकाजी ढवळे
श्रीसमर्थ-सदन
गिरगांव, मुंबई

* ६३ *

मूल्य तीन रुपये

सदाशिव अनन्त शुक्ल

# नवी राजवट

IRBK-0103152
IRBK-0103152

केशव भिकाजी ढवळे
गिरगांव, मुंबई
* ६२ *

मूल्य तीन रुपये

सर्वाधिकार
सुरक्षित

पहिली आवृत्ति
नोव्हेंबर, १९४९

मुद्रक : श्री. मा. दळवी,
कल्पना प्रिंटिंग प्रेस
भवानी शंकर रोड
दादर, मुंबई १४

प्रकाशक : के. भि. ढवळे
श्री समर्थ-सदन
बनाम हॉल लेन
गिरगांव, मुंबई ४

[illegible] अमेरिकन लेखक जॉन स्टाइनबेक ह्यांनीं लिहिलेल्या ‘ द मून इज् डाऊन ’ ह्या अत्यंत लोकप्रिय कादंबरीचा हा कांहींसा स्वैर असा अनुवाद आहे.

इंग्लंड–अमेरिकेमध्यें गेल्या जागतिक महायुद्धाच्या पार्श्वभूमीवर लिहिलेल्या बऱ्याच कादंबऱ्या प्रसिद्ध झाल्या आहेत. त्यांमध्यें ‘ द मून इज् डाऊन ’ ह्या कादंबरीला कला व प्रचार अशा दोन्ही दृष्टींनीं पाश्चात्य वाङ्मयामध्यें उच्च स्थान प्राप्त झालें आहे. १९४२ च्या जून महिन्यांत ही कादंबरी प्रथम प्रसिद्ध झाली. आणि अल्पावधींतच हिच्या लक्षावधि प्रति खपून लागोपाठ चार आवृत्त्या निघाल्या. जगांतल्या अनेक भाषांत हिचें भाषान्तरही झालें. ‘ ट्वेंटिएथ् सेंचरी फॉक्स्’ ह्या जगद्विख्यात सिनेमा–कंपनीनें प्रस्तुत कादंबरीच्या कथानकाधारें तयार केलेला बोलपटही उत्तम प्रकारें सर्वत्र गाजला आहे.

एकाद्या जुलमी हुकुमशहानें एकादा स्वतंत्र देश जबरदस्तीनें जिंकून कांहीं काळ आपल्या वर्चस्वाखालीं आणला तरी, तो तसाच चिरकाल पारतंत्र्यांत ठेवणें त्याला कालत्रयीं शक्य नसतें. स्वातंत्र्याचा उपभोग घेतलेले स्वाभिमानी लोक हीन दास्यवृत्तीचा

स्वीकार करून परक्या सत्तेखालीं सुखा-समाधानानें नांदणें कधींच शक्य नाहीं. एक ना एक दिवस प्रचंड राष्ट्रीय आंदोलन निर्माण करून ती परकी सत्ता ते लोक निर्धारानें उलथून पाडल्याशिवाय खास राहाणार नाहींत. शिवाय, दैवी आत्मिक बल शस्त्रास्त्रांच्या आसुरी बळाला अखंड अजिंक्यच असतें. अशा प्रकारच्या त्रिकालाबाधित व्यापक सिद्धान्तांवर आणि स्फूर्तिदायक तत्त्वांवर प्रस्तुत कादंबरीचें कथानक उभारण्यांत आलेलें असल्यानें कोणत्याही देश-काल-परिस्थितींत तें अत्यंत उद्‌बोधकच ठरेल ह्यांत शंका नाहीं.

विषयाच्या नाविन्यामुळें आणि जिव्हाळ्याच्या कथनपद्धतीमुळें, पात्रांच्या नांवांचा परकेपणा मुळींच न जाणवतां ही 'नवी राजवट' वाचकांना आल्हाद्कारक वाटेल अशी मला आशा आहे.

सदाशीव अनन्त शुक्ल

# नवी राजवट

## १

समुद्रकांठीं बंदराची सोय असलेला तो एक लहानसा गाव होता. तिथली मूळ वस्ती मच्छीमारी लोकांची. पण कांहीं वर्षांपूर्वीं गांवानजीकच कोळशाची खाण सांपडल्यामुळें साहजिकच लोकवस्ती वाढून त्या गांवाला छोट्याशा शहराचें स्वरूप आलेलें होतें.

गांवचे लोक कष्टाळू, स्वावलंबी आणि निरुपद्रवी होते. त्यांच्यांत एक प्रकारचें स्वातंत्र्याचें वारें खेळत असल्यानें दास्यसुलभ हीन मनोवृत्तीनें त्यांना पछाडलेलें नव्हतें. महायुद्ध सुरू होतें तरी त्याची झळ कधीं काळीं आपणाला लागेल अशी त्यांना स्वप्नांतही कल्पना नव्हती. तिथली राज्यव्यवस्था लोकमतानुवर्ती असून मतदारसंघही आपलें निवडणुकीचें कार्य जबाबदारीनें करीत असे. आणि लोकनियुक्त अधिकारीही तितक्याच जबाबदारीनें सारा कारभार पाहात असत. क्षुद्र, संकुचित प्रवृत्तींना तेथें थाराच नव्हता.

लहानसें संरक्षक दल, त्यावरील एक दोन अधिकारी आणि परप्रांतीय दळणवळणासाठीं पोस्ट-टेलिग्राफ ऑफिसचा मास्तर हे सर्व जबाबदार लोक मुख्य मेयरच्या सल्ल्यानें आणि सहकार्यानें आपापले अधिकार चालवीत.

* * *

तो रविवारचा दिवस होता. त्या दिवशीं ...

....पावणे अकराच्या सुमारास सारा मामला खलास झाला. गांवाचा ताबा घेतला गेला, प्रतिकारकांचा पाडाव झाला आणि लढाई संपली! एखाद्या जंगी मोहिमेप्रमाणेंच त्या छोट्या मोहिमेचीही पूर्वतयारी शत्रूनें अतिशय काळजीपूर्वक केली होती. त्या दिवशीं रविवार म्हणून गांवचा मुख्य पोलीस अधिकारी व पोस्टमास्तर, दोघेही सकाळींच मजेनें मासे धरायला गेले होते. मि. कोरेल नांवाच्या एका लोकप्रिय वखारवाल्यानें आपली छोटी होडी त्या दिवसापुरती त्यांना खुषीनें दिली होती. पण समुद्रांत दूरवर गेल्यानंतर बंदराच्या रोखानें संथपणें जाणारें एक फौजी जहाज त्यांना लांबून दिसलें आणि स्वतःवरची जबाबदारी ओळखून ते तसेच तांतडीनें परत फिरले. पण ते बंदरावर पोंचण्याच्या आधींच बंदराचा ताबा शत्रूनें संपूर्णपणें घेतला होता. टाऊन हॉलमधील आपापल्या ऑफिसांतही प्रवेश करायला त्या दोघांना मज्जाव झाला. इतकेंच नव्हे तर त्या बाबतींत ते आपला हक्क बजावूं लागतांच त्यांना तत्काळ गिरफदार करण्यांत येऊन युद्धकैदी म्हणून गांवच्या तुरुंगांत डांबून टाकण्यांत आलें!

गांवाचें संरक्षण करणारे स्थानिक शिपाई अवघे बारा! पण तेही त्यावेळीं गांवांत नव्हते. गांवापासून सहा मैलांवर असलेल्या आपल्या मालकीच्या रम्य वनराईंत वखारवाल्या मि. कोरेलनींच त्यांच्यासाठीं निशाणबाजीच्या चढाओढीचा, बक्षिसांचा, खाण्यापिण्याचा वगैरे भरगच्च कार्यक्रम त्या दिवशींच ठेवला होता. आणि त्यांत भाग घेण्यासाठीं ते सारेजण सकाळीं उजाडतांच तिकडे निघून गेले होते. पण विमानांची घरघर ऐकूं येतांच आणि त्या विमानांतून दूर अंतरावर छत्रीधारी सैनिकही उतरत असल्याचें दिसतांच ते बिचारे धापा टाकीतच गांवाकडे धांवून आले. पण येऊन पाहातात तों काय! शत्रूच्या मशीनगन्स्नीं सर्व रस्ते रोखून धरलेले! पराभवाचा तर नाहींच पण युद्धाचाही अजून कधीं अनुभव नसलेल्या त्या गबाळ्या पोशाखाच्या राकट शिपायांनीं एकदम बंदुकांच्या फैरी झाडायला प्रारंभ केला. पण क्षणभरच मशीनगन्स्चा धडधडाट झाला नि तत्काळ, बारांपैकीं सहाजण जागच्या जागीं ठार झाले! तिघे अर्धमेले होऊन विव्हळत पडले आणि उरलेल्या तिघांनीं बंदुकांसकट पळ काढून जवळच्या टेकडीचा आश्रय घेतला!

साडे दहा वाजतां शत्रूच्या पितळी बॅण्डचें सुस्वर संगीत बाजार–चौकांत सुरू झालें. तें ऐकायला सारे गांवकरी गोळा झाले आणि राखी रंगाचें शिरस्त्राण चढवून हातांत छोट्या मशीनगन्स् घेऊन फिरणाऱ्या सैनिकांकडे आ वासून पाहातच राहिले.

दहा अडतीसला, मेलेल्या सहा शिपायांना पुरण्यांत आलें. पॅराशूट गुंडाळून ठेवले गेले आणि मि. कोरेल ह्यांच्याच वखारींत तळ ठोकण्यासाठीं शत्रूची तुकडी रवाना झाली. वखारींत सैनिकांसाठीं भरपूर खाटांची व घोंगड्यांची तरतूद आधींच करून ठेवण्यांत आली होती.

दहा पंचेचाळीसला, शत्रुसैन्याचे मुख्य अधिकारी कर्नल लान्सर बरोब्बर अकरा वाजतां मुलाखतीला येणार असल्याचा औपचारिक विनंतीवजा निरोप गांवचे वयोवृद्ध मेयर मि. ऑर्डेन ह्यांना त्यांच्या वाड्यावर मिळाला.

मेयरसाहेबांचा दुमजली वाडा शहरच्या एका टोकाला लहानशा टेकाडावर होता. त्यांत एकंदर पांच मोठालीं दालनें असून, मुख्य दिवाणखाना फारच प्रशस्त नि आरामशीर होता. उंची पण जुन्या पद्धतीच्या फर्नीचरनें सजलेल्या त्या दिवाणखान्यांत जीर्ण आच्छादनाच्या मढविलेल्या खुर्च्या, हुकुमाची वाट पाहात ओळीनें उभे असणाऱ्या नोकरांप्रमाणेंच दिसत होत्या. जवळच संगमरवरी, कमानदार अशी विस्तवाची जागा होती. त्यांतल्या शेगडींतले निखारे रसरसलेले होते. जवळच कट्ट्यावर कोळशाचा रंगीत डबा होता.

शेगडीपाशीं मेयरसाहेबांचे वृद्ध दाढीवाले स्नेही डॉक्टर विंटर एका खुर्चीवर शेकत बसले होते. डॉक्टर विंटर हे त्या गांवाचे डॉक्टर तर होतेच पण त्या गांवांतील लहानसहान घडामोडींचा चालता बोलता इतिहासही होते. दिसायला इतके साधे कीं एखाद्या विद्वानालाच त्यांच्या विद्वत्तेची अचूक खरी पारख व्हावी. ह्या वेळीं डॉक्टरांची मुद्रा किंचित् विचारी नि त्रासिक दिसत होती. तरी पण नेहमींप्रमाणें हातांचे आंगठे फिरविण्याचा त्यांचा चाळा चालूच होता. आपल्या ह्या चाळ्याकडे जोसेफचें — मेयरसाहेबांच्या खास

नोकराचें — लक्ष आहे कीं काय हें पाहण्यासाठीं त्याच्याकडे एक ओझरता दृष्टिक्षेप टाकून डॉक्टरांनीं त्याला विचारलें, " काय ? अकरा वाजतां ? "

" होय साहेब ! चिठ्ठींत अकरा वाजतां असंच लिहिलं होतं. " जोसेफनें विमनस्कतेनेंच उत्तर दिलें.

" तूं स्वतः वाचलीस ती चिठ्ठी ? "

" नाहीं साहेब ! मेयरसाहेबांनींच ती मला वाचून दाखविली. " एवढं बोलून जोसेफ आपली नजर खुर्च्यांवरून फिरवूं लागला. त्यांतली एखादी विशेष मळली, हालली कीं काय हें तो लक्षपूर्वक पाहात होता. कितीही व्यवस्थितपणें लावून ठेवलं, झाडून झटकून साफ केलं तरी पुन्हा तें फर्नीचर अव्यवस्थित व्हायचंच, मळायचंच असा अनुभव असल्यामुळें फर्नीचरकडे पाहातांना त्याची मुद्रा नेहमींच त्रासिक बनत असे. बाहेरच्या जगांत मेयर ऑर्डेन लोकांचे पुढारी होते, तर घरांत जोसेफ, फर्नीचर वगैरे घरसामानांचा पुढारी होता. जोसेफ उतारवयाचा, किरकोळ देहयष्टीचा, पण गंभीर वृत्तीचा होता. गांवांत घडलेल्या एकंदर अकल्पित प्रकारामुळें त्याचें चित्त आज कमालीचें व्यग्र झालें होतें. घरकामांत रोजच्याप्रमाणें त्याचें मन लागत नव्हतें. डॉक्टरांच्या आंगठे फिरविण्याच्या चाळ्याचं त्याला आश्चर्य वाटलं नाहीं तरी पण आज चीड आली. शून्यवृत्तीनेंच तो आपलें कोच-खुर्च्या झटकण्याचें काम उरकीत होता. इतक्यांत विंटरनीं आपली खुर्ची जरा पुढें ओढली. ती परत व्यवस्थितपणें जागच्या जागीं ठेवायला केव्हां मिळते ह्याची तो उत्कंठेनें वाट बघत राहिला.

" अकरा वाजतां ? म्हणजे आतां इतक्यांत येतीलच ते ... " भिंतीवरल्या घड्याळाकडे नजर टाकून डॉक्टर उद्गारले.

" होय साहेब ! " जोसफनें त्यांच्याकडे न पाहातांच म्हटलें.

" मोठे वक्तशीर लोक ! ... त्यांचं प्रत्येक काम अगदीं वेळच्या वेळीं ... योग्य वेळीं ... "

" होय साहेब ! "

" सारा कारभार कसा यंत्रासारखा सुरळीत नि वेळेवर ..."

" होय साहेब ! "

" आणि आपलं ध्येय गांठायची तर त्यांना अशी घाई सुटते ! ... जसं कांहीं कुठें पळूनच जाईल तें ... नि आपल्याबरोबर जगाचाही गाडा ते लोक पुढें पुढें ढकलत नेत असतात ... "

" खरं आहे साहेब ! " डॉक्टर विंटर स्वतःशींच पुटपुटल्याप्रमाणें बोलत होते नि जोसेफ ' होय साहेब, होय साहेब ' असें उगीचच म्हणत होता. पण ' होय साहेब ' म्हणायचा जणूं कंटाळा आला म्हणूनच तो आतां ' खरं आहे साहेब ' म्हणाला !

डॉक्टर विंटरनीं पुन्हां एकदां जोसेफकडे किलकिल्या नजरेनें पाहिल्यासारखें करून त्याला विचारलें, " पण जोसेफ, मेयरसाहेब काय करताहेत ? "

" कर्नलच्या मुलाखतीसाठीं पोशाख करताहेत ..."

" अस्सं ! पण मग तूं त्यांना पोशाख घालायला मदत नाहीं करायचीस ? कसा तरी गबाळ्यासारखा पोशाख करतील ना ते ? "

" मेमसाहेब आहेत कीं त्यांच्या मदतीला. मेयरसाहेबांनीं आज ठीकठाक रुबाबदार दिसावं म्हणून फारच काळजी घेताहेत त्या ... पोशाखाप्रमाणेंच त्यांच्या चेहेऱ्याचीही ... " जोसेफ बोलतां बोलतां मध्येंच लाजला.

" चेहेऱ्याची म्हणजे ? "

" मेयरसाहेबांच्या भिवयांचे नि कानांतले केस कातरून व्यवस्थित करण्याचा उद्योग आरंभलाय् मेमसाहेबांनीं ! ..."

" काय म्हणतोस ? खरंच ? "

" कातरतांना हुळहुळतं म्हणून मला हात लावून देत नाहींत साहेब आपल्या कानांना ..."

" हुळहुळतं तर खरंच. पण खूपच गंमत आहे एकूण ! इकडे गांवांत शत्रूनें धुमाकूळ मांडलाय् ... गांवाचा ताबाही घेतलाय् ... मेयरच्या मुलाखतीसाठीं

शत्रु आतां येणार नि अशा वेळीं मेयरसाहेबांच्या मेमसाहेब त्यांची मानगूट पकडून त्यांच्या कानांतल्या केसांना कात्री लावण्यांत गढून गेल्या आहेत!" असें म्हणून डॉ. विंटर खिन्नपणें हसले.

इतक्यांत दाराजवळच्या खिडकींतून एका पोलादी टोपी घातलेल्या इसमानें आंत डोकावल्यासारखं करून दार ठोठावलं. डॉ. विंटरनीं चटकन् भिंतीवरल्या घड्याळाकडे पाहून म्हटलें, "आलेच वाटतं ते ... पण ठरलेल्या वेळेच्या आधींच कसे आले? जोसेफ, पाहा – पाहा, दार उघड ..."

जोसेफनें दार उघडलें. लांब कोट घातलेला एक सशस्त्र सैनिक लष्करी रुबाबांत आंत आला नि चौफेर नजर फेकून झट्दिशीं बाजूला झाला. त्याच्या मागेंच साध्या युनिफॉर्ममधला एक लष्करी अधिकारी दारांत उभा होता.

"मेयर ऑर्डेन आपणच का?" आंत येऊन त्यानें डॉ. विंटरना विचारलें.

"छे, छे! मी नव्हे ..." डॉ. विंटरनीं स्मितपूर्वक उत्तर दिलें.

"मग इथले कोणी अधिकारी आहांत?"

"छे! मी ह्या गांवचा डॉक्टर आहें नि मेयरसाहेबांचा स्नेही आहें."

"मेयर ऑर्डेन कुठें आहेत?"

"कपडे करताहेत. आपणच कर्नल लान्सर?"

"ओ नो! मी कॅप्टन् बेंटिक्!" असें म्हणून त्यानें किंचित् मान लवविली. डॉ. विंटरनींहि त्याच पद्धतीनें त्याला अभिवादन केलें.

किंचित् घुटमळून बेंटिकनें बोलायला सुरुवात केली, "कमांडिंग ऑफिसर येण्याच्या आधीं लष्करी नियमाप्रमाणें ह्या जागेची झडती घेण्यासाठीं मी आलों आहें. ह्यांत आपला अपमान करण्याचा आमचा हेतु नाहीं ..." लगेच त्यानें सार्जंटला हांक मारली. सार्जंटनें चटकन् पुढें होऊन जोसेफचे खिसे चांचपले नि म्हटलें, "साहेब, कांहीं नाहीं."

नंतर कॅप्टन बेंटिक् डॉक्टरना म्हणाला, "माफ करा, मला आपलीसुद्धां झडती घ्यायची आहे."

सार्जटनें डॉक्टरांचेही सर्व खिसे चांचपून पाहिले. त्याचा हात कोटाच्या आंतल्या खिशावर स्थिरावला. त्या खिशांतून त्यानें एक काळ्या चामड्याची छोटीशी चपटी पिशवी काढून कॅप्टन् बेंटिक्च्या हातीं दिली. बेंटिक्नें ती उघडून पाहिली. त्यांत दोन चाकू, कांहीं सुया वगैरे शस्त्रक्रियेचीं हत्यारें होती. पिशवी पूर्ववत् बंद करून त्यानें डॉक्टरना परत दिली. त्या एकंदर अनपेक्षित प्रकाराचें डॉ. विंटरना व जोसेफला विलक्षण आश्चर्य वाटलें.

" हें पाहा, मी आपला खेड्यापाड्यांतून हिंडणारा डॉक्टर आहें." डॉ. विंटर सांगू लागले, " वेळेला चाकू नव्हता म्हणून मला एकदां शस्त्रक्रियेसाठीं स्वैंपाकघरांतली सुरी वापरावी लागली. तेव्हांपासून मी हीं हत्यारं नेहमीं अशीं जवळ बाळगतों."

नंतर कॅप्टन बेंटिक्नें आपल्या खिशांतून एक छोटें नोटबुक काढलें आणि त्यांत पाहात डॉ. विंटरना विचारलें, " ह्या वाड्यांत कांहीं बंदुका आहेत ना?"

" तुम्हांला इथली खडा न् खडा माहिती दिसते!"

" अलबत्! इथला आमचा स्थानिक सहकारी बरेच दिवस इथें आमच्या-साठीं काम करतो आहे ना?"

" तुमचा सहकारी? कोण? त्याचं नांव?"

" त्याचं नांव?" कॅप्टन बेंटिक् जरासा घुटमळला. पण मग लगेच म्हणाला, " बाकी, त्याची सारी कामगिरी संपलेलीच आहे म्हणा. तेव्हां आतां त्याचं नांव सांगायला कांहींच हरकत नाहीं. त्याचं नांव मि. कोरेल!" कोरेलचें नांव ऐकतांच डॉ. विंटर चकितच झाले. ते म्हणाले, " जॉर्ज कोरेल? छट्! अगदींच अशक्य! अहो, ह्या गांवासाठीं आजवर घस सोसून त्यानें कितीतरी चांगल्या चांगल्या गोष्टी केल्या आहेत. आजचंच पाहा ना, निशाणबाजीची चढाओढ ठेवून त्यानें पदरच्या खर्चानें यशस्वी उमेदवारांना मूल्यवान् बक्षिसं वांटलीं! आज सकाळींच ..." पण मग एकदम त्यांच्या डोक्यांत लख्ख प्रकाश पडला. मि. कोरेलनें आजच सामने कां ठेवले तें त्यांच्या लक्षांत आलें. तरी पण कोरेलवर अविश्वास दाखवायला त्यांचें मन तयार होईना. स्वतःशींच ते

पुटपुटले, “ जॉर्ज कोरेल असं करीलसं वाटत नाहीं ... पण कुणाची दानत कशी तें कसं सांगावं ? ...”

इतक्यांत डावीकडील दरवाजा उघडला नि करंगळीनें उजवा कान टोकरीत मेयरसाहेबांची स्वारी रुबाबदार दरबारी पोशाखांत दिवाणखान्यांत आली. जाड केसाळ भिंवया नि पांढऱ्या शुभ्र मिशा त्यांच्या चेहेऱ्याच्या भव्यपणांत भरच घालीत होत्या. मेयरचा हुद्दा दर्शविणारी सांखळी त्यांच्या गळयांत होती. नुकतेच चापून चोपून बसविलेले त्यांच्या डोक्यावरचे केस पुन्हां हळुहळू वर डोकें काढूं लागले होते. मेयरची कल्पना प्रथम निघाली तेव्हां ते त्या गांवचे पहिले मेयर झाले होते. मेयर हा शब्द कुठें वाचण्यांत आला किंवा कानांवर पडला कीं मि. ऑर्डेन ह्यांचीच मूर्ति गांवकऱ्यांच्या डोळ्यांसमोर उभी राहायची. मेयरसाहेबही आपल्या हुद्दयाशीं अगदीं एकरूप होऊन गेले होते. मेयरपदानें त्यांना प्रतिष्ठा प्राप्त करून दिली होती नि त्यांनींही त्या पदाला आपलें जीवनसर्वस्व अर्पण केलें होतें.

मेयरसाहेबांच्या पाठोपाठच भपकेबाज पेहरावांत त्यांच्या पत्नीही तिथें उपस्थित झाल्या. सुरकुतलेला पण उग्र चेहेरा, लुकलुकती नजर, सडपातळ उंच अंगलट असा एकंदर त्यांचा रंगरुबाब होता. येतांक्षणींच त्यांनीं एकदा मेयरसाहेबांना आपादमस्तक न्याहाळलें आणि त्यांच्या मुद्रेवर समाधान झळकलें. तरीही, आणखी जरा वेळ मिळाला असता तर ह्याहून अधिक आकर्षकतेनें आपण ह्यांना सजविलें असतें असाही एक उडता विचार त्यांच्या मनांत आल्याखेरीज राहिला नाहीं. मेयरसाहेबांचा स्वभाव पूर्णपणें असा फक्त एक दोन वेळांच उभ्या आयुष्यांत त्यांना कळून आला होता. पण त्यांच्या स्वभावाच्या छटा ज्या कांहीं त्यांना उमजल्या होत्या त्या मात्र पूर्णपणें. त्यांना कुठें दुखत-खुपत असलं, त्यांच्या जेवणांत कधीं कमी जास्त झालं, वागण्यांत कधीं निष्काळजीपणा, थिल्लरपणा दिसला ... तर हें सगळं त्यांच्या नजरेंतून निसटत नसे. परंतु इतकें असूनही त्यांच्या जीवनाशीं त्या पूर्ण समरस झाल्या होत्या असें मात्र म्हणतां येत नव्हतें. कारण, मेयरसाहेबांच्या आशाआकांक्षांची, ध्येयाची, विचारांची त्यांना ओझरतीही ओळख नव्हती.

आंगठा चोखणाऱ्या मुलाच्या तोंडांतला आंगठा काढावा त्याप्रमाणेंच त्यांनीं मेयरसाहेबांच्या कानांतली करंगळी झटकन् बाहेर हिसडून म्हटलें, " असं इतकं काय टोकरताय् कानांत ? " आणि अखेर मला तुम्ही भिंवयांचे केस नाहींच कापूं दिलेत ... "

" पण तूं जर माझ्या डोळ्यांतच कात्री खुपसूं लागलीस ... "

" तर-तर ! तुम्हांलाच जर असं बावळटासारखं दिसणं आवडतंय् तर माझं तरी काय जातंय् ? " असें बोलतच आधींच घट्ट असलेली मेयरसाहेबांच्या टायची गांठ त्यांनीं आणखी आवळून घट्ट केली. नंतर डॉक्टरकडे वळून त्या म्हणाल्या, " बरं झालं डॉक्टर ! आज ह्या वेळीं तुम्ही इथें आहांत ! पण मी तुम्हांला असं विचारतें, अंदाजें किती मंडळी येतील हो ? " पण बोलतां बोलतांच कॅप्टन बेंटिक्कडे त्यांचें सहज लक्ष जाऊन त्या चमकून उद्गारल्या, " कोण ? कर्नलसाहेब ? "

" छे, बाईसाहेब ! मी कर्नल नव्हे. कर्नलसाहेब इकडे येणार म्हणून आगाऊ बंदोबस्तासाठीं मी आलों आहें. " असें म्हणून कॅप्टन बेंटिकनें सार्जंटला पुकारून नजरेनेंच इशारा दिला. त्याबरोबर दिवाणखान्यांतल्या सामानाची कसून तपासणी करण्यांत गुंतलेल्या सार्जंटनें लगबगीनें येऊन मेयरसाहेबांची अंग-झडती घ्यायला सुरुवात केली !

" माफ करा मेयरसाहेब ! लष्करी नियमाप्रमाणें आम्हांला हें सारं करावंच लागतं. " असें नम्रतेनें म्हणून कॅप्टन बेंटिकनें पुन्हां आपल्या नोटबुकांत पाहून विचारलें, " आपल्याकडे दोन बंदुका आहेत. होय ना ? "

" बंदुका ? ... हो-हो. एक शॉटगन नि दुसरी शिकारीची रायफल. पण त्या विशेष कधींच वापरांत नाहींत. "

" पण आहेत कुठें त्या ? "

" आहेत कुठें ? " गाल चोळीत मेयरसाहेब आठवूं लागले. तितक्यांत बाई-साहेबच म्हणाल्या, " बंदुका ना ? कपड्याच्या कपाटाच्या मागें, बेडरूममध्येंच तर

धूळ खात पडल्या आहेत ! तुम्हांला हजारदां सांगितलं त्या तेथून हलवा म्हणून ... माझ्या साऱ्या कपड्यांना तेलकट वास यायला लागलाय् ... ”

बेंटिकच्या सुचनेवरून सार्जंट लगेच बेडरूमकडे गेला नि दोन बंदुका घेऊन आला.

“ अच्छा ! थँक्यू ! संपलं माझं काम ! कर्नलसाहेब इतक्यांत इथें येतीलच. गुड् मॉर्निंग ! ” असें अभिवादनपूर्वक म्हणून कॅप्टननें त्या बंदुका सार्जंटजवळ दिल्या आणि खाकोटींतली छोटी मशीनगन सांवरीत तिथून पाय काढला.

तो गेल्यावर बाईसाहेब प्रसन्न मुद्रेनें उद्‌गारल्या, “ किती तडफदार, देखणा तरुण ! मला तर बाई पहिल्यांदा कर्नलसाहेबच वाटला. आणि मग पुन्हां त्यांनीं डॉ. विंटरना विचारलं, “ डॉक्टर, सांगा ना ? किती मंडळी येतील अंदाजें ? तसंच, त्या मंडळींना पेय कोणतं द्यायचं ? चहा, कॉफी कीं दारू ? ... आधींच कळलं म्हणजे मला त्याप्रमाणें व्यवस्था ठेवायला बरं पडेल ... ”

“ पण मला काय विचारताय् हें भलतंच ? ” डॉ. विंटर त्रासिकपणेंच म्हणाले,

“ ह्यांतलं मला कांहीं कळत नाहीं. आजच्यासारखा प्रसंग उभ्या हयातींत आज प्रथमच अनुभवतोंय् मी ! जेत्याचं स्वागत जित लोकांनीं कोणत्या पद्धतीनें करायचं असतं, त्यांना चहा द्यायचा असतो कीं दारू पाजायची असते, हें मी कसं सांगूं शकणार ? ”

“ पण जुन्या काळची वहिवाट कशी होती तें तरी तुम्हांला ऐकून ठाऊक असेलच...”

“ मला कांहींच ठाऊक नाहीं. फक्त एकच ठाऊक आहे. मेयरसाहेबांनीं सध्याच्या परिस्थितींत शत्रूबरोबर दारू पीत बसणं लोकांना मुळींच पसंत पडणार नाहीं. ”

“ खरं बोललांत डॉक्टर ! का कुणास ठाऊक, पण कर्नलबरोबर दारू पीत बसणं मलाही पसंत नाहीं. ” मेयरसाहेब म्हणाले.

“ पण पूर्वींच्या काळीं पुढारी लोक एकमेकांना धन्यवाद देत एकत्र बसून दारुचे पेले झोकीत होतेच ना ? ”

" तें खरं आहे, बाईसाहेब ! पण त्या वेळची परिस्थितिच वेगळी होती. आजकाल इंग्लिश लोक शिकारीचे खेळ खेळतात त्याचप्रमाणें पूर्वी राजे लोक लढाईचा खेळ खेळत असत. आणि शिकारींत मारलेल्या जनावरांचा फडशा पाडायला शिकारी लोक एकत्र जमतात तसे ते लढाई संपल्यावर एकत्र बसून खाना–पीना, नाच-रंग करीत. पण काळ बदलला आहे. आतां मेयरनीं कर्नल-बरोबर दारू पिणं लोकांना बिलकूल खपणार नाहीं. "

डॉक्टरांच्या ह्या बोलण्यावर बाईसाहेब एकदम उसळून म्हणाल्या, " लोकांचं कौतुक पुरे ! ते तर मेले खुश्शाल शत्रूचा बॅण्ड ऐकत मजेंत बसलेत बाजार-चौकांत ! ॲनीच मला मघाशीं सांगत होती ... नि म्हणूनच म्हणतें कीं लोकांनाच जर कांहीं वाटत नाहीं शत्रूचं तर आपण तरी आपल्या सुधारक चालीरीति कां पाळूं नये ? "

" तुम्हांला कांहीं कळत नाहीं ... " मेयरसाहेब एकदम खेकसून म्हणाले, " रीतभात, शिष्टाचार पाळण्याचा हा प्रसंग नव्हे. बिचाऱ्या लोकांना नांवं ठेवण्यांत काय अर्थ आहे ? वर्षानुवर्षं शांततेचा काळ अनुभवल्यामुळें लढाई म्हणजे काय, हेंच मुळीं त्यांना ठाऊक नाहीं. पण लवकरच त्यांना सर्व परिस्थितीचा उलगडा नीटपणें आपोआप होईल आणि मग ते असे वागणार नाहींत. आज तर ते बिचारे गोंधळूनच गेलेले आहेत. पण मला त्यांच्याप्रमाणें गांगरून जाऊन भागणार नाहीं. मला माझं डोकं शांत ठेवूनच वागलं पाहिजे. मी गांवचा मेयर आहें. लोकांनीं मला विश्वासानें निवडून दिलं आहे. गांवाची सारी जबाबदारी माझ्यावर आहे. सकाळीं आपले सहा शिपाई ठार झाले ... तिघे जायबंदी झाले ... लढा सुरू झालाय् ... अशा वेळीं कसलं खाणं-पिणं नि कसला शिष्टाचार ? लोक कांहीं षोकाखातर लढत नाहींत ... "

मेयरसाहेबांच्या ह्या भडिमारामुळें बाईसाहेबांचा चेहरा खर्रकन् उतरला. असे वादविवादाचे प्रसंग ह्यापूर्वीही पुष्कळ आले होते. आपल्या पतीच्या अंगांत ह्या वेळीं 'मेयर' संचरला आहे, हें ओळखून चतुर बाईसाहेबांनीं आपलें तोंडच मिटून घेतलें. तशा त्या मोठ्या धोरणी नि समंजस होत्या.

जोसेफनें आणून दिलेल्या कॉफीचे घुटके घेत घेत मेयरसाहेब डॉ. विंटरशीं बोलूं लागले. त्यांनीं विचारलें, " डॉक्टर, शत्रूचे एकंदर किती लोक असतील रे ? "

" फार तर अडीचशें–तीनशें ! पण प्रत्येकाजवळ छोट्या मशीनगन्स आहेत. "

" पण त्यानीं आमच्याच गांवचा ताबा घेतलाय् कीं आसपासचा मुलुखही काबीज केलाय् ? "

" कांहीं माहीत नाहीं " अशा अर्थानें डॉक्टरनीं फक्त आपले खांदे उडविले.

" पण त्यांना कुठेंच प्रतिकार झाला नाहीं ? " मेयरसाहेबांच्या ह्या प्रश्नावर पुन्हां खांदे उडवून डॉक्टर म्हणाले, " तें कळायला काय मार्ग आहे ? शत्रूनें अजिबात दळणवळण तोडून टाकलंय्... बाहेरची बातमी कळायला साधनच नाहीं ... "

" बरं, पण आपल्या संरक्षक दलांत एकंदर किती शिपाई आहेत ? "

" कुठले किती शिपाई ? मुळांत सारे बाराजण ! त्यांपैकीं नऊंचा निकाल लागला. उरले फक्त तीन ... "

" ते तिघेजण निसटले नि टेकड्यांपलीकडे गेले ... मघांशीं ॲनी सांगत होती ... " जोसेफ मध्येंच बोलला.

" पण कोण कोण ? "

" तें नाहीं मला सांगितलं ॲनीनें. "

इतक्यांत बाईसाहेबांनीं टेबलावर बोट फिरवून धूळ आहे कीं काय तें पाहिलं नि जोसेफला म्हटलं, " जोसेफ, मंडळी आली कीं तूं घंटीजवळच उभा राहा कांहीं लागेल सवरेल आम्हांला. नि हें पहा, आधीं हा कोट बदलून दुसरा चांगला बटणांचा कोट घाल पाहूं ... तसंच, सांगितलेलं काम केल्याबरोबर लगेच खोलीच्या बाहेर जाऊन उभा राहा. आजूबाजूला रेंगाळत राहून दुसऱ्यांचं बोलणं ऐकण्याची मोठी वाईट खोड आहे तुला. म्हणून मुद्दाम बजावतेंय्...

" बरं बाईसाहेब ! "

" धांदरटासारखा वागूं नकोस. आणि त्या चांदीच्या डब्यांत सिगारेटी भरून ठेव ... आणि हो खरंच ! कर्नलसाहेबांची सिगारेट शिलगावतांना नेहमींच्या संवयीप्रमाणें बुटाच्या तळव्यावर काडी ओढूं नकोस हं ! काड्यांच्या पेटीवरच ओढ, बजावून ठेवतें... "

इतक्यांत मेयरसाहेबांनीं आपल्या कोटाच्या आंतल्या खिशांतून घड्याळ काढलें आणि किती वाजले तें पाहून परत जागच्याजागीं ठेवून दिलें. पण पुन्हा कोटाचीं बटणं लावतांना चुकून एक खालचं बटण वर लागलं. चटकन् पुढें होऊन बाईसाहेबांनीं बटणं नीट लावून कोट सारखा केला.

डॉ. विंटरनीं विचारलें, " किती वाजले ? "

" अकराला पांच मिनिटं आहेत. "

" तर मग कर्नलसाहेब इतक्यांत येतीलच. बडे वक्तशीर लोक ..." असें म्हणून डॉ. विंटर खुर्चीवरून उठले.

" म्हणजे ? तूं चाललास वाटतं ? "

" होय. माझं इथें काय काम आहे ? "

" थांब. जाऊं नको. " डॉक्टरना पुन्हां खुर्चीवर बसवून मेयरसाहेब म्हणाले.

" मी एकटाच आहें. ह्या वेळीं तूं इथें माझ्याजवळ असलास म्हणजे तितकंच बरं ..."

इतक्यांत बँडवर कवाइतीचें गाणें लांबून ऐकूं येऊं लागलें. सर्वांचे कान तिकडे लागले.

" आलेच वाटतं ते. पण फार लोक मावण्याइतका हा दिवाणखाना मोठा नाहीं ..." बाईसाहेब म्हणाल्या. त्यावर उपरोधिक स्वरांत डॉक्टर म्हणाले, " व्हर्सायचा आरसेमहाल हवा होता नाहीं ? "

पण त्यांच्या बोलण्याकडे लक्ष न देतां, इतकीं माणसं ह्या लहानशा खोलींत कशीं मावणार, ह्याचाच विचार करीत खालचा ओंठ दांतांनीं चावीत बाईसाहेब उभ्या राहिल्या.

बँडचा आवाज जरासा चढून हळूहळू मंदावला. दारावर हळूच टिचकी वाजली.

" जोसेफ, बाहेर कोण आलंय् बघ रे! म्हणावं, नंतर या जराशानं ... ह्या वेळीं आम्ही गडबडींत आहोंत ..."

पण बाईसाहेबांच्या सांगण्यावरून जोसेफनें दार उघडून पाहिलें तों दारांत एक सैनिक उभा !

त्या सैनिकानें पुढें येऊन कर्नलसाहेब आल्याची वर्दी दिली.

कर्नलसाहेबांच्या बरोबर काळा बिझिनेस–सूट घातलेले एक लठ्ठ, ठेंगू गृहस्थ होते. डोक्याला टक्कल, लालबुंद गोबरे गाल, बारीक काळेभोर डोळे, असा त्यांचा एकंदर चेहरामोहरा होता. कर्नल लान्सर उंचेपुरे, मध्यम वयाचे, तगड्या तब्बेतीचे होते. पण ह्यावेळीं थोडे थकल्यासारखेच दिसत होते. सैनिकाला शोभेसेच त्यांचे खांदे भरीव नि चौरस होते. पण सर्व सामान्य सैनिकाप्रमाणेंच त्यांची दृष्टि मात्र शून्य, निर्विकार नव्हती. त्यांत एक प्रकारची विलक्षण चमक होती.

हॉलमध्यें प्रवेश करतांच कर्नलसाहेबांनीं आपलें पोलादी शिरस्त्राण हातांत काढून घेऊन 'युअर एक्सलन्सी!' असें म्हणत मेयरसाहेबांना अभिवादन केलें. त्यांच्या पत्नीलाही त्यांनीं अभिवादन करून डॉ. विंटरकडे आपली प्रश्नार्थक दृष्टि वळविली. त्याबरोबर मेयर म्हणाले, " हे माझे मित्र, डॉ. विंटर! हे इथले डॉक्टर असून इतिहासकार असाही ह्यांचा लौकिक आहे."

कर्नलसाहेबांनीं डॉ. विंटरना अभिवादन करून म्हटलें, " डॉक्टरसाहेब, बढाई म्हणून सांगत नाहीं मीं. पण मला वाटतं, आजच्या प्रसंगामुळं तुमच्या इतिहासाचं एक नवं पान ..."

" एकच कां ? पुष्कळ पानं भरतील कीं !" डॉ. विंटर हसून म्हणाले.

नंतर कर्नलनीं आपल्याबरोबर आलेल्या त्या ठेंगू गृहस्थाकडे पाहात मेयरना विचारलें, " ह्यांचा परिचय असेलच ? "

" वा ? जॉर्ज कोरेल ना ? ह्यांची ओळख नाहीं असं कसं होईल ? हे तर आमच्या गांवचे प्रतिष्ठित लोकप्रिय व्यापारी ! आमचे मित्र हे ! कसं काय जॉर्ज ? ठीक आहे ना ? "

परंतु कोरेल बोलण्याच्या आधींच डॉ. विंटर एकदम छद्मी स्वरांत म्हणाले, " बरं का मेयरसाहेब, मि. कोरेल आपले बडे दोस्त आहेत ! आजच्या हल्ल्याची सर्व पूर्वसिद्धता ह्यांनींच केली होती !... हे आपले परम हितचिंतक ! आज सकाळीं आपल्या गांवांतल्या शिपायांना निशाणबाजीच्या सामन्याच्या निमित्तानें गांवाबाहेर गुंतवून ठेवण्याचें कार्य ह्यांनींच केलें !...आपले हे जिव्हाळ्याचे प्रेमळ स्नेही ! गांवांत कुणाकडे किती बंदुका, हत्यारें आहेत ह्याचीही इत्थंभूत माहिती ह्यांनींच पुरवली कर्नलसाहेबांना ! जॉर्ज कोरेल ... खरोखरीच आमचे जीवश्चकंठश्च मित्र ..."

हें ऐकून मेयर हतबुद्धच झाले. मि. कोरेल व डॉ. विंटर ह्यांच्याकडे बराच वेळ आळीपाळीनें पाहातच राहिले ते. नंतर त्यांनीं मि. कोरेलना विचारलें, " जॉर्ज ! हें सारं खरं का ? इतके दिवस आमच्यांत मित्र म्हणून तुम्ही वावरलांत, आमच्या घरीं मेजवान्या झोडल्यात, गांवांत हॉस्पिटल बांधण्याच्या कामींही तुम्हीं आम्हांला मदत केलीत ! असं असतांना ..."

" मनाला पटेल तेंच मी करीत असतों ... नि असं वागणंच स्वाभिमानाचं असतं ... " डॉ. विंटरकडे रागानें पाहात मि. कोरेल बोलले.

मेयरसाहेब जरा वेळ स्तब्ध राहिले आणि मग कर्नलकडे वळून निश्चयी स्वरांत म्हणाले, " कर्नलसाहेब, ह्या गृहस्थाच्या देखत आपल्याशीं एक शब्दसुद्धां बोलण्याची माझी इच्छा नाहीं. "

" तें कां ? मीही कर्नलसाहेबांच्या अधिकाऱ्यांपैकींच आहें ... माझ्या अंगावर लष्करी युनिफॉर्म नाहीं इतकंच ... मला इथें मुलाखतीच्या वेळीं हजर राहाण्याचा पूर्ण हक्क आहे ..."

मेयर मि. कोरेलकडे रोखून पाहात होते. कर्नलसाहेब कोरेलना किंचित् आर्जवी स्वरांत म्हणाले, " मि. कोरेल, कृपा करून जा तुम्ही ..."

" पण साहेब ! ..."

" मी सांगतों ना ? मेहेरबानी करा ... माझं तुम्ही ऐकणार नाहीं ?" कर्नलनीं असें म्हणतांच मि. कोरेल मेयरकडे रागानें पाहात पाहात मुकाट्यानें चरफडतच निघून गेले.

" छाऽऽन ! हाही प्रसंग मला माझ्या इतिहासांत आजच्या प्रकरणीं अवश्य नमूद करून ठेवावा लागणार ..." स्वतःशींच पुटपुटून डॉ. विंटर गालांतल्या गालांत हसले. कर्नल लान्सरनीं त्यांच्याकडे एक तीक्ष्ण कटाक्ष फेकला. पण ते कांहीं बोलले मात्र नाहींत.

इतक्यांत उजवीकडील दरवाजांतून संतापानें लाल झालेली ॲनी दाण्दाण् पाय आपटीत आली नि तक्रारीच्या सुरांत सांगूं लागली, " बाईसाहेब, स्वैंपाक-घराच्या मागल्या पडवींत शिपाई येऊन उभे राहिलेत ... "

" पण ते आंत शिरणार नाहींत. लष्करी शिरस्त्याप्रमाणेंच ते तिथें उभे आहेत. " कर्नलसाहेबांनीं असा खुलासा करतांच ॲनी त्यांच्याकडे डोळे फाडून पाहूं लागली. पण लगेच बाईसाहेब कडाडल्या,

" पण तूं इथें कशाला अडमडलीस ? तो जोसेफ् कुठें उलथला ? त्याच्या-कडून हें तुला कळवायला येत नव्हतं ? "

" हो, पण ते धटिंगण नक्की घरांत घुसणार. कॉफीच्या वासावरच आलेत मेले..." ॲनी जरा वरमून बोलली.

" बरं-बरं. पण तूं आधीं येथून चालती हो पाहूं ! " मालकिणीचा हा हुकूम बिचाऱ्या ॲनीला निमूटपणें पाळावाच लागला. रागानें फणफणतच निघून गेली ती.

कर्नल मेयरना म्हणाले, " खुर्चीवर बसूं का मी ? बऱ्याच दिवसांत आम्हांला भरपूर झोप मिळालेली नाहीं ..."

" हो हो. अवश्य अवश्य बसा ना ! " खुर्ची पुढें करीत मेयर म्हणाले. झोपेंतून अवचित दचकून उठल्याप्रमाणेंच त्यांची अवस्था झाली.

कर्नलसाहेबांनीं 'हुश्श' म्हणून खुर्चीत अंग टाकलें नि मग बाईसाहेबही आसनस्थ झाल्या. डॉ. विंटरही बसले. मेयर मात्र आपल्याच विचारांच्या तंद्रीत तसेच उभे होते.

कर्नलसाहेबांनीं बोलायला सुरुवात केली. " हें पाहा मेयरसाहेब, इथें आम्हांला सर्वांशीं शक्य तों गोडीगुलाबीनेंच वागायचें आहे. आजच्या एकंदर प्रकाराकडे एक व्यापारी साहस ह्याच व्यवहारी दृष्टीनें आपण बघावं हें बरं. आम्हांला इथल्या खाणींतला कोळसा नि समुद्रांतली मासळी हवी आहे. आणि ही आमची गरज इथल्या लोकांना शक्य तर मुळींच त्रास न देतां आम्हांला पुरी करून घ्यायची आहे. केवळ व्यापारी धोरण आहे आमचं, राजकारण वगैरे कांहीं नाहीं ... "

पण कर्नलसाहेबांच्या ह्या बोलण्याकडे मेयरसाहेबांचें लक्षच नसावेंसें दिसलें. त्यांनीं तिसरेंच विचारलें, " कर्नलसाहेब, मला कांहींच वार्ता नाहीं म्हणून विचारतों, आसपासचा प्रदेशसुद्धां तुम्हीं काबीज केला आहे काय ? "

" अलबत् ! आमची योजनाच तशी होती. "

" पण तुम्हांला कुठेंच प्रतिकार झाला नाहीं ? "

" वा ! प्रतिकार झाला नाहीं, असं कसं होईल ? प्रतिकार झाला, पण त्यांत कांहींच जीव नव्हता. प्रतिकारकांचंच रक्त निष्कारण सांडलं गेलं. आमची तयारीच तशी दांडगी होती. "

" तरी पण तुम्हांला सर्वत्र प्रतिकार झाला हें तर खरं ? "

" हो, पण इथल्याप्रमाणेंच आम्ही तो हां हां म्हणतां मोडून काढला. अहो, इथें काय नि कुठें काय, आम्हांला विरोध करणंच मूर्खपणाचं होतं ... "

" तुम्हांला तसं वाटणं साहजिक आहे. पण विरोध झाला हें तर खरं ! " डॉ. विंटर मध्येंच म्हणाले. त्यावर किंचित् हसून कर्नल म्हणाले, " अहो, मूठभर लोकांचा कुठवर निभाव लागणार आमच्यापुढें ? सर्वसाधारण जनता तर शांतच असते नेहमीं. इथलीच गोष्ट घ्या ना, लोक शांत आहेत ... "

" काय प्रकार घडलाय् हेंच अजून इथल्या लोकांना नीटसं उमगलेलं नाहीं. म्हणूनच ..."

" तें खरं. पण हळुहळू सगळी परिस्थिति लोकांच्या लक्षांत येत चालली आहे. भलताच खुळेपणा ते पुन्हा करणार नाहींत. पण तें जाऊं द्या. आपल्या मुख्य कार्याकडे आपण वळूं या. महत्त्वाचा मुख्य मुद्दा असा, इथल्या खाणींतला कोळसा बाहेर काढून तो आम्हांला बोटीनें रवाना करायचा आहे. पण खाणींतून कोळसा काढण्याचं काम मात्र इथल्याच कामगारांकडून पूर्वीप्रमाणेंच आम्हांला पुढें चालू ठेवायचं आहे. आमचीं माणसं आम्हीं आमच्या बरोबर आणलेलींच आहेत. फक्त कामगार तेवढे इथले ... समजलं ना मी काय म्हणतों तें ?"

" समजलं. पण कल्पना करा, इथल्या कामगारांची तुमच्यासाठीं खाणींत काम करण्याची इच्छा नसेल तर ?".

" असं कसं होईल ? त्यांनीं खाणींत काम केलंच पाहिजे. कारण, आम्हांला कोळसा हा मिळालाच पाहिजे."

" तें खरं, पण कामगारांनीं काम करायचं नाकारलंच तर ?"

" नाकारून चालणारच नाहीं त्यांना ... पण मला तर इथले कामगार फार समजूतदार, सुस्वभावी दिसतात. भलताच पेंचप्रसंग निर्माण करून ते आमची आडवणूक आरंभतील असं नाहीं वाटत मला. ते तसे शांततेचे भोक्ते दिसतात. कां ? खरं ना ?"

" मी कांहींच सांगूं शकत नाहीं." आपली हनुवटी दुमडीत मेयर म्हणाले, " कारण, आपल्या सरकारच्या अंमलाखालीं जरी इथले लोक शांततेनें, शिस्तीनें वागत असले तरी तुमच्याही हुकुमतीखालीं ते तसेच वागतील ह्याची खात्री मला कशी देतां येईल ? शिवाय, दुसरं असं, आमचं स्वतंत्र सरकार स्थापन करून आज चारशें वर्षं आम्ही अव्याहत निर्भेळ स्वातंत्र्याचा उपभोग घेत आहोंत ..."

" तें आम्हांला ठाऊक आहे. नि म्हणूनच तर तुमचंच सरकार आम्ही पूर्ववत् कायम ठेवणार आहोंत. तुमच्या राज्यकारभारांत ढवळाढवळ किंवा फेरबदल करण्याची आमची बिलकूल इच्छा नाहीं. ह्यापुढें देखील इथले मेयर म्हणून तुम्हीच काम करणार! लोकांवर हुकुमत चालविणं, त्यांना शासन करणं किंवा बक्षीस देणं, सारं कांहीं आम्ही तुमच्यावरच सोंपवणार! मग तर तुमचे लोक संतुष्ट राहून आम्हांला त्रास देणार नाहींत ना?"

मेयरनीं डॉक्टरना विचारलं, " काय डॉक्टर! तुमचं काय मत?"

" पाहायचं काय होतं तें. पण मला तर बुवा वाटतं कीं लोकांत असंतोष निर्माण होणार! परकीयांच्या अंमलाखालीं नांदण्याची संवयच नाहीं इथल्या लोकांना ..."

" मलाही असंच वाटतंय." मेयर म्हणाले, " बरं का कर्नलसाहेब, इथल्या लोकांपैकींच मी एक असलों तरी लोक कोणत्या प्रसंगीं काय करतील नि कसे वागतील हें मला कांहींच खात्रीपूर्वक सांगतां येणार नाहीं. तुम्हांला कदाचित् ठाऊकच असेल कीं कांहीं कांहीं लोक नियुक्त पुढाऱ्यांना सर्वस्वी मान्यता देऊन त्यांच्या आज्ञा बिनतक्रार पाळत असतात. पण इथली परिस्थिति तशी नाहीं. माझी नेमणूक दुसऱ्या कुणीं केलेली नसून लोकांनींच मला निवडून मेयर केलं आहे. अर्थात् ह्या हुद्दयावरून मला हुसकावून लावणंही त्यांना अशक्य नाहीं. आणि मी तुम्हांला सामील झालोंय् अशी जर त्यांची खात्रीच झाली तर मग नक्कीच ते माझं मेयरपद तत्काळ हिसकावून घेतील!"

" पण तुम्ही जर लोकांना शिस्तीनें, शांततेनें वागण्याचा उपदेश केलात तर केवढं तरी थोर लोकहिताचं, लोकसेवेचं कार्य केल्याचं श्रेय् तुम्हांला ..."

" लोकसेवेचं, लोकहिताचं कार्य? तें कसं काय?"

" अहो, लोकांना कसलाही त्रास, कुणाचाही उपद्रव होणार नाहीं अशी सदैव दक्षता घेऊन त्यांचं सर्वतोपरी संरक्षण करणं हेंच तुमचं मेयरचं आद्य कर्तव्य!..."

"बरं मग ?"

"समजा, उद्यां जर आमची नि लोकांची तक्रार सुरू झाली, लोकांनीं बंडाळी माजवली, तर आम्हांला बंदोबस्ताचा उपाय तावडतोब अंमलांत आणावाच लागणार. म्हणजे मग लोकांवर अनर्थपरंपरा ओढवणार! सारा गांवच संकटांत सांपडणार! मग त्या गोष्टीला आमचाही इलाज राहणार नाहीं. कारण, आम्हांला कोळसा हा मिळालाच पाहिजे. तो कसा मिळवावा हें आमचं आम्हांलाच ठरवावं लागणार. कारण, आमचे वरिष्ठ अशा बाबतींत कांहींच सांगत नसतात. ते फक्त आम्हांला हुकूम सोडून मोकळे होतात. आमचं काय, आम्ही हुकुमाचे ताबेदार! पण तुमची गोष्ट तशी नाहीं. तुमच्यावर तुमच्या लोकांच्या संरक्षणाची फार मोठी जबाबदारी आहे. तेव्हां, तुम्हींच लोकांची योग्य रीतीनें समजूत घालून त्यांना काम करायला भाग पाडलंत म्हणजे मग साराच प्रश्न मिटेल. आमचा कार्यभाग होईल, तुम्हीही तुमचं कर्तव्य बजावल्या-सारखं होईल आणि लोकांनाही आमच्याकडून कसलाच त्रास पोचणार नाहीं. पूर्णपणें निर्धोक, सुरक्षितच राहातील ते!"

"पण लोकांना तशी सुरक्षितता नकोच असेल तर ?"

"तर मग लोकांच्या हिताहिताचा विचार तुम्हीं केला पाहिजे."

"पण तेंही त्यांना पसंत पडणार नाहीं. स्वतःचा विचार स्वतःच करणं त्यांना नेहमीं आवडत असतं. त्या बाबतींत आमचे लोक तुमच्या लोकांहून अगदींच भिन्न वृत्तीचे आहेत. ते कधींच दुसऱ्याच्या बुद्धीनें वागणार नाहींत. दुसऱ्याच्या ओंजळीनें पाणी पिणार नाहींत ..."

हें बोलणें चालू असतांना मध्येंच एकदम जोसेफ येऊन सांगूं लागला, "साहेब! साहेब! ॲनी फारच खवळली आहे. तिथें ते शिपाई येऊन उभे राहिलेत ..."

"ते काय तिला त्रास देताहेत ?" मेयरनीं विचारलें.

"तसा त्रास देत नाहींत. पण दारांच्या फटींतून तिच्याकडे सारखे पाहताहेत ..."

“ त्यांना तसा हुकूमच आहे. पण भलताच अतिप्रसंग ते खास करणार नाहींत ... ” कर्नल म्हणाले.

“ पण ॲनीनें तर थैमान मांडलंय् ... ”

“ तिला गप्प बसायला सांग. आणि हें बघ, आधीं सिगारेटचा डबा घेऊन ये लवकर ... ” बाईसाहेबांनीं जोसेफला फर्मावलें.

सिगारेटचा चांदीचा डबा आणून देऊन जोसेफ निघून गेला.

कर्नलनीं एक सिगारेट शिलगावली आणि एकदम कांहींतरी आठवल्यासारखी मुद्रा करून ते म्हणाले, “ हो, खरंच ! मेयरसाहेब, दुसरीही एक गोष्ट मला विचारायची आहे तुम्हांला ... माझी नि माझ्या स्टाफची राहाण्याची सोय इथें तुमच्या वाड्यांत होऊं शकेल ? ”

थोडा विचार करून मेयर म्हणाले, “ आमचा वाडा फारच लहान आहे. ह्याहून अधिक प्रशस्त नि आरामशीर जागा गांवांत पुष्कळ आहेत ... ”

“ हो, पण मेयरसाहेब, हा प्रश्न केवळ जागेचाच नाहीं. ”

“ मग कसला ? ”

“ प्रमुख अधिकाऱ्यांच्या निवासस्थानींच मुक्काम ठेवणं एकंदर सुख-सोयींच्या नि स्वास्थ्याच्या दृष्टीनें अधिक चांगलं असतं, असा आमचा अनुभव आहे. ”

“ हो, म्हणजे त्यामुळें तुमचा नि त्या अधिकाऱ्याचा गाढ स्नेहसलोखा जमला आहे, अशी साहजिकच लोकांची समजूत होते आणि तुमच्या दृष्टीनें तें इष्टच असतं... ”

“ अर्थात् ! तुम्ही बरोब्बर ओळखलंत डॉक्टर ! ”

“ माफ करा कर्नलसाहेब ! तुमची ही विनंती मला मान्य करतां येत नाहीं. ” मेयरनीं स्पष्ट सांगितलें.

त्यावर लगेच कर्नल म्हणाले, “ पण तुम्हांला ती मान्य करणं भाग आहे ! ”

" म्हणजे ? "

" माझ्या वरिष्ठांचा मला तसा हुकूमच आहे ! "

" अहो, पण तुम्हीं माझ्या वाड्यांत राहिलेलं लोकांना पसंत पडणार नाहीं. त्याची वाट ? "

" पुरे करा हो तुमचं हें लोक-पुराण ! जेव्हां तेव्हां लोक ! विचारतो कोण लोकांना ? तुमच्या लोकांना आम्हीं अगदीं निःशस्त्र करून टाकलंय् ! आणि शिवाय, ह्या बाबतींत बोलायचा अधिकारच काय लोकांना ? "

" तसं नव्हे तें ... तुम्हांला कल्पना नाहीं ... "

पण इतक्यांत स्वैंपाकघराच्या बाजूनें कुणातरी पुरुषाची किंचाळी ऐकूं आली आणि लगेच घाबऱ्या घाबऱ्या येऊन जोसेफ सांगूं लागला, " साहेब ! साहेब ! ॲनीनें एका शिपायाच्या तोंडावर उकळत्या आधणाचं पातेलंच फेकलं !

हें ऐकतांच ताडकन् उठून कर्नल म्हणाले, " म्हणजे ? मेयरसाहेब, तुमचं काडीमात्र वजन दिसत नाहीं नोकरांचाकरांवर ! "

" तुमची सैंपाकीण इतकी उद्दाम ... "

" छे, हो ! तशी फारच सालस, गरीब आहे ती ! आपल्या कामांत तर फारच हुशार आहे. पण तिला कुणीं त्रास दिला कीं मग मात्र ती वाघिणी-सारखी चवताळते. तिच्यावर कुणीं पाळत ठेवली कीं ती मनस्वी चिडते ... " बाईसाहेब म्हणाल्या.

" पण असल्या अरेराव नोकरांना हाकलून कां देत नाहीं ? "

" हिला हाकलून दिलं तर मग चांगलं अन्नच मिळायचं नाहीं खायला ... "

" तें कां ? गांवांत काय एवढी एकच सुग्रण सैंपाकीण आहे ? चांगल्या सैंपाकिणी पुष्कळ मिळतील कीं ... "

" चांगल्यावाईटाचा प्रश्न नाहीं. पण आजकाल नोकरांचा दुष्काळच पडलाय ना ? रागारागानें ॲनी निघून गेली नसली म्हणजे मिळविली. नाहीं तर आज उपासच ... " असें बोलत बोलतच ॲनीची हालहवाल बघायला बाईसाहेब

निघून गेल्या. तोंच एका शिपायानें येऊन कर्नलना लष्करी थाटाचा सलाम ठोकून विचारलें, " साहेब, त्या बाईला गिरफदार करायची का ? "

" तिनें कुणाला इजा केली आहे का ? "

" होय साहेब ! उकळत्या पाण्यानें तिनें एकाचं तोंड भाजून काढलंय् नि दुसऱ्या एकाच्या हाताला चार दोन ठिकाणीं कुत्रीसारखा कडकडून चावा घेतलाय् ... आम्हीं तिला अटक केली आहे ... "

कर्नलसाहेब क्षणभर गोंधळूनच गेले. नंतर त्यांनीं त्रासिकपणेंच फर्मावलें, " सोडून द्या तिला. आणि तुम्ही सारेजण वाड्यापासून दूर अंतरावर जाऊन उभे रहा. " आणि मग तो शिपाई निघून गेल्यानंतर मेयरकडे वळून ते म्हणाले, " लष्करी कायद्याप्रमाणें ह्या गुन्ह्यासाठीं खरं म्हणजे मी तिला गोळीच घालूं शकलों असतों. निदान तुरुंगाची हवा तर खासच दाखविली असती. पण तुमच्याकडे पाहून मी गप्प बसतों ... तुमच्या सहकार्यानें, सर्वांशीं चांगुल-पणानेंच वागून आम्हांला आमचं उद्दिष्ट साधायचं आहे. मेयरसाहेब, आमची सारी भिस्त तुमच्याच सौजन्यावर, सहानुभूतीवर आहे. "

" पण मी एकटा काय करणार ? "

" तुमचं हार्दिक सहकार्याचं आश्वासन मला मिळालं पाहिजे. "

" पण मलाही गांवाप्रमाणें वागावं लागणार ! "

" तुम्ही इथले प्रमुख अधिकारी आहांत ! "

" होय. पण सत्ता मात्र लोकांच्या हातीं आहे. लोकमताप्रमाणेंच सारा कार-भाराचा गाडा आम्हां अधिकाऱ्यांना हाकावा लागतो. तुमच्याप्रमाणें कुठलीही गोष्ट आम्हांला स्वतःच्या बुद्धीनें तडकाफडकी निर्णय करून करतां येत नाहीं. पण एकदां बहुमतानें निर्णय झाला कीं मग आम्ही सर्व मिळून कार्याला लागतों.

" पण परस्परांवर विश्वास ठेवून एकदिलानें आपण वागूं लागलों तर आपली सर्वांचीच दिलजमाई व्हायला फारसा वेळ लागणार नाहीं. व्यक्तिशः तुमच्यावर विश्वास ठेवूनच आम्ही निर्धास्त राहणार आहोंत ...

नाहींतर शांतता नि सुव्यवस्था राखण्यासाठीं मला गांवांत लष्करी अंमल जारी करावा लागेल. आणि मग लोकांवर काय काय आपत्ति कोसळतील त्याची कल्पनाही करतां येणार नाहीं. पण असा कटु प्रसंग येऊं नये हीच माझी इच्छा आहे. आणि तुम्ही तो येऊं देणार नाहीं, अशी मला आशाही आहे ...”

“ काय होईल तें खरं !” करंगळीनें कान खाजवीत मेयर म्हणाले.

इतक्यांत बाईसाहेब येऊन सांगूं लागल्या, “ ॲनी फारच खवळली आहे. शेजारच्या त्या ख्रिस्टाइनशीं बोलत उभी आहे. ख्रिस्टाइन देखील खूपच संतापली आहे ...”

“ ख्रिस्टाइन ॲनीपेक्षांहि सुग्रण आहे सैंपाकांत ...” मेयर म्हणाले.

# २

मेयरसाहेबांच्या वाड्याच्या वरच्या मजल्यावर कर्नलसाहेबांच्या स्टाफनें — म्हणजे त्यांच्या पांच सहकाऱ्यांनीं — आपली मुख्य कचेरी थाटली. त्यांपैकीं मेजर हंटर हा बुटगासा असून नेहमीं भेदरलेला दिसायचा. त्याला आंकडे-मोडीची फार हौस. तो इंजीनियर होता आणि युद्धकाल नसता तर सैनिकांवर हुकमत गाजविण्याची कामगिरी त्याच्याकडे सोंपविण्याची कल्पना कोणाच्याहि मेंदूला शिवणें शक्य नव्हतें. कारण रकमांतील आंकड्यांप्रमाणेंच शिपायांना ओळीनें उभे करून तो त्यांची बेरीज, वजाबाकी व गुणाकार करी. तसा तो गणिती नव्हताच. निव्वळ आंकडेमोड्याच होता. विनोद, संगीत किंवा गूढ गणितशास्त्र ह्यांपैकीं कांहींच त्याच्या मेंदूंत कधीं शिरलें नाहीं. वजन, उंची नि रंग एवढ्यापुरताच फरक त्याला माणसामाणसांत दिसत असे. एरवीं, त्याच्या मतानें सारीं माणसें सारखींच! आतांपर्यंत त्यानें अनेक लग्नें केलीं होतीं, पण त्याच्या बायका त्याला कायमच्या सोडून कां गेल्या, हें कोडें मात्र त्याला अजून उलगडलें नव्हतें. कॅप्टन् बेंटिक हा कौटुंबिक वृत्तीचा गृहस्थ होता. गोंडस पोरं, कुत्रीं नि नाताळ एवढ्या तीनच गोष्टी त्याला अत्यंत प्रिय. कॅप्टनच्या हुद्द्याच्या मानानें बराच वयस्कर होता तो. पण त्याचा स्वभावच मुळांत महत्त्वाकांक्षी नसल्यामुळें तो अजून कॅप्टनच राहिला होता. गाजरासारखा लाल वर्ण, लांब तरतरीत नाक, मान किंचित् झुकलेली ... तसा एकंदर ऐटबाज चेहरा, पण युनिफॉर्ममध्यें बऱ्याचशा ब्रिटिश जनरल ऑफिसर्सप्रमाणें तो बावळटच दिसायचा. युद्धापूर्वी ब्रिटिशांचा नि त्यांच्या चालीरीतींचा तो फारच चाहाता होता. इंग्रजांची प्रत्येक गोष्ट त्याला पसंत असे. इंग्लंडमध्यें तयार झालेल्या कापडाचे कपडे वापरणें, इंग्लिश कुत्रीं पाळणें, इंग्लंडमध्यें

प्रकाशित झालेलीं मासिकें वाचणें त्याला मनापासून आवडायचें. फार काय, पण लंडनहून मुद्दाम मागविलेलें तंबाकूचें स्पेशल मिश्रणच तो आपल्या इंग्लिश पाईपमधून नेहमीं ओढायचा ! सणाचे, सुटीचे दिवस तो ससेक्समध्यें घालवी. पॅरिस–बुडापेस्टमध्यें तर सारे लोक त्याला इंग्लिशमनच समजत. तें त्याला बरें वाटे. पण युद्ध सुरू झालें आणि ही सारी परिस्थिति बाह्यात्कारीं तरी पालटली. तरी पण युद्ध सुरू झाल्यानंतर बरेच दिवसपर्यंत हातांत धरायच्या इंग्लिशमेड काठीचा आणि ब्रिटिशमेक पाईपचा त्याग करणें त्याच्या जिवावर आलें होतें.

हुद्द्याच्या मानानें कॅप्टन बेंटिक जितका प्रौढ तितकाच कॅप्टन लॉफ्ट कोवळा तरुण होता. कॅप्टनचा रुबाब मात्र त्याच्या रोमरोमांत भिनला होता. एरवींच्या व्यवहारांतही लष्करी शिस्तीनेंच वागण्याची तो दक्षता घेई. दुधावर भरभर साय चढावी त्याचप्रमाणें प्रबळ महत्त्वाकांक्षेमुळें त्याची प्रगति झपाट्यानें झाली होती. सर्व तऱ्हेच्या लष्करी शिस्तीचें नि कायदेकानूंचें त्याचें ज्ञान सूक्ष्म होतें. त्यामुळें त्याचे वरिष्ठ अधिकारीसुद्धा त्याला जरा वचकूनच असत. लष्करी शिस्त कसोशीनें पाळण्यावर त्याचा मोठा कटाक्ष. जीवकोटीची अत्युच्च परिणति म्हणजे सैनिक अशीच त्याची दृढश्रद्धा होती. आणि परमेश्वर म्हणजे देखील, जुन्या लढायांच्या स्मृतीवर जगून वर्षांतून अनेकदां आपल्या लेफ्टनंटसूच्या थडग्यांवर पुष्पहार वाहाणारा एक वयोवृद्ध सन्मान्य सेवानिवृत्त सेनापति, अशीच त्याची ठाम समजूत होती. लष्करी युनिफॉर्ममधल्या सैनिकांवर जगांतल्या साऱ्या सुंदर स्त्रिया निहायत फिदा असतात, असाही त्याचा एक आवडता सिद्धान्त होता. वयाच्या पंचेचाळिसाव्या वर्षी साहजिकच तो ब्रिगेडिअर जनरल होऊन फिक्कट वर्णाच्या उंचेल्या, मर्दानी महिलांच्या मखरांत त्याचा फोटो एखाद्या सचित्र मासिकांत झळकला असता !

लेफ्टनंट प्रॅकल व टॉडर हे दोघेही अंडरग्रॅज्युएट असून चालू राजकारणाचा त्यांचा अभ्यास विशेष होता. आपल्या एकमेव महान् नेत्याच्या नव्या कार्यपद्धतीवर त्यांची एवढी पराकाष्ठेची श्रद्धा होती, कीं तिच्या प्रत्यक्ष परिणामांचीही

त्यांनीं कधीं दिक्कत धरली नाहीं. ते दोघेही अतिशय हळव्या मनाचे, भावनाप्रधान पण तापट होते. लेफ्टनंट प्रॅकलनें आपल्या प्रेयसीच्या सोनेरी केसांची एक बट निळ्या मखमालींत गुंडाळून स्वतःच्या घड्याळांत ठेवून दिली होती. आणि त्यामुळें तें घड्याळ वारंवार बंदही पडायचें. म्हणून वेळ पाहाण्यासाठीं एक निराळें रिस्टवॉच त्याला वापरावें लागायचें. तो वृत्तीनें बराचसा रंगेल असून त्याला नाचाचीही आवड होती. नेहमीं आनंदी, हंसत-मुखच असायचा तो. पण कधीं कधीं आपल्या महान् पुढाऱ्याप्रमाणें क्षुल्लक गोष्टीवरून एकदम संतापून तिरसटासारखा त्रागा मांडण्याची आणि संत्रस्त मुद्रेनें विचारांत गढून जाण्याचीही त्याला लहर यायची. चित्रें काढण्याचाही त्याला विलक्षण नाद असून हीन कलेचा तिटकारा होता. स्वतः काढलेलीं कितीतरी चित्रें त्यानें स्वतःच टरकावून टाकलीं होतीं. नाच-समारंभाच्या वेळीं आपल्या स्नेह्यासोबत्यांचीं पेन्सिल-चित्रें तो इतकीं जलद नि सुबक काढायचा कीं त्यानें चित्रकाराचाच पेशा कां पत्करला नाहीं, याचेंच सर्वांना नवल वाटायचें.

लेफ्टनंट टॉडर कवि होता. जातिवंत ध्येयवादी कवीप्रमाणें उदात्त विचारांचा तरुण नि गरीब तरुणी ह्यांच्या आदर्श प्रीतीचीं स्वप्नें शब्दचित्रित करण्याची त्याला हौस होती. त्याची ध्येयदृष्टि त्याच्या अनुभवांइतकीच विशाल होती. काल्पनिक प्रेयसीवरून मुक्तछंदात्मक प्रेमगीतें गुणगुणण्याचा त्याला विलक्षण छंद! स्वतःच्या मृत्यूबद्दल एक विचित्र आकांक्षा त्यानें आपल्या उराशीं अहोरात्र बाळगली होती. आपल्या जिवलग मित्रांचा नि प्रेमळ आप्तेष्टांचा घोळका सभोंवार अश्रु ढाळीत उभा आहे, आपला महान् नेताही शोकाकुल मुद्रेनें जवळच उभा आहे, अशा परिस्थितींत रणशय्येवर आपण कायमचे डोळे मिटावेत अशी त्याची उत्कट इच्छा होती. सूर्य अस्ताला चालला आहे, छिन्नविछिन्न युद्धसामुग्री नि विविध शस्त्रसंभार त्या सूर्याच्या मावळत्या किरणांनीं उजळून निघत आहे, मृत देहाला लष्करी पद्धतीची शेवटची सलामी देण्यासाठीं सारी सेना वांकल्या मस्तकानें शिस्तींत खडी आहे, अशा वेळीं आपल्या प्राणाचें पांखरूं जखमी कुडीच्या पिंजऱ्यांतून सुटून परलोकाकडे

उंच उंच भराऱ्या घेत निघालें आहे – असें एक करुणरम्य दृश्य त्याच्या मनश्चक्षूंपुढें कितीदातरी उभें राहात असे. अंतकाळीं कोणते शब्द उच्चारायचे हें देखील त्यानें आपल्या मनाशीं ठरवून टाकलें होतें !

कर्नलसाहेबांच्या एवंगुण विशिष्ट सहकाऱ्यांना युद्ध म्हणजे एक लहान मुलांचा मौजेचा खेळच वाटत होता. युद्ध म्हणजे अंकगणितांतलें एक उदाहरण आणि तें सुटलें कीं मजेंत घरीं जाऊन शेगडीजवळ शेकत बसावें, असें मेजर हंटरला वाटे ! युद्ध म्हणजे पद्धतशीरपणें वाढ केलेल्या नवजवानांचा एकमेव योग्य पेशा, असें कॅप्टन लॉफ्टचें मत होतें आणि लेफ्टनंट प्रॅकल व टॅांडर मात्र युद्ध म्हणजे एक मायावी स्वप्नसृष्टि असें मानीत असत. आजवरच्या अनुभवांनींच त्यांचीं मतें अशीं बनलीं होतीं. उत्कृष्ट योजना व उत्कृष्ट युद्धसामुग्री ह्यांच्या जोरावर निःशस्त्र, बेसावध शत्रूवर अचानक हल्ला करून त्यांचा प्रदेश बळकावायचा असाच सरळ सोपा कार्यक्रम आतांपर्यंत निर्वेधपणें चालला होता. आजवरच्या कुठल्याही चकमकींत त्यांना कधीं हार खावी लागली नव्हती कीं फारशी इजाही पोचली नव्हती. यातना किंवा पराभव हे शब्दच त्यांना ठाऊक नव्हते. मग युद्ध म्हणजे पोरखेळ, असें त्यांनीं कां बरें समजूं नये ? कर्नल लान्सरना मात्र युद्धाच्या सर्वसाधारण भीषणतेची यथार्थ कल्पना होती.

वीस वर्षांपूर्वीच्या गेल्या महायुद्धांत बेल्जम–फ्रान्समध्यें लान्सरना कांहीं दिवस काढावे लागले होते. आणि त्या वेळीं अनुभवलेल्या यातनांची आठवण झाली कीं अजूनही त्यांच्या काळजावर कांटा उभा राहात असे. भयंकर रक्तपात, द्वेष, जुल्म, अत्याचार, नालायक सेनापतींचा घातकी जोजार, अनेक प्रकारचे आजार, रोगराईचा प्रसार, मृत्यूचा हाहाकार – सारांश, माणुसकीचा समूळ संहार म्हणजेच युद्ध ! ही गोष्ट त्यांना अनुभवानेंच पूर्णपणें पटली होती. आणि युद्ध संपल्यानंतर तरी काय ! अस्वस्थता, अविश्वास नि असंतोष पूर्ववत् कायमच ! फक्त त्यांचीं स्वरूपें तेवढीं पालटलेलीं ! हाही अनुभव त्यांनीं घेतलेला होता. परंतु, त्यांचा आशावाद दांडगा होता. चालू महायुद्धाचा

शेवट मागल्या महायुद्धाप्रमाणेंच होणार नसून तो अगदीं निराळाच होणार आहे, असें ते आपल्या मनाला दिवसांतून निदान पन्नास वेळां तरी बजावीत असत. शिवाय, आपण सैनिक आहोंत, इतर कोणत्याही गोष्टींचा विचार न करतां फक्त वरिष्ठांचे हुकूम पाळणें एवढेंच आपलें कर्तव्य, अशीही शिकवण ते आपल्या मनाला नेहमीं देत असत.

परंतु त्यांच्याबरोबर असलेल्या तरुण अधिकाऱ्यांची मनोरचना मात्र अगदींच भिन्न होती. कारण, युद्धाचें वास्तव स्वरूप त्यांना अद्यापि उमजलेलें नव्हतें आणि वेडेवाकडे कठीण प्रसंगही त्यांना कधीं अनुभवावे लागले नव्हते. त्यांचा दैनंदिन कार्यक्रम मोठ्या मजेंत चालला होता.

मेयरसाहेबांच्या वाड्याच्या वरच्या मजल्यावरील तीन खोल्यांत त्यांनीं आपलें सारें बस्तान मांडलें होतें. बाजूच्या दोन खोल्यांत कपडे, बिछाने वगैरे सामान लावून मधल्या मोठ्या हॉलमध्यें बसण्याउठण्याची व्यवस्था केली होती. तेथें एक टेबल व तीनचार खुर्च्या होत्या. पत्रव्यवहार, गप्पा, विश्रांति, कॉफी-पान, त्यांचें सारें कांहीं इथेंच चालत असे. हॉलच्या खिडक्या खूपच मोठ्या असल्यामुळें त्यांतून कोळशाच्या खाणीपासून थेट बंदरापर्यंतचा सर्व भाग स्पष्ट दिसत असे. समुद्रकिनारीं सुकत टाकलेल्या मासळीचा वास सुद्धां येत असे. हॉलच्या भिंतींवर गायी, तळीं, शेतकऱ्यांच्या झोंपड्या ह्यांचीं चित्रें टांगलेलीं होतीं.

हॉलच्या मध्यभागीं एक मोठें टेबल होतें. त्या टेबलाला मांडीवरचा ड्रॉइंग बोर्ड टेकवून हातांत 'टी स्क्वेअर' व 'त्रिकोण' घेऊन नव्या रेलरोडचा नकाशा काढीत मेजर हंटर तिथें एका खुर्चीवर बसला होता. पण तो ड्रॉइंग बोर्ड सारखा हालत असल्यामुळें तो त्रासला होता. अखेर कंटाळून त्यानें लेफ्टनंट प्रॅकलला हांक मारली. दाढीला साबणाचा ब्रश चोळीत चोळीतच लेफ्टनंट प्रॅकल बेडरूममधून लगबगीनें येऊन त्याच्या समोर उभा राहिला. मेजर हंटरनें ड्रॉइंग-बोर्ड हालवून विचारलें, "माझ्या सामानांत ह्या बोर्डाचा स्टँड असेल ... जरा पाहा बरं ... "

"पण एवढी दाढी तर संपवतों ..."

" छे-छे ! आधीं मला स्टँड आणून द्या. तुमच्या चेहऱ्याच्या साफसफाईपेक्षां हा रेल्वेचा फांटा अधिक महत्त्वाचा आहे. गोल्फबॅगसारखीच एक कॅनव्हास-केस आहे ... "

" बघतों ... " असें म्हणून प्रॅकल गेला. कॅप्टन लॉफ्ट आला आणि आल्या-बरोबर शिरस्त्राण, दुर्बिण, गॅसमास्कची बॅग वगैरे आपला सारा साज–सरंजाम अंगावरून उतरून टेबलावर ठेवूं लागला. मेजर हंटर एकदम उसळून ओरडला, " अहो, इथें काय रचताय् हा ढीग ? मी इथें काम करीत बसलोंय्. दिसतंय् ना ? "

पण ह्या त्याच्या ओरडण्याकडे लक्षच न देतां कॅप्टन लॉफ्ट त्याला सांगूं लागला, " हा बेंटिक बडा चक्रमच आहे. हेल्मेटऐवजीं साधी हॅटच घालून बहाद्दर भर रस्त्यांतून ड्यूटीवर चालला आहे ! ... "

" मग ? त्यांत काय बिघडलं ? प्रत्येक वेळीं शिरस्त्राण, तें टीनचं जड धमेलं टाळक्यावर चढवलंच पाहिजे असं आहे कीं काय ? "

" अलबत् ! इथल्या लोकांवर छाप पाडण्याच्या दृष्टीनें अवश्यच आहे तें. आपण आपला लष्करी रुवाब राखला नाहीं तर मोठाच कठीण प्रसंग गुजरायचा एखादे वेळीं आपल्यावर ... "

" कशावरून ? "

" कशावरून म्हणजे ? व्यात देशांत लष्करी अधिकाऱ्यांनीं कसं वागलं पाहिजे ह्याबद्दलचा स्पष्ट तपशीलवार खुलासा मॅन्यूएल्–एक्स् बारामध्यें केलेला आहे. प्रत्येकानें तो काळजीपूर्वक वाचला पाहिजे. तुम्ही सुद्धां ... " पण मेजरनें एक करडा कटाक्ष टाकतांच लॉफ्ट एकदम चपापून बोलायचा थांबला. मेजर म्हणाला, " पण तें मॅन्यूएल खरडणारा गृहस्थ व्यात प्रदेशांत कधीं गेला तरी असेल कीं नाहीं, ह्याचीच शंका आहे. इथले लोक तर अगदींच निरुपद्रवी, शांत स्वभावाचे, आज्ञाधारक दिसतात. तुम्हां लोकांना उगाच त्यांचा बाऊ वाटतो. इतक्यांत साबणानें माखलेल्या चेहऱ्यानेंच एक तपकिरी रंगाची कॅनव्हास–बॅग

घेऊन ' हीच का ? ' असें मेजरला विचारीत प्रॅकल आला. त्याच्या मागोमाग लेफ्टनंट टॅाडरही आला.

" हीच ... हीच ... पण ही खोला ना ! माझ्यापुढें नुसतीच कशाला आणून आदळलीत ? " मेजर म्हणाले. प्रॅकलनीं व टॅाडरनीं ती बॅग उघडून आंतला स्टॅंड व्यवस्थितपणें टेबलावर उभा केला. तोंच प्रॅकलकडे लक्ष जाऊन लॅाफ्टनें त्याला म्हटलें, ' हें काय हो लेफ्टनंट ? साबण तसाच आहे कीं तोंडावर ... जरा आरशांत पाहा ... असं वेंधळ्यासारखं वागणं चांगलं नव्हे ! "

" हो, पण दाढी करीत होतों इतक्यांत मध्येंच मेजरसाहेबांनीं ही कामगिरी सांगितली. मग कसं करणार ? "

" बरं, बरं. धुवून टाका तो चटकन्. कर्नलनीं पाहिलं तर काय म्हणतील ते ... "

" कांहींच म्हणणार नाहींत. ते असल्या क्षुल्लक गोष्टींकडे कधीं लक्षच देत नसतात ... "

" त्यांनीं लक्ष दिलं नाहीं तरी एकंदरींत हें बरं नव्हे. " लॅाफ्ट म्हणाला.

प्रॅकलनें गालांवरचा साबणाचा फेस हातरुमालानें स्वच्छ पुसून काढला.

मेजर हंटर काढीत असलेलें स्केच पाहात उभा असलेला टॅाडर म्हणाला, " मेजरसाहेब ! फारच झकास झालाय् हा पूल. पण हा पूल आपण बांधणार आहांत कुठें ? "

" कुठेंच नाहीं. हें वरचं ड्रॅाइंग तेवढं आपल्या उपयोगाचं आहे ... "

" मग हा पूल कशाला काढलाय् ? "

काय सांगावें हेंच हंटरला सुचेना. तो म्हणाला, " त्याचं असं ... आमच्या घराच्या मागील अंगणांत मी एक रेल्वे लाईनचं छोटं मॅाडेल तयार केलंय् ... त्यांत एका छोट्याशा खाडीवर पूल बांधायचं मीं योजिलं होतं. रेल्वे लाईन खाडीपर्यंत आणली, पण पूल बांधायचं तसंच राहून गेलं, तेव्हां सहज तीच कल्पना इथं चितारली झालं .. "

तितक्यांत खिशांतून एक फोटो काढून प्रॅकल त्याच्याकडे पाहात राहिला. तो एका पोरीचा फोटो होता. तो दाखवीत प्रॅकलनें टॉडरला विचारलें, " कशी झकास आहे कीं नाहीं पोरगी ? "

" अगदींच मामुली ! " फोटोकडे निरखून पाहात टॉडर म्हणाला.

" काय वैगुण्य आहे हिच्यांत ? "

" काय चांगलं आहे तुम्हीच सांगा ना ? "

" तुमच्या नजरेंत असा चटकन् भरणार नाहीं हिचा चेहरा. हा फोटो मी इथें लावून ठेवतों. बराच वेळ एकतानतेनें त्याच्याकडे पाहात बसा. म्हणजे मग आपोआपच ह्या फोटोंतला चेहेरा तुम्हांला आवडूं लागेल ! " असें म्हणतच प्रॅकलनें तो फोटो खिडकीच्या पडद्याला टांचणीनें लावून ठेवला.

इतक्यांत लॅाफ्टचें तिकडे लक्ष जाऊन तो ओरडला, " अहो, हें काय चालवलंय् तुम्ही ? हा फोटो इथें पाहून लोक काय म्हणतील ? आधीं काढून टाका पाहूं तो तेथून ... "

" कसला, कुणाचा फोटो ? " मेजर हंटरनें विचारलें.

" एका नटीचा ..."

" छट् ! नटी कुठली ? कुणी तरी उनाड मैना दिसते ! " टॉडर म्हणाला.

" तुम्ही ओळखतां वाटतं हिला ? " हंटरनें विचारलं.

" मुळींच नाहीं. "

" मग कशावरून तुम्ही असं बोलतां ? " प्रॅकलनें टॉडरला चिडून विचारलें.

" तिचा चेहराच सांगतोय् कीं ! "

" तुमची तिची ओळख आहे ? "

" ओळख नाहीं. नि ती करून घेण्याची माझी इच्छाही नाहीं. "

" मग तुम्ही कशावरून तिला उनाड मैना ठरवतां ? " प्रॅकलनें विचारलें. पण तितक्यांत लॅाफ्ट गरजला, " भलतंच वादंग काय माजवलंय् ? तो

फोटो आधीं काढून टाका ... पाहिजे तर तुमच्या बिछान्यावर तो टांगून ठेवा ... हें ऑफीस आहे ...”

किंचित् मग्रूर नजरेनेंच प्रॅकलनें लॉफ्टकडे पाहिलें. तो कांहींतरी बोलणार होता तोंच पुन्हां लॉफ्ट कडाडला, “ लेफ्टनंट ! मी तुम्हांला हुकूम करतोंय् ...”

बिचाऱ्या प्रॅकलनें मुकाट्यानें तो फोटो काढून आपल्या खिशांत ठेवून दिला. पण लॉफ्टला चिडविण्याच्याच उद्देशानें तो पुन्हा हसत हसत म्हणाला, “ ह्या गांवांत अशा कितीतरी खुबसुरत जवान पोरी आहेत. आपलं इथलं बस्तान एकदा नीट बसलं नि सर्व कांहीं सुरळीतपणें चालू झालं कीं आपण तर बुवा कांहींजणींची ओळख जरूर करून घेणार !”

“ आधीं तुम्ही मॅन्युएल एक्स बारा वाचा ! असल्या भानगडींसंबंधीं त्यांत एक स्वतंत्र प्रकरणच आहे.” असें म्हणून लॉफ्ट आपला सारा लष्करी पोशाखाचा सरंजाम घेऊन बेडरूमकडे गेला.

मेजर हंटरच्या स्केचकडे पाहात उभा असलेला टॉंडर म्हणाला, “ हां ! हें फारच छान झालं ! आतां कोळशाचे डबे खाणीपासून निघून थेट बोटीपर्यंत जातील !

“ भराभर कामाला लागलं पाहिजे. आतां इथला कोळसा शक्य तितक्या तांतडीनं हालवला पाहिजे. वाटतं इतकं सोपं काम नाहीं तें. तरी बरं ... इथले लोक शांत, समंजस आहेत ...”

“ पण मेजरसाहेब, ह्या गोष्टीचं श्रेय आपल्यालाच आहे. आपणच समजुतदारपणानें वागतोंय् म्हणूनच सर्व ठीक आहे. म्हणूनच ‘प्रोसीजर’च्या बाबतींत मी सारखा ओरडत असतों. खरोखर, मॅन्युअलमध्यें किती सुंदर विवेचन केलं आहे ह्याचं ...” साधा पोशाख करून बेडरूममधून बाहेर येत लॉफ्ट म्हणाला.

इतक्यांत अंगांतला कोट काढीत काढीतच कर्नलसाहेब बाहेरून आले. सर्वांनीं त्यांना लष्करी पद्धतीचा सलाम केला. आल्याबरोबर कर्नलनीं कॅप्टन

लॉफ्टला फर्मावलें, “ तुम्ही असेच जाऊन कॅप्टन वेंटिकची त्यांच्या कामा-वरून तावडतोब सोडवणूक करा बरं. आज त्यांची तब्येत जरा ठीक नाहीं म्हणे ... ”

“ हो, पण आतां असाच मी माझी ड्यूटी संपवून परतलोंय् साहेब ! ”

“ म्हणजे ? तुम्ही जाणार नाहीं ... ”

“ तसं नव्हे. जायला तयार आहें मी. पण रेकॉर्डला नोंद असावी म्हणून आपल्या कानांवर घातलं इतकंच ... ”

“ असं – असं. म्हणजे तुमचं म्हणणं, रिपोर्टमध्यें उल्लेख यावा ... ”

“ हो. काय हरकत आहे ? ”

“ आणि असे दहा पांच वेळां उल्लेख आले कीं साहजिकच मग तुमच्या छातीवर एखादं मानाचं पदक लटकणार ! ”

“ असलीं गौरव-चिन्हें तर लष्करी जीवनमार्गावरले यशाचे टप्पे ! मैलाचे दगड ! ”

“ खरं आहे. पण त्यांना तितकंसं महत्त्व नसतं ... ”

“ म्हणजे ? ”

“ इतक्यांतच नाहीं तुम्हांला कळायचं तें. ” असें म्हणून कर्नलसाहेब हसले.

कॅप्टन लॉफ्टनें पुन्हां आपला सारा सरंजाम चढवून लगबगीनें कूच केलें. त्याच्याकडे पाहात कर्नल उद्गारले, “ बेटा अभिजात सैनिक आहे ! ”

पण त्यावर लगेच मेजर हंटर म्हणाला, “ अभिजात गद्धा आहे ! ”

“ छे, छे ! ” कर्नल म्हणाले, “ कांहीं लोक जसे जन्मजात राजकारणी मुत्सद्दी असतात तसाच हा जन्मजात शिपाईगडी आहे. थोडासा मुत्सद्दीही आहे. लौकरच त्याची जनरल स्टाफवर खास बढती होणार आणि मग त्याची युद्धप्रियताही जास्तच वाढणार ! ”

“ पण साहेब, हें युद्ध कधीं संपेलसं वाटतं आपणाला ? ” प्रॅकलनें मध्येंच एकदम विचारलें.

" युद्ध कधीं संपेल ! काय, विचारतां काय तुम्ही ? "

" नाहीं म्हटलं, आपला संपूर्ण विजय व्हायला आणखी किती दिवस लागतील ? "

" तें कसं सांगतां येणार ? आपले शत्रु अद्यापि जिवंत आहेत जगांत ... "

" आपण त्यांना झोडपून काढूं ... "

" अलबत् ! तो आपला उद्योग सुरूच आहे ... "

" मग नाताळपर्यंत युद्ध संपूर्ण सर्वत्र स्थिरस्थावर झालं तर, घरीं जायला आम्हांला थोडी रजा मिळेल कीं नाहीं ? "

" तें मला आजच नाहीं सांगतां येणार. त्या बाबतचे सर्व हुकूम थेट राजधानींतून यावे लागतात. तुम्हांला जायचं आहे वाटतं घरीं नाताळसाठीं ? "

" होय. जमलं तर ... "

" कदाचित् मिळेल रजा तुम्हांला. पण कदाचितच हं ! खात्रीनें नाहीं. "

" आणि साहेब, युद्ध संपल्यानंतर आपला तळ इथून कायमचा हालणार ? " टॉडरनें विचारलें.

" कां बरं ? "

" हा प्रदेश फार सुपीक आहे. आणि इकडले लोकही फार चांगले आहेत. आमच्यापैकीं पुष्कळजण इथेंच कायमची वस्ती करून राहाणं पसंत करतील ... "

" असं म्हणतां ? तुम्ही तुमच्या पसंतीचं एखादं मजेदार स्थळ हेरून ठेवलंय् वाटतं इथें ? " थट्टेच्या स्वरांत कर्नलनीं विचारलें.

" तसं नव्हे साहेब ! पण इथल्या कांहीं कांहीं जमिनी फारच सकस आहेत. त्यांतल्या चार पांच पट्ट्यांची मिळून एकत्र एक मोठी शेतवाडी तयार केली तर होण्यासारखी आहे. "

" तुमचं वडिलार्जित शेतभात मुळींच नाहीं वाटतं ? "

" पूर्वीं होतं थोडंसं. पण चलनवाढीमुळें आतां पार खलास झालंय् ... "

खरें म्हणजे असल्या निरर्थक गप्पागोष्टींना कर्नल आतां कंटाळले होते. ते अखेर एवढेंच म्हणाले, " हें पाहा, सध्या तर लढाई सुरू आहे. अजून आपणाला ही लढाई जिंकायची आहे. आणि मुख्य म्हणजे इथला कोळसा आधीं रवाना करायचा आहे. घरादाराच्या नि शेतवाडीच्या गोष्टी आजच कशाला ? " ... नंतर एकदम चर्या बदलून बजावणीच्याच स्वरांत ते मेजर हंटरना म्हणाले, " मेजर, रेलरोडचं सामान उद्यां इथें येईल. तुमचा रस्ता ह्या आठवड्यांत चालू झालाच पाहिजे. "

इतक्यांत पाहरेवाल्या संत्र्यानें दारांतूनच डोकावून कर्नलसाहेबांना वर्दी दिली, " मि. कोरेल भेटीसाठीं आले आहेत. "

" आंत पाठवून दे त्यांना. " असें म्हणून कर्नल आपल्या सहकाऱ्यांना सांगूं लागले, " इथल्या हल्ल्याची सर्व पूर्वयोजना करणारा हाच तो इसम. आतां त्याचा थोडा उपसर्गच होणार आपणांला ... "

" पण त्यानें आपली कामगिरी तर चोख बजावलेली दिसते. " टॉंडर म्हणाला. त्यावर किंचित् हसून कर्नल बोलले, " फारच चोख ! पण आतां मात्र तो इथल्या लोकांच्या तिरस्काराला पात्र होणार आणि आमच्याशीं तरी त्याचं कितपत जुळेल, प्रश्नच आहे.

" पण त्याच्या कामगिरीचं योग्य बक्षीस त्याला मिळणं अवश्य आहे. "

" पण तें तो आमच्याकडे मागणार नाहीं असं का तुम्हांला वाटतं ? "

कर्नलसाहेबांचें बोलणें संपतें न संपतें तोंच हात चोळीत चोळीत मि. कोरेल आले. त्यांच्या अंगावर कालचाच काळा सूट आजही होता. पण त्यांच्या टक्कल पडलेल्या डोक्यावर मात्र बँडेज बांधलेलें दिसत होतें. कर्नलनीं तें पाहिलें, पण ते कांहींच बोलले नाहींत.

कर्नलना 'गुड मॉर्निंग' करून कोरेल म्हणाले, " कालच पुन्हा मी आपणांकडे येणार होतों. पण म्हटलं, आपण फारच कामाच्या धांदलींत असणार ... "

कर्नलनीं कोरेलना आपल्या सर्व मंडळींचा परिचय करून दिला. हस्तीदंती पाजळून कोरेल म्हणाले, " वा ! काल ह्या सर्वांनीं आपापली कामगिरी फारच उत्कृष्ट बजावली. बाकी, सारी पूर्वतयारी मीं करून ठेवलीच होती म्हणा ! "

" तें तर खरंच. पण ते बिचारे सहा शिपाई मात्र निष्कारण प्राणाला मुकले. निशाणबाजीच्या सामन्यांतून तुम्ही त्यांना परत गांवाकडे येऊंच द्यायला नको होतं. "

कर्नलच्या ह्या बोलण्यावर तोंडभर हसून कोरेल म्हणाले, " अहो, हें चालायचंच. एवढ्या महत्त्वपूर्ण मोठ्या ठाण्याच्या मानानें अवघ्या सहा माणसांचं बलिदान म्हणजे कांहींच नव्हे ! "

" तसाच प्रसंग पडला तर हल्ल्याच्या वेळीं माणसं मारावींच लागतात हें खरं. पण शक्य तों रक्तपात टाळणंच अधिक श्रेयस्कर असतं. "

" समजलं. पण ... " अर्धवटच बोलून कोरेलनीं एकवार सभोंवार दृष्टि-क्षेप टाकला आणि मग हळूच कर्नलांच्या कानाशीं ते पुटपुटले, " साहेब, मला आपल्याशीं – एकट्याशींच – थोडं खासगी बोलायचं आहे. "

" ठीक आहे. " असें म्हणून कर्नलनीं टॅाडर नि प्रॅकल ह्यांना तेथून जाण्याविषयीं सुचविलें. त्याप्रमाणें ते दोघेही गेले. नंतर मेजरकडे पाहून ते कोरेलना म्हणाले, " ह्यांचं महत्त्वाचं काम चाललंय्. आणि एकदां कामांत गर्क झाल्यावर ह्यांना आजूबाजूच्या जगाचं भानच राहात नाहीं. तेव्हां ह्यांना इथें असायला हरकत नाहीं. आपलं बोलणं ते ऐकणार नाहींत. " हळूच वर मान करून मेजर हंटरनें किंचित् स्मित केलें आणि पुन्हा आपली नजर कामा-कडे लावली.

" हं ! बोला आतां ... पण हें हो काय ? इतक्यांतच लोकांनीं तुमच्या खुनाचा प्रयत्न केला वाटतं ? " कोरेल ह्यांच्या बँडेजकडे जणूं प्रथमच लक्ष गेलें आहे असें दर्शवून कर्नलनीं त्यांना विचारलें.

बँडेज चांचपीत कोरेल म्हणाले, " ह्या बँडेजवरून म्हणतां होय ? छे, छे ! आपण म्हणतां तसं कांहीं नाहीं. आज सकाळीं सहज टेकडीच्या बाजूनें जात असतां वरून कुठून तरी एक दगड डोक्याला लागला ... "

" कुणींतरी मुद्दामच मारला असेल तो. "

" छट् ! भलतंच काय बोलतां साहेब ! इथले लोक असे अत्याचारी नाहींत. माझी खात्री आहे ना ? आज जवळ जवळ शंभर वर्षांत युद्ध म्हणजे काय, हेंच त्यांना ठाऊक नाहीं. सारं युद्धशास्त्र पार विसरून गेलेत ते ... "

" असं का ? तुम्ही इतकीं वर्षं इथल्या लोकांत राहिलेले – वागलेले. तेव्हां माझ्यापेक्षां तुम्हांलाच त्यांची माहिती जास्त असणं साहजिक आहे. पण तुम्ही अजून सुखरूप आहांत, म्हणजे खरोखरीच इथले लोक जगावेगळे आहेत असं म्हटलं पाहिजे. माझ्या आजपर्यंतच्या आयुष्यांत मीं अनेक प्रदेशांचा ताबा घेण्याची कामगिरी बजावली आहे. फ्रान्स-बेलजममध्येंही मी वीस वर्षांपूर्वीं होतों. त्यावेळचे तिथले ते एकेक अनुभव ... " बोलतां बोलतां मध्येंच एकदम अंग शहारल्यासारखें करून कर्नलसाहेब क्षणभर थांबले. आणि मग घोगऱ्या आवाजांत पुढें म्हणाले, " पण तें जाऊं दे. मि. कोरेल, तुम्ही अत्यंत उत्कृष्ट कार्य केलंत ! आम्हीं तुमचे फार फार आभारी आहोंत. तुमच्या इथल्या कामगिरीचा उल्लेख मीं माझ्या रिपोर्टांत केलेलाच आहे ... "

" थँक्यू सर ! माझ्याकडून होण्यासारखं होतं तेवढं सर्व कांहीं मीं केलेलं आहे. "

" बरं, पण आतां पुढें काय करणार ? तुम्हांला परत राजधानीकडे जायचं असेल तर तसं सांगा. तुमची जाण्याची व्यवस्था करतों ... "

" छे, छे ! साहेब, मला जायचं नाहीं. इथेंच राहाण्याची माझी इच्छा आहे. "

" पण मि. कोरेल, इथें माझ्याजवळ फार माणसं नाहींत. तुम्हांला एखादा शरीर-संरक्षक देतां येणं शक्य नाहीं मला ... "

" पण साहेब, मला त्याची आवश्यकताच नाहीं. सांगितलं ना ? इथले लोक अत्याचारी, खुनशी नाहींत ... "

कर्नलनीं कोरेल ह्यांच्या बँडेजकडे पुन्हां एकदां नजर टाकली. मेजर हंटरनें खवचटपणानें सुचविलें, " मि. कोरेल, तुम्हीं आतां ताबडतोब शिरस्त्राण वापरायला लागावं हें उत्तम ! "

आपली खुर्ची जरा पुढें ओढून घेऊन कोरेलनीं हलक्या आवाजांत कर्नलना म्हटलें, " साहेब, मला वाटतं, आपल्या खास विश्वासांतला एक मुलकी मुख्याधिकारी इथें असणं अवश्य आहे. मेयर ऑर्डेनला कमी करून त्याचं मेयर-पद आपण मला दिलंत तर फार चांगलं होईल ... "

" तुम्ही तुमच्या रिपोर्टांतही ह्यासंबंधीं उल्लेख केलाय् कीं काय ? "

" अर्थात् ! "

" आणि गांवांतही कुणाजवळ बोललांत ? "

" छे ! गांवांत कुणाजवळ कसं बोलणार ? लोक तर अजून गोंधळलेल्या मनःस्थितींतच आहेत ... काय झालं नि कसं झालं, हेंच मुळीं त्यांना अजून उमगलेलं नाहीं. "

" हा भ्रम आहे तुमचा. लोकांना सगळं कांहीं कळून चुकलं आहे. त्यांच्या मनांत काय चाललंय् ह्याची तुम्हाला कल्पना नाहीं. तुमच्याविषयीं लोकांचं मत ... "

" फारच चांगलं आहे. " मध्येंच कोरेल म्हणाले, " गांवांत माझे पुष्कळ जिवलग स्नेही आहेत ... प्रत्येक इसमाची चांगली माहिती आहे मला ... "

कोरेलकडे निरखून पाहात कर्नलनीं पुन्हां खोदून विचारलें, " आज सकाळपासून तुमच्या दुकानांत गिऱ्हाइकं किती आलीं ? "

" आमचा धंदा तर कालपासून बंदच आहे ... लोक मुळीं बाजारहाट करण्याच्या मनःस्थितींतच नाहींत ... "

" आणि त्यांतून तुमच्या स्टोअर्सकडे तर कुत्रंदिखील फिरकलं नसेल ... " असें म्हणत कर्नलसाहेब एका खुर्चीवर बसले आणि पुढें बोलूं लागले, " मि. कोरेल, तुम्ही खुळे आहांत. तुम्हाला कळत नाहीं ... लोक तुमचा मनापासून तिरस्कार करूं लागले आहेत ... "

" कुछ फिकीर नाहीं ! आपला पाठिंबा असल्यावर लोकांची पर्वा करतो कोण ? बोलून चालून शत्रूच ते ! त्यांची मर्जी नि इतराजी ... दोन्ही सारखींच ! "

कोरेल ह्यांचें बोलणें ऐकून कर्नल थोडा वेळ स्तब्ध राहिले. नंतर मृदु स्वरांतच म्हणाले, " पण मि. कोरेल, आतां ह्यापुढें आम्हांलाही तुमच्याविषयीं आदर, आपुलकी वाटणं शक्य नाहीं ! "

" काय , म्हणतां काय साहेब ! " विजेचा धक्का बसल्याप्रमाणें ताडकन् उठून कोरेल उसळून म्हणाले, " म्हणजे माझी कामगिरी आपण हीन दर्जाची लेखतां कीं काय ? सर्वांची कामगिरी सारख्याच योग्यतेची, असं आपल्या महान् पुढाऱ्याचं तत्त्व ... अन् आपल्या बोलण्याचा सूर तर त्या तत्त्वाविरुद्ध ... मला तर डिक्टेटरचं स्पष्ट अभिवचन आहे कीं ... "

" तुम्हाला तुमच्या कामगिरीच्या मानानें मोठंच इनाम मिळायला हवं, हें मलाही मान्य आहे. " मध्येंच कर्नल बोलूं लागले, " पण त्या बाबतींत तुम्ही नि डिक्टेटर जाणे ! ह्यावेळीं मला त्या अवांतर गोष्टी ऐकण्याची इच्छा नाहीं. मी मात्र तुम्हांला सारी वस्तुस्थिति स्पष्ट सांगतों. ती नीट ऐकून घ्या. इथली सर्व व्यवस्था माझ्या हातीं आहे. इथला कोळसा खाणींतून काढून रवाना करणं ही माझी मुख्य कामगिरी आहे. त्यासाठीं शिस्त, शांतता नि सुव्यवस्था राखण्याची जबाबदारी सर्वस्वी माझ्यावर आहे. आणि म्हणूनच लोकमताची नाडी पारखून त्याप्रमाणें आपले पवित्रे टाकणं मला प्राप्त आहे. इथले लोक एखादे वेळीं बंडाळीही माजवतील असं गृहित धरूनच मला माझ्या एकंदर कारभाराची योजना आंखली पाहिजे ... लोकांच्या रोजच्या बारीकसारीक हालचालींची मला माहिती करून घेतली पाहिजे ... "

" पण मी मेयर झाल्यावर गांवांतल्या हालचालींचा तपशीलवार इत्थंभूत रिपोर्ट मीं दररोज आपणाला सादर करीनच की ! हवी असलेली सर्व माहिती गोळा करून गुपचुप कळवीत जाईन ... त्या दृष्टीनं माझा आपणाला चांगलाच उपयोग होईल ... "

" शक्य नाहीं ... " नकारार्थी मान हालवीत कर्नल म्हणाले, " मला तुमचा काडीचाही उपयोग होणं शक्य नाहीं. कारण, गांवांत कुठं काय चाललंय् ह्याची गंधवार्ता ह्यापुढें तुम्हांलाच लागणार नाहीं. मग तुम्ही मला काय माहिती सांगणार कपाळ ? तुमच्यावर कोणी विश्वास ठेवणार नाहीं. तुमच्याशीं कोणी धड बोलणार नाहीं. तुमच्या वाऱ्यालाही उभे राहायला तयार होणार नाहीं कोणी ... नाहीं म्हणायला, पैशासाठीं जगणारीं, पैशानं वश होणारीं, लोभी, लोंचट माणसं मात्र तुमचं तोंड पाहायला तयार होतील ... तुमच्या बगलेंत शिरतील. पण अखेर, तीं सुद्धां तुम्हांला दगाच देतील ! मि. कोरेल, बरोबर एखादा संरक्षक घेतल्याखेरीज तुम्ही आतां गांवांत एकटं हिंडणंफिरणंसुद्धां धोक्याचं आहे. म्हणून माझं तुम्हाला आग्रहाचं एकच सांगणं कीं तुम्ही आपलं परत राजधानीला जावं आणि इथल्या कामगिरीचं योग्य बक्षीस तिथेंच घ्यावं ... "

" पण साहेब, मी इथें स्थायिक झालोंय् ... घरदार थाटलंय् ... "

पण कोरेल ह्यांच्या ह्या बोलण्याकडे दुर्लक्षच करून कर्नलनीं आपलें बोलणें पुढें चालू केलें, " मेयर ऑर्डेन हा इथला नुसताच नामधारी मेयर नाहीं. इथल्या लोकांचा तो बहिश्चर प्राण आहे. मेयर म्हणजे लोक, नि लोक म्हणजे मेयर अशी वस्तुस्थिति आहे. लोकांचे विचार, लोकांच्या भावना समजून घेण्यासाठीं ऑर्डेनच्याच तोंडाकडे मला पाहिलं पाहिजे. त्यालाच मेयरपदावर कायम ठेवण्याखेरीज गत्यंतरच नाहीं ... केवळ मेयर ऑर्डेनवरच लक्ष ठेवल्यानें माझा सर्व कार्यभाग सहज साधणार आहे ... "

" पण आपण मला राजधानीकडे परत जायला कां सांगतां ? "

“ आपणां उभयतांच्याही हिताच्या दृष्टीनें तें इष्ट आहे म्हणून ! ”

“ तें कसं ? ”

“ पुन्हां तेंच ! अहो, माझ्या पुढील योजनेच्या दृष्टीनं विचार केला तर तुमच्यापासून मला नुकसान पोंचण्याचाच फार संभव आहे. माझ्या मार्गांत तुमचा अडथळा निर्माण होणार. लोक तुमच्याशीं दावा धरून तुमचा सूड उगवायला बघणार आणि थोडीशी जरी कुठें दंगल माजली तरी त्यांत ते प्रथम तुमचाच खून पाडणार ! कदाचित् तुमच्यापायींच ती दंगल माजणार ... म्हणजे मग तुम्ही तर फुकट मरणारच पण आमचाही कार्यनाश होणार ! म्हणून म्हणतों, तुम्ही इथें राहाण्यांत हंशील नाहीं. गांवांत तुम्हाला आतां कवडीची किंमत नाहीं. नाहक तुमच्या प्राणावर मात्र गदा यायची. तेव्हां शहाणे असाल तर तडक राजधानी गांठा ... कदाचित् तिथें तुम्हाला आणखीही मोठा चान्स मिळेल. नव्या देशांत नव्या कामगिरीवर तुम्हांला धाडून देतील. इथल्याप्रमाणेंच तिथेंही आपलं कार्य तुम्हीं जबाबदारीनें काळजीपूर्वक पार पाडलंत तर वरिष्ठांच्या विश्वासाला, विशेष प्रेमादराला पात्र व्हाल ... तुम्हाला तुमच्या कामगिरीचा मोबदलाही मोठ्या प्रमाणांत मिळेल ... जन्माचं कोटकल्याण होईल तुमच्या ... ”

“ एका अर्थी खरं आहे आपलं म्हणणं. पण साहेब, मला वाटतं, मी राजधानीकडे पाठविलेल्या माझ्या रिपोर्टाचं तिकडून काय उत्तर येतंय तें पाहावं आणि मगच जाण्याराहाण्याचं निश्चित ठरवावं ... ”

“ पाहा बुवा ! तुमच्या इच्छेला येईल तसं तुम्ही करा. मला जें कांहीं तुम्हांला सांगायचं होतं तें मी सगळं स्पष्टपणें मोकळ्या मनानं सांगून टाकलंय् ... पण एक मात्र करा — इथेंच राहाणार तर आजपासून शिरस्त्राण वापरायला लागा. घरांतून सहसा कुठें बाहेर पडूं नका. गांवांतून रात्रीं बेरात्रीं तर मुळींच हिंडत जाऊं नका. आणि मुख्य म्हणजे दारू पिणं अजिबात बंद करा. कोणत्याही स्त्रीवर, कुठल्याही माणसावर बिलकूल विश्वास ठेवूं नका. तुमचा कोण, कसा, केव्हां घात करील त्याचा नेम नाहीं. कळलं ? ... ”

आतां मात्र कोरेलना कर्नलांच्या घाबरट स्वभावाची कींवच आली. तुच्छतेचें स्मित करून ते म्हणाले, " साहेब, कांहींतरीच बोलतांय् झालं. अहो, एक प्रतिष्ठित, व्यापारी सद्गृहस्थ म्हणूनच सारा गांव मला ओळखतोय् ... माझी एक बंगली आहे ... प्रेमळ सहचरी आहे ... थोडीशी शेतवाडी आहे इथें ... इथले लोकही सज्जन, शांतताप्रिय आहेत ... "

" जगांत शांतताप्रिय लोक नाहींत. आणि तुमच्यासारख्यांशीं स्नेहभावानें वागणारे लोक तर मुळींच नाहींत. कधीं कळणार हें तुम्हांला ? शिवाय, हें सुद्धां कसं समजत नाहीं तुम्हांला कीं आम्ही हा गांव अचानक हल्ला चढवून जबरदस्तीनं ताब्यांत घेतला आहे. आणि इथल्या लोकांशीं दगलबाजी करून त्या बाबतींत तुम्ही आम्हांला मदत केलेली आहे. लोक आतां तुम्हांला विश्वास-घातकी फितुर म्हणूनच ओळखतात ... आम्ही आक्रमक नि तुम्ही आमचे साथीदार ... इथल्या लोकांशीं आमचा लढा सुरू आहे ... "

" पण आतां कसला लढा ? आपण लोकांचा पराभव केलाय् ... "

" कमाल आहे तुमच्या बथ्थड बुद्धीची ! " कोरेलांच्या मूर्खपणाची चीड येऊन कर्नल उद्गारले. पण लगेच आपला राग गिळून गंभीरपणानेंच ते सांगूं लागले, " मि. कोरेल, पराभवाचं काय घेऊन बसलांत ? पराभव ही एक तात्कालिक बाब असते. जगांत कुणाचाही कायमचा असा पराभव कधींच होत नसतो. आमचीच गोष्ट घ्या ... आजवर अनेकदां आमचा पराभव झालेला आहे. पण आज आम्ही पुन्हा जगाशीं लढायला उभे राहिलोंच की नाहीं ? सर्वत्र चढाई करून अनेक देशांवर हमखास ताबा मिळवितोंच की नाहीं ? पराभवाला महत्त्व नाहीं. पण घराघरांतून दाराआड लोकांच्या काय काय कुजबुज-कारवाया चालतात तुम्हांला ठाऊक आहे ? "

" आपणाला ठाऊक आहे ? "

" नाहीं. पण मला त्याची पूर्ण कल्पना आहे. "

" आतां जरा स्पष्टच बोलतों ... माफ करा कर्नलसाहेब ! पण आपला स्वभाव थोडासा भित्राच दिसतोय् मला ... "

" तसेंही असेल ... " कोरेलकडे तिरस्काराचा एक कटाक्ष टाकून कर्नल म्हणाले, " पण मि. कोरेल, युद्धाचा प्रत्यक्ष अनुभव मुळींच नसतांना त्या बाबतींत सर्वज्ञतेचा आव मात्र आणणाऱ्या मूर्ख लोकांची मला अगदीं मनापासून चीडच येते. "– नंतर थोडें थांबून आपली हनुवटी कुरवाळीत ते म्हणाले, " माझा एक अनुभव मी तुम्हांला सांगतों. मागल्या महायुद्धांत ब्रूसेल्समध्यें घडलेली गोष्ट ... तिथें एक वृद्ध स्त्री होती. गोड प्रेमळ मुद्रा, हातांवरील शिरा स्पष्ट दिसण्याइतके नाजुक हात, पांढरे शुभ्र केस, अंगावर नेहमीं काळी शाल, अवघी चार फूट अकरा इंच उंची ... अजून तिची मूर्ति माझ्या डोळ्यांपुढें स्पष्ट दिसते ... अत्यंत मधुर नि कंपित स्वरांत आमचीं राष्ट्रीय गाणीं ती आम्हांला गाऊन दाखवायची. उंची सिगारेट नि उत्कृष्ट पोरी कुठून कशा पैदा कराव्यात हेंही तिला चांगलं माहीत होतं ... " — आणि मग हनुवटीवरचा हात काढून, झोपेंतून एकदम खडबडून जागें झाल्यासारखें करून ते पुढें म्हणाले, " पूर्वी आमच्याच लोकांनीं तिच्या मुलाचा शिरच्छेद केला होता. पण आम्हांला नि तिलाही तें ठाऊक नव्हतं. पण तिला जेव्हां तें कळलं तेव्हां वाघिणीसारखं खवळून साध्या हॅटपिन्नें तिनें आमच्यापैकीं बाराजणांचे लागोपाठ प्राण घेतले ! अखेर, तिला गोळी घालून ठार करावं लागलं आम्हांला ... "

" मग सारं प्रकरण आपोआपच मिटलं असेल ? "

" छे ! उलट, तें प्रकरण जास्तच पेटलं. दिवसाढवळ्या भर रस्त्यांत आमच्या शिपायांचे भराभर खून पडूं लागले. शेवटीं, घाईघाईनें आम्ही त्या शहरांतून काढता पाय घेतला. पण आमच्यापैकीं मागें राहिलेल्या बऱ्याचजणांवर तिथल्या लोकांनीं भयंकर सूड उगवला. कांहींना जिवंत जाळलं, कांहींचे डोळे काढले, आणि सर्वांगाला खिळे ठोकून कित्येकांना त्यांनीं चौकाचौकांत खांबावर लटकावून ठेवलं ! "

" अशा गोष्टी बोलणं चांगलं नाहीं. " कोरेल मोठ्यांदा म्हणाले.

" अशा गोष्टी आठवणंही चांगलं नाहीं. "

" अशा गोष्टी घडण्याची धास्ती बाळगणं कमांडरला शोभत नाहीं ... "

" पण अशा प्रसंगांना तोंड कसं द्यावं तें मला ठाऊक आहे. आणि म्हणूनच गाढवासारख्या चुका माझ्या हातून होणार नाहींत. "

" आपल्या सहकाऱ्यांना ह्या अशा गोष्टी आपण सांगतां ? "

" मुळींच नाहीं. त्यांना त्या खऱ्याच वाटणार नाहींत. "

" मग मलाच हें पुराण ऐकविण्याचं कारण ? "

" तुमचं कार्य आतां संपलेलं आहे म्हणून ... असाच दुसरा एक प्रसंग मला आठवतोय् ... "

पण कर्नलसाहेब पुढें बोलणार तोंच धाड्धाड् जिना चढून खोलीचें दार धाडकन् उघडून कॅप्टन लॉफ्ट आंत आला नि लष्करी पेशाला साजेशाच दगडी, निर्विकार मुद्रेनें, रुक्ष स्वरानें म्हणाला, " साहेब, कॅप्टन बेंटिकचा खून झाला ! "

" खून—बेंटिकचा खून ? " — असें ओरडतच लेफ्टनंट टॉडर व प्रॅकल बेडरूममधून घाबऱ्या घाबऱ्या धांवून आले. कर्नल लान्सर तर क्षणभर दिङ्मूढच झाले.

इतक्यांत दोघेजण स्ट्रेचर घेऊन आले. स्ट्रेचरवर ब्लँकेटांत गुंडाळलेला बेंटिकचा मृत देह होता. कर्नलनीं खिडकीजवळ भिंतीशीं स्ट्रेचर ठेवायला सांगून लॉफ्टला विचारलें, " बेंटिक मेला आहे ह्याबद्दल तुमची खात्री आहे ? "

" होय कर्नल ! " लॉफ्टनें उत्तर दिलें.

स्ट्रेचर आणणारे निघून गेल्यानंतर कर्नलनीं गुडघे टेकून ब्लँकेटचा कोपरा जरा उचलला व लगेच खालीं केला.

" पण कुणी मारलं ह्यांना ? " कर्नलनीं लॉफ्टला विचारलें, " एकंदर हकीकत तरी काय घडली ? " त्यावर लॉफ्ट शांतपणेंच सांगूं लागले, " मी

आपल्या हुकुमावरून ह्यांना ड्यूटीवरून मोकळं केलं. हे इकडे यायला निघाले, इतक्यांत माझी व एका मग्रूर कामगाराची बाचाबाची सुरू झाली. तो कामगार काम करायचं नाकारून घरीं निघाला होता. मी त्याला अडवून कामाला लागायचा हुकूम केला. त्याबरोबर 'माझा मी स्वतंत्र आहे. मला हुकूम करणारा तूं कोण ?' असंच कांहींतरी तावातावानं तो बडबडूं लागला. पुन्हां मी त्याला धमकी देऊन हुकूम सोडतांच आपली पिकाव उगारून तो माझ्या अंगावर धांवला. त्याला आवरायला म्हणून कॅप्टन बेंटिक मध्यें पडले. आणि हा प्रकार घडला ..."

"अस्सं ! समजलं. तुम्ही आपला रिपोर्ट तयार करा. पण त्या कामगाराला अटक केली आहे ना ?"

"तत्काळ तिथल्या तिथें ..."

"ठीक आहे." असं म्हणून कर्नलसाहेब स्वतःशींच बोलल्याप्रमाणें म्हणाले, "एकूण पुन्हां सुरुवात झाली म्हणायची. आतां आम्ही ह्या कामगाराला गोळी घालणार आणि नवीन वीस शत्रू निर्माण करणार ! पण दुसरं तरी आम्ही काय करूं शकणार ? आम्हांला विरोध करणाराला ठार मारायचं एवढंच आम्ही जाणतों ..."—अन् लगेच पुन्हां लॅफ्टकडे वळून ते म्हणाले, "कृपा करून असेच लगोलग तुम्ही मेयर ऑर्डेनकडे जा आणि 'कर्नलनीं तुम्हांला ताबडतोब येऊन भेटण्याची विनंति केली आहे ... फार निकडीचं नि महत्त्वाचं काम आहे ...' असा माझा त्यांना निरोप सांगा.

"मेजर हंटरनें वर पाहिलें, आपला टांक काळजीपूर्वक पुसला आणि मखमली पेटींत ठेवून दिला.

विचारलें. त्यावर जोसेफ म्हणाला, " अग, ते इथें आज अलेक्झांडर म्हणजे मॉर्डनची चौकशी करणार आहेत. कोर्ट भरवून त्याचा खटला चालविणार आहेत इथें ... "

" अलेक्झांडर म्हणजे मॉली मॉर्डनचा नवरा ? "

" होय, तोच. त्यानं त्या एका साहेबाचा मुडदा पाडला ना ? "

" पण ॲलेक्स तर फार चांगला माणूस आहे. त्याच्यावर खटला भरण्याचा ह्या उपऱ्यांना अधिकारच काय ? "

" अग, पण त्यानं त्यांच्या माणसाला ठार मारलं ना ? "

" मारलं ! बरं मग ? ती सारी हकीकत कळलीय् मला ... तो साहेब त्याला हुकूम सोडायला लागला. त्याचं ॲलेक्स ऐकणार होय ? कोणींही त्याला हुकूम फर्मावलेलं आवडत नाहीं. तो काय कोणी भुक्कड माणूस आहे ? एका काळीं तो अडली होता. त्याचे वडीलदेखील अडली होते ... पण काय रे जोसेफ, ते आतां कोणती शिक्षा देतील त्याला ? "

" गोळी घालतील ! " जोसेफ खिन्नपणें उद्गारला.

" गोळी घालतील ? " जोसेफपुढें बोट नाचवीत ॲनी म्हणाली, " पण मी सांगतें, लक्षांत ठेव, हे लोक ॲलेक्सला गोळी तरी घालूं देत. मग पहा, नाहीं सारा गांव खवळून उठला तर नांवच बदलून देईन ! लोकांचा फार लोभ आहे ॲलेक्सवर. त्यानं आजवर कधीं तरी कोणावर हात उगारलाय् का ? "

" नाहीं ... "

" मग ? त्याच्या बाबतींतला असला भयंकर जुलूम लोक सहन करतील होय ? शक्यच नाहीं. मलादेखील सहन होणार नाहीं असला अन्याय ... "

" पण सहन न होऊन गांव काय करणार ? आणि तूं तरी काय करणार ? "

" गांव काय करील तें दिसेलच. पण मी काय करीन तें तुला सांगतें ... ह्या माझ्या हातांनीं मी त्या मेल्यांचे गळे दाबून प्राणच घेईन ! "

" मग ते तुलाही गोळी घालतील ! "

" खुश्शाल घालूं देत. पण ते जर असे ज्याला त्याला गोळ्या घालीत सुटतील तर इथें त्यांचा क्षणभरसुद्धां निभाव लागणार नाहीं . . . वातावरण भलतंच तंग होईल ... "

ॲनीच्या ह्या आवेशयुक्त बोलण्याचें जोसेफला कौतुकच वाटलें. जवळ जाऊन तो तिच्या कानाशीं पुटपुटला, " ॲनी, तुला एक गुपित सांगतों. पण तें कुठें बाहेर फोडूं नकोस हं ! "

" खूळ कीं काय ? सांग, सांग – कसलं गुपित ? " जोसेफनें आजवर कधींच कसलें गुपित ॲनीला सांगितलें नसल्यानें आज तिला विशेष उत्सुकता वाटली त्याचें तें गुपित ऐकण्याची.

जोसेफनें चहूंकडे चौकस नजरेनें पाहिलें आणि मग ॲनीच्या अगदीं तोंडाजवळ तोंड नेऊन सांगितलें, " विल्यम डील नि वॉल्टर डॉगेल काल रात्रीं पसार झाले ... "

" पसार झाले ? कुठें ? कसे ? "

" कोळशाच्या बोटींतनं इंग्लंडला ! "

" सगळ्यांना ठाऊक आहे हें ? "

" हो, पण वरच्या मंडळींना मात्र ठाऊक नाहीं ... " छताकडे चटकन् आंगठा करीत जोसेफ म्हणाला.

" पण मला कशी कळली नाहीं ही गोष्ट ? "

" अग , तुझ्या उद्योगांत तूं ... " असें म्हणून जोसेफनें पुन्हा ॲनीला थंडपणानें हलक्या आवाजांत सांगितलें , " तसंच दुसरं , कोरेल आतां फार दिवस जिवंत राहात नाहीं ... "

" म्हणजे ? काय म्हणतोस ? " आश्चर्यचकित होऊन ॲनी उद्गारली.

" लोक म्हणतात तेंच मी म्हणतोंय् ... "

ॲनीनें एक समाधानाचा निःश्वास टाकून म्हटलें, " अस्सं ! छा ऽऽ न ! "

" लोक आतां स्वस्थ राहाणार नाहींत ... " जोसेफ म्हणाला, " खात्रीनं कांहींतरी हालचाल करणार ... परक्यांची गुलामगिरी त्यांना खपणार नाहीं ... तूं डोळ्यांत तेल घालून तयार राहा ... भयंकर घडामोडी होणार आहेत आणि तुलाही त्यांत भाग घ्यावा लागणार आहे ! "

" पण मेयरसाहेब काय करणार ? त्यांचा विचार काय आहे ? "

" तें कसं कळणार ? "

" पण ते लोकांविरुद्ध ... आपल्याविरुद्ध खास जाणार नाहींत ... "

" त्यांचं कांहींच कळत नाहीं. बोलतच नाहींत ते ... " — पण तितक्यांत डाव्या बाजूच्या दरवाजानें खुद्द मेयरच डॉ. विंटरसह दिवाणखान्यांत आल्या-मुळें जोसेफचें बोलणें तितकेंच राहिलें.

दिवाणखान्यांत पाऊल ठेवतांच मेयरसाहेबांनीं चहूंकडे नजर नाचवीत म्हटलें, " वा जोसेफ ! आतां सगळं ठीक, व्यवस्थित झालं ... थँक्यू ॲनी ! "

जोसेफ नि ॲनी दोघेंही तेथून निघून गेलीं. पण जोसेफनें जातांना दार ओढून घेण्यापूर्वी मेयरसाहेबांच्या खिन्न, संत्रस्त मुद्रेकडे एक ओझरता कटाक्ष टाकला.

मेयर ऑर्डेन डॉ. विंटरना म्हणाले, " डॉक्टर, हें मेयरपद आतां फार दिवस मला लाभेलसं दिसत नाहीं ... परिस्थितीच तशी चमत्कारिक आली आहे. शत्रूचा तर माझ्यावर मुळींच विश्वास नाहीं. आणि मला वाटतं, लोकांचींही मनं माझ्याविषयीं जरा साशंकच बनत चाललीं आहेत ... "

" पण तुझ्या मनांत तर कसलाही संदेह नाहीं ना ? स्वतःवरचा तुझा विश्वास अढळ आहे ना ? "

" अलबत् ! एकच गोष्ट मी जाणतों ... मी मेयर आहें ! पण मला हें कळत नाहीं ... " टेबलाकडे बोट दाखवीत मेयर म्हणाले, " ही चौकशी इथें करण्याचं कां ठरविलं आहे त्या लोकांनीं ? खुनाच्या आरोपाखालीं अलेक्झांडर मॉर्डनचा खटला इथं चालणार ... तुला ठाऊक आहे ना ॲलेक्स ? ... त्याची ती सुंदर बायको मॉली ... "

" ठाउक आहे तर ... शाळेंत शिक्षकीण होती मॉली ... आणि इतकी देखणी आहे ती कीं डोळे बिघडलेत तरी चष्मा लावणं तिच्या जिवावर येतंय् ... ॲलेक्सच्या हातून कॅप्टन बेंटिक ठार झाला, ही गोष्ट सूर्यप्रकाशा इतकी स्पष्ट आहे ... "

" मग हें न्यायाचं नाटक कशाला हवं ? ॲलेक्सला एकदम गोळी घालून कां मोकळे होत नाहींत ते लोक ? चौकशीचा फार्स कशाला करताहेत ? "

" जगाला दाखवायला ! दुसरं काय ? आणि व्यवहाराच्याही दृष्टीनं त्यांचं तत्त्व बरोबर आहे. वरवरल्या देखाव्यालाच सर्वसाधारणपणें लोक भाळतात. कायदेशीरपणाचा आव आणून आपणांला न्यायाची कदर आहे, असं भासविलं कीं लोकांचंही समाधान होतं ... "

" पण मी म्हणतों, हें सारं इथें माझ्या वाड्यांत बसून कशाला ? "

" वा ! त्यांतच तर खरा मुत्सद्दीपणा आहे. तुझ्या न्यायबुद्धीवर लोकांचा पूर्ण विश्वास आहे. आणि ह्याच गोष्टीचा फायदा घेण्यासाठीं ॲलेक्सच्या खटल्याचा फार्स तुझ्यासमक्ष तुझ्याच वाड्यांत करायचा ! म्हणजे योग्य न्याय झाल्याचीच लोकांची समजूत होणार ! ॲलेक्सनं कॅप्टनचा खून केला, ही गोष्ट तुला माहीत आहे, मान्यही आहे. तेव्हां परस्पर मेयरला पुढें करून कर्नल लान्सर नामानिराळा राहणार ! "

" पण ही तर संभावित सोदेगिरी आहे ! " मेयर चिडून बोलले.

" छे छे ! ही तर जेत्यांची सामान्य राजनीति आहे ! " डॉ. विंटर कडवटपणानेंच म्हणाले.

इतक्यांत उजवीकडल्या दारानें तिशीच्या सुमाराची एक अतिशय देखणी स्त्री आंत आली. तिनें आपला चष्मा हातांत काढून घेतला होता. तिचा पेहराव साधाच पण नीटनेटका होता. तिची मुद्रा मात्र अत्यंत खिन्न, चिंतातुर दिसत होती. येतांक्षणींच मेयर ऑर्डेनना उद्देशून ती म्हणाली, " ॲनींनंच मला इथें येऊन आपणांला भेटायला सांगितलं ... "

" ॲलेक्सची बायको मॉली मॉर्डिन तूं! होय ना?" मेयरनीं विचारलें.

" होय. ॲलेक्सची चौकशी करून आज त्याला देहान्त शासन देणार आहेत, असं म्हणतात तें खरं का? ... आणि आपण स्वतःच ही सजा त्याला फर्मांविणार आहांत म्हणे!"

" कोण? मी?" मेयरनीं चकित होऊन विचारलें, " सांगितलं कुणी तुला हें?"

" गांवांतल्या लोकांनीं!" – आणि मग अत्यंत आर्जवी स्वरांत डोळ्यांत पाणी आणून मॉलीनें विचारलें, " पण मेयरसाहेब, आपण असं करणार नाहीं ना?"

" पण मला स्वतःलासुद्धां माहीत नसलेली ही गोष्ट लोकांना कशी कळली?" मेयरनें विस्मयानें विचारलें.

" हेंच तर मोठं गहन कोडं आहे." डॉ. विंटर म्हणाले, " आणि हें कोडं जगांतल्या मी मी म्हणविणाऱ्या राज्यकर्त्यांना अजून उलगडलेलं नाहीं! लोकांना कसं कळतं? सेन्सॉरशिपच्या कैचींतून, वृत्त-नियंत्रणाच्या मुस्कटदाबींतून, पद्धतशीर प्रचारतंत्रांतून निर्भेळ सत्य बाहेर कसं निसटतं आणि तें लोकांना अचूक कसं कळतं, हाच अत्यंत कठीण प्रश्न आहे... आपल्या शत्रूलाही तो आतां सतावून सोडीत आहे... लोकांना सत्य कसं कळतं?"

बाहेर अंधारून आल्यामुळें हॉलमधला प्रकाश मंदावला. मेयरनीं खिडकींतून बाहेर डोकावून पाहिलें आणि " दांडगेच ढग आलेत ... पण पांगतील लवकरच वाऱ्यानं ..." असें पुटपुटत त्यांनीं टेबलावरच्या दिव्याचें बटन दाबलें. पण त्याचाही प्रकाश मंदच पडल्यानें तो मालवून ते म्हणाले, " बिजलीच्याही बत्तीचा उजेड दिवसा फिकटच दिसतो. खरं ना डॉक्टर?"

डॉक्टरांचें लक्ष मॉलीकडे होतें. मॉलीनें मेयरांच्या जवळ जाऊन म्हटलें, " साहेब, आपणांला ठाऊकच आहे... ॲलेक्स असे खुनाचा अत्याचार करणाऱ्यांपैकीं नाहींत. स्वभावानं थोडे तापट आहेत ते, पण असं बेकायदा

वर्तन त्यांच्या हातून कधींही घडणार नाहीं ... आजवर घडलेलंही नाहीं. ते तसे सन्मान्य सद्गृहस्थ आहेत ..."

मेयरनीं मॉलीच्या खांद्यावर हात ठेवून मृदु स्वरांत म्हटलें, " मॉली, हें का मला सांगायला हवं ? ॲलेक्स लहान पोर होता तेव्हांपासून मी त्याला पाहातोंय्. त्याचीच काय पण त्याच्या वडिलांची, आजोबांचीही मला चांगली माहिती आहे. तुला कदाचित् ठाऊक नसेल, ॲलेक्सचा आजा अस्वलांची शिकार करण्यांत पटाईत होता ..."

पण मेयरसाहेबांच्या ह्या बोलण्याकडे मॉलीचें मुळींच लक्ष नव्हतें. तिनें पुन्हां विचारलें, " ॲलेक्सना आपण नाहीं ना शिक्षा करणार ?"

" नाहीं, नाहीं ! मी त्याला कां म्हणून देहान्ताची शिक्षा करीन ?"

" पण लोक म्हणतात कीं शांततेसाठीं, शिस्तीसाठीं म्हणून आपण ... "

" पण मॉली, लोकांना शांतता, शिस्त हवी आहे का ?"

" तें मी काय सांगूं ? मात्र पूर्ववत् स्वातंत्र्य हवं आहे लोकांना !"

" पण तें कसं मिळवावं हें त्यांना ठाऊक आहे का ? सशस्त्र शत्रूशीं निःशस्त्र स्थितींत कसा सामना द्यायचा हें त्यांना कळतंय् का ?"

" मला नाहीं वाटत लोकांना निःशस्त्र प्रतिकाराचा मार्ग माहीत असेल असं ..."

" पण तुला तो ठाऊक असेल तर तूं सांग ... तूं भारी बुद्धिवान्, चलाख मुलगी आहेस ..."

" मलाही कांहीं माहित नाहीं " मॉली म्हणाली , " पण कांहींच हालचाल न करतां असेच आपण नेभळ्यासारखे नमून वागत राहिलों तर शत्रु आपल्या छाताडावर कायमचा नाचत राहील, असं मात्र लोकांना वाटूं लागलंय् ... आणि म्हणून शत्रूला आपलं सामर्थ्य पटवून देण्याचा त्यांचा ठाम निर्धार झालाय् ... "

" लढायची खरी संधीच मिळाली नाहीं आमच्या लोकांना ... मशीन-गनवर उडी घेणं म्हणजे कांहीं लढणं नव्हे ... " डॉ. विंटर म्हणाले.

" पण मॉली, लोकांचे बेत तुला कळलेच तर ते तूं मला येऊन कळवशील का ? "

" हो–हो ! " मेयरसाहेबांच्याकडे संशयाच्या नजरेनें पाहात मॉली जरा चांचरतच बोलली.

मेयर म्हणाले, " तूं कांहीं मनापासून होकार देत नाहींस ... माझ्यावर तुझा विश्वास दिसत नाहीं ... "

" तसं नव्हे ! आपणांवर माझा पूर्ण विश्वास आहे ... पण ... पण ॲलेक्सना आपण देहान्त शासन नाहीं ना देणार ? " मॉलीनें कळवळून विचारलें.

" नाहीं देणार ! मघाशींच तुला सांगितलं ... देहान्ताची काय, कोणतीही शिक्षा मी ॲलेक्सला देणार नाहीं. कारण, आपल्या लोकांचा त्यानें कसलाच गुन्हा केलेला नाहीं. "

अश्रुपूर्ण दृष्टीनें मेयरसाहेबांचे आभार मानून मॉली निघून गेली. तोंच जोसेफ घाईघाईनें येऊन सांगूं लागला, " साहेब, आपणांला भेटायला आत्तां कर्नलसाहेब येणार आहेत ... मघाशींच ते येणार होते. पण आपण कामांत आहांत असं मी त्यांना सांगितलं ... मॉली इथें होती ना म्हणून ... आणि बाईसाहेबांनाही आपणांला भेटायचं आहे ... "

" इंकडेच यायला सांग तुझ्या बाईसाहेबांना ... " पण मेयरसाहेबांचा हा निरोप जोसेफनें पोंचविण्यापूर्वीच बाईसाहेब तोंडाचा पट्टा सोडीत तिथें आल्या.

" हें असंच किती दिवस चालणार ? ॲनी तर अगदीं कंटाळून गेली आहे. इतक्या लोकांचं सैंपाकपाण्याचं काम आपल्या हातून साफ होणार नाहीं, असं तिनें मघाशींच सांगितलं मला ... दिवसांतून दहादां चहा नि फराळ नि कॉफी ! काय मक्ता घेतलाय् आम्ही ह्या लोकांचा ? तें कांहीं नाहीं ... आपली जेवणाची सोय बाहेर बघा म्हणून स्पष्ट सांगून टाका त्यांना ... "

" हो, पण जरा हळूं ... "

अनुक्रम
विभाग

" काय करावं तेंच कळत नाहीं ... "

" हळूं बोला ... " मेयर हळूंच म्हणाले, " आणि हें बघ सारा, ॲलेक्स मॉर्डेनच्या घरीं जाऊन मॉलीजवळ बसून राहा ... तिच्याशीं अवाक्षर बोलूं नकोस ... पण ... "

" पण मला माझीं हजार कामं आहेत ... "

" पण माझं ऐकणार ना ? मॉलीला एकटी सोडूं नको कुठें ... आज आतां तिच्या नवऱ्याचा खटला चालणार आहे इथें ... "

" समजलं, जातें मी. पण हें सगळं संपणार केव्हां ? "

" तें मी काय सांगूं ? पण सारं आवरलं कीं ॲनीला पाठवून देईन ... " मेयर म्हणाले.

" बरं " म्हणून बाईसाहेब निघून गेल्या. मेयरनीं जोसेफकडून कर्नलना बोलावून घेतलें.

" गुड मॉर्निंग, युअर एक्सलन्सी ! " असें म्हणत कर्नलसाहेब आले. त्यांच्या अंगांत कडकडीत इस्त्रीचा युनिफॉर्म असून कमरेला नक्षीचा छोटा खंजीर लटकत होता.

" मेयरसाहेब, मला तुमच्याशीं कांहीं खासगी बोलायचं आहे ... " डॉ. विंटरकडे कटाक्ष फेकीत कर्नल म्हणाले, " मला तुमच्या एकट्याशींच बोलायचं आहे ... "

हें ऐकून डॉ. विंटर मुकाट्यानें उठून चालायला लागले. ते दारापाशीं गेले तोंच मेयरनीं जवळ जाऊन त्यांना म्हटलें,

" डॉक्टर ! संध्याकाळीं येणार ना ? "

" कां ? कांहीं विशेष काम ? ... "

" छे ! काम कसलं ? नेहमींप्रमाणं ... एकट्याला करमत नाहीं मला ... "

" अच्छा ! येईन येईन. "

" डॉक्टर, मॉलीबद्दल तुला काय वाटतं ? "

" कां ? ठीक आहे की ती ... जरा हिस्टेरियासारखं झालंय् तिला ... पण कसं झालं तरी ती शूर केंडर्ली घराण्यांतली आहे ..."

" होय ! तें मी विसरलोंच ... " असें म्हणून डॉ. विंटर बाहेर गेल्यावर मेयरनीं दार लावून घेतलें. टेबलखुर्च्यांकडे पाहात कर्नल लान्सर म्हणाले, " काय सांगूं मेयरसाहेब ! एकंदर प्रकाराबद्दल मला अत्यंत वाईट वाटत आहे ... पण करणार काय ? तो प्रसंगच घडला नसता तर किती बरं झालं असतं ! "

मेयरनीं किंचित् लवून कर्नलना अभिवादन केल्यासारखें केलें. लान्सर पुढें बोलूं लागले.

" मला तुमचा स्वभाव फार आवडतो. अतिशय आदर आहे मला तुमच्याबद्दल. पण हें कटु कर्तव्य मला केलंच पाहिजे. माझ्या मनःस्थितीची कल्पना तुम्हांला येईलच ... "

कांहींच न बोलतां मेयरनीं फक्त आपली नजर कर्नलांच्या नजरेशीं खिळविली होती.

" आम्ही एकएकटे आणि केवळ आमच्या स्वतःच्या विचारानुसार वागत नसतों. " एवढें बोलून मेयर कांहींतरी बोलतील ह्या अपेक्षेनें कर्नल थांबले. पण मेयर कांहींच बोलत नाहींत असें पाहून ते पुढें बोलूं लागले, " आम्हांला आमचे राजधानींतले कायदे पाळावे लागतात. त्या इसमानें आमच्या अधिकाऱ्याचा खून केला ... "

" मग तुम्हीं त्याला तिथल्या तिथें गोळी कां नाहीं घातलीत ? खटल्याचा एवढा खटाटोप आरंभण्याचं कारणच काय होतं ? " मेयरनीं अखेर खडसावून विचारलें.

" छे-छे ! मेयरसाहेब, तसं करून कसं चालेल ? भावी गुन्हेगारांना अत्याचारापासून परावृत्त करणं हाच शिक्षेचा मुख्य उद्देश असतो. ही गोष्ट माझ्याप्रमाणें तुम्हांलाही ठाऊकच आहे. म्हणून प्रत्यक्ष गुन्हेगारापेक्षां इतरांच्या मनांत दहशत निर्माण करण्यासाठींच मुख्यतः शिक्षा द्यायची असल्यानें तिची

जास्तींत जास्त जाहिरात करावी लागते. कित्येकदां तर अतिशय नाट्यपूर्ण पद्धतीनें त्या शिक्षेचा प्रचंड गाजावाजाही करावा लागतो." असें म्हणून कर्नलनीं कमरेच्या पट्ट्यांत बोट घालून खंजीर हलविला. खिडकींतून बाहेर अंधारलेल्या आकाशाकडे पाहात मेयर स्वतःशींच उद्‌गारले, " आज रात्रीं बहुतेक हिमवृष्टि होणार!"

कठोर स्वरानें कर्नल पुढें बोलूं लागले, " मेयरसाहेब, आम्हांला फार कडक हुकूम आहेत. कसंहि करून आम्हांला इथला कोळसा मिळालाच पाहिजे. तुमचे लोक जर शांततेनें, व्यवस्थितपणानें वागले नाहींत तर आम्हांला जबरदस्तीनं जरूर ती शांतता प्रस्थापित करावी लागेल. वेळप्रसंगीं गोळीबार करून लोकांना ठार मारायलाही आम्ही कचरणार नाहीं. आणि म्हणूनच हा अनर्थ टाळून तुम्हांला जर आपल्या लोकांचे प्राण वांचवायचे असतील तर शांतता प्रस्थापित करण्याच्या कामीं तुम्हीं आम्हांला मदत केली पाहिजे ..."

" पण हा ॲलेक्सचा खटला इथें माझ्या वाड्यांत कां?" मेयरनीं मध्येंच विचारलें.

" स्थानिक अधिकाऱ्यांकडूनच व्याप्त देशांतील गुन्हेगारांना शिक्षा ठोठावाव्यात, असं आमच्या सरकारचं धोरण आहे. आणि सुव्यवस्थेच्या दृष्टीनं तें इष्टच असल्याचं आमच्या अनुभवाला आलेलं आहे."

" अस्सं! म्हणजे लोकांना समजलंय् तें खरंच म्हणायचं! एकंदरींत, चौकशी संपल्यानंतर ॲलेक्सला मी स्वतःच फांशीची शिक्षा सुनवावी अशी तुमची इच्छा आहे ..."

" होय. असं झालं तरच पुढचा पुष्कळसा रक्तपात टळणार आहे."

टेबलाजवळची एक खुर्ची खसकन् ओढून मेयरनीं तिच्यावर आसन ठोकलें. कर्नल त्यांचेसमोर उभेच होते. मेयर ऑर्डेन न्यायाधीश आणि कर्नल लान्सर गुन्हेगार, असेंच तें दृश्य दिसत होतें. टेबलावर बोटें आपटीत मेयर बोलूं लागले, " कर्नल लान्सर! तुम्हांला नि तुमच्या सरकारला काडीची अक्कल नाहीं. लोकांचीं अंतःकरणं तुम्हांला कधींच ओळखतां आलीं नाहींत.

आणि म्हणूनच शतकानुशतकं तुमच्यावर प्रचंड पराभवांचे प्रसंग लागोपाठ कोसळलेले आहेत. पराभव सोसण्याचा विक्रम अजूनपर्यंत जगांतल्या कुठल्याही देशानं तुमच्याइतका केलेला नाहीं ... " नंतर थोडें थांबून ते म्हणाले, " हें तुमचं हुकूमशाहीचं धोरण सर्वस्वीं अनिष्ट आहे, चुकीचं आहे. तें कालत्रयीं यशस्वी होणं शक्य नाहीं ... मी ॲलेक्सला शिक्षा सुनावूं ? अगदींच अशक्य ! ... एक तर, मी इथला मेयर आहें. कोणालाही देहान्त शासन देण्याचा मला अधिकार नाहीं. मलाच काय, आमच्याकडे तसा अधिकार कोणालाच नाहीं. त्यांतूनही मी माझ्या अधिकाराचं अतिक्रमण करून त्याला देहान्त शासन फर्मावलंच तर तुमच्याप्रमाणेंच मी सुद्धां बेकायदेशीर वर्तन केल्यासारखंच होईल ! ... "

" बेकायदेशीर वर्तन ? आणि आमच्याप्रमाणें ? म्हणजे ? "

" तुम्हीं आल्याबरोबर गांवांतल्या आमच्या सहा बेगुन्हा इसमांना ठार मारलंत. आमच्या कायद्याप्रमाणें तुम्ही सारेजण खुनी गुन्हेगार आहांत ! तेव्हां हा कायदेशीरपणाचा खुळचट प्रश्न काढूंच नका कर्नलसाहेब ! तुमच्या आमच्यांत आतां कायदा उरलाच आहे कुठें ? कारण, आतां आपली एकमेकांची लढाई जुंपली आहे ! तुम्हीं तरी आम्हां सर्वांची कत्तल कराल किंवा आम्हीं तरी तुम्हां सर्वांचा योग्य वेळीं फडशा पाडून नायनाट करूं ! आमच्या देशांत तुम्हीं प्रथम पाऊल टाकलंत त्याच वेळीं कायद्याला सपशेल पायाखालीं तुडविलंत ! इथें आतां नवीनच कायदा सुरू झाला आहे. समजलं ? "

" मी खुर्चीवर बसूं का ? " कर्नलनीं विचारलें. त्यावर लगेच मेयर उसळून म्हणाले, " हाच, हाच तो तुम्हां लोकांचा दांभिकपणा ! खुर्चीवर बसायला तुम्हांला माझी परवानगी कशाला हवी ? मनांत आणाल तर तुम्हीं मलाच ह्या खुर्चीवरून उठवूं शकाल ना ? "

" छे-छे ! मेयरसाहेब ! आपण काय बोलतां हें ? विश्वास ठेवा अगर ठेवूं नका. पण मी आपणाला मनःपूर्वक सांगतों, कीं व्यक्तिशः तुमच्याबद्दल व तुमच्या ह्या हुद्याबद्दल माझ्या मनांत अत्यंत आदरच आहे. " कर्नलनीं

क्षणभर डोळे मिटून डाव्या हातानें आपलें डोकें गच्च दाबून धरलें नि मग म्हटलें, “ मेयरसाहेब, माझ्या वयाच्या मानानं मला बरेच बरेवाईट अनुभव आजवर जगांत आलेले असले तरी मी एक सामान्य माणूस आहें ... व्यक्ति ह्या नात्यानं मी तुमच्या सर्व विचारांशीं सहमत होऊं शकेन पण त्याचा काय उपयोग आहे ? माझ्या लष्करी पेशाला आणि मी स्वीकारलेल्या राजकीय भूमिकेला कांहीं विवक्षित तत्त्वप्रणालींची नि विशिष्ट परंपरेच्या बंधनांची मर्यादा आहे आणि ती अनुल्लंघनीय अशीच आहे. ”

“ पण ही तुमची राजकीय तत्त्वप्रणाली नि परंपरा जगाच्या प्रारंभापासून प्रत्येक वेळीं चुकीची नि आत्मघातकीपणाचीच ठरत आलेली आहे ! ”

“ बरेचसे अनुभव आल्यामुळें मला एकवेळ तुमचं म्हणणं मान्य होईल. इतकेंच नव्हे, तर मी असेंही म्हणेन, कीं मागील अनुभवांवरून धडा न घेणं आणि मानवी संहार करणं हेंच आपलं कर्तव्य समजून त्यापलीकडे दूरदृष्टीनें बघण्यास असमर्थ बनणं, हीच आमच्या लष्करी मनोवृत्तीची व राजकीय भूमिकेची एकमेव प्रवृत्ति आहे. पण मागील आठवणींनीं विरघळून जाणारा मी नव्हे ... त्या कामगाराला सर्व लोकांसमक्ष जाहीर रीतीनें गोळी घालून ठार केलंच पाहिजे. तुमच्या सर्व लोकांना दहशत बसावी आणि इतःपर त्यांनीं आमच्या माणसांना ठार मारण्याचा अत्याचार करूं नये एवढ्याचसाठीं असं करणं भाग आहे. ”

“ अस्सं ? मग आतां जास्त कांहीं बोलण्याची जरूरीच नाहीं. ”

“ तें कां ? आम्हांला तुमची मदत पाहिजे. तुम्हीच गुन्हेगाराला सजा फर्मावली पाहिजे ... ”

“ असं म्हणतां ? पण मला आधीं सांगा – आमच्या गांवांत प्रवेश केल्या-बरोबर तुम्ही मशीनगन्स् चालवून आमच्या सहा इसमांना ठार मारलंत ! त्यावेळीं तुमचे किती सैनिक होते मशीनगन्सवर ? ”

“ फार तर वीस ! ”

“ अच्छा ! त्या वीस सैनिकांना प्रथम तुम्ही गोळ्या घाला म्हणजे मग मी ॲलेक्स मॉर्डेनला सजा फर्मावीन ! ”

“ मेयरसाहेब, हें तुम्ही चेष्टेनं तर बोलत नाहीं ना ? ”

“ मुळींच नाहीं, न्यायाच्या दृष्टीनें योग्य तेंच बोलतोय् मी. ”

“ पण तुम्हाला ठाऊक आहे, आमच्याकडून असं होणं कधींही शक्य नाहीं. ”

“ होय ना ? मग तुम्ही मागतां ती मदतही तुम्हांला माझ्याकडून मिळणं शक्य नाहीं ! ”

“ वाटलंच होतं मला ... शेवटीं कोरेललाच मेयर करावं लागणारसं दिसतंय् ... ” असें तोंडांतल्या तोंडांत पुटपुटून कर्नलनीं मेयरनां विचारलं, “ खटल्याच्या वेळीं हजर तरी राहाल ना ? ”

“ अवश्य ! ॲलेक्सला अगदीं एकटें एकटें वाटूं नये म्हणून मी अवश्य हजर राहाणार आहें ... ”

कर्नल लान्सरनीं खिन्नपणें हसून म्हटलें, “ एवींतेवीं आम्ही ही कामगिरी पतकरली आहे खरी ... ”

“ पण ती निर्विघ्नपणें तडीला जाणं कदापि शक्य नाहीं. ”

“ म्हणजे ? तुमच्या बोलण्याचा मतलब ? ”

“ माणसाचा तेजोभंग करून त्याचं आत्मिक बल कायमचं नष्ट करून टाकण्याचं हें तुमचं खुळेपणाचं धोरण कल्पांतींही यशस्वी होणें शक्य नाहीं ! ”

एवढें बोलून मेयरनीं आपली नजर टेबलाकडे वळविली आणि वर न पाहातांच म्हटलें, “ रात्र पडायची वाट न पाहातां आत्तांच हिमवृष्टि सुरू झालीय् ... हिमाचा मधुर शीतल सुगंध मला मनापासून आवडतो ... ”

# ४

अकरा वाजण्याच्या सुमारास जोराची हिमवृष्टि सुरू होऊन आकाशाचें दर्शनही दुर्लभ झालें. प्रत्येक घरासमोर, बाजार चौकांतील पुतळ्यावर बर्फाचे ढीग सांचले होते. खाणीपासून बंदरापर्यंत रुळावर बर्फाचे थर सांचल्यामुळें कोळशाच्या हातगाड्या आपोआपच ढकलल्या जात होत्या. हिमवर्षाव चालला होता तरी रस्त्यांवरून लोकांची रहदारी सुरूच होती. आकाश अभ्राच्छादित असल्यामुळें सर्वत्र उदास, शामल छाया पसरली होती. लोकांचीं मनेंही विषण्ण विचारांनीं झाकळून गेलीं होतीं. वाढत्या द्वेषाचें आणि विचित्र उदासीनतेचें रुक्ष वातावरण सर्व गांवांत फैलावलें होतें. लोक रस्त्यांत फारसे रेंगाळत राहातच नव्हते. काम संपलें कीं चटकन् आपल्या घरीं जाऊन दार बंद करून बसत आणि मग शत्रूच्या पलटणी किंवा पाहारेवाल्या शिपायांच्या मोटरी रस्त्यानें जाऊं लागल्या कीं दारांच्या फटींतून व खिडक्यांच्या पडद्यांआडून असंख्य खुनशी थंड नजरा त्यांच्यावर रोखलेल्या दिसत.

मेयरसाहेबांच्या वाड्यांतील दिवे लागले होते. आणि खिडक्यांवाटें त्यांचा प्रकाश बाहेरच्या बर्फावर चमचमत होता. ॲलेक्सच्या खटल्याचें काम सुरू झालें होतें. टेबलाच्या एका टोकाला मध्यभागीं कर्नल लान्सर बसले होते. त्यांच्या उजव्या हाताला मेजर हंटर व त्याच्या पलीकडे लेफ्टनंट टॉडर बसला होता. कॅप्टन लॉफ्ट अगदीं एका टोकाला असून त्याच्या पुढ्यांत कागदपत्रांचा ढीग पडला होता. कर्नल लान्सरच्या डाव्या बाजूला लॉफ्टसमोर मेयर ऑर्डेन बसले होते आणि त्यांच्याच शेजारीं कागदाच्या पॅडवर कांहीं तरी खरडीत लेफ्टनंट प्रॅकल बसला होता. टेबलापासून थोड्या अंतरावर लाकडी पुतळ्यांप्रमाणें दिसणाऱ्या दोन सशस्त्र शिपायांच्या मध्यें हातकड्या घातलेला ॲलेक्स मॉर्डेन उभा

होता. धीरगंभीर मुद्रेचा तो एक उंचापुरा उमदा जवान होता. धिप्पाड देहयष्टि, रुंदट छाती, भरीव खांदे, भव्य कपाळ, खोल, बारीक पण तीक्ष्ण डोळे, लांब तरतरीत नाक, रुंद जिवणी, निश्चयी स्वभाव दर्शविणारी हनुवटी असा त्याचा एकंदर चेहरामोहरा होता. अंगांत उघड्या गळ्याचा निळा शर्ट, त्यावर जुना कळकट कोट आणि पायांत निळी विजार एवढाच त्याचा पोषाख होता.

कॅप्टन लॉफ्ट एका कागदावरून वाचूं लागला, " 'कॅप्टन लॉफ्ट ह्यांचा हुकूम अमान्य करून आरोपीनें काम करण्याचें नाकारलें आणि पुन्हा हुकूम दिल्या-बरोबर आरोपीनें हातांतल्या पिकावानें कॅप्टन लॉफ्टवर हल्ला केला. तितक्यांत चपळाईनें मध्यें पडून कॅप्टन बेंटिकनीं आरोपीला अडविलें'..." ह्यावेळीं मेयर खांकरल्यामुळें कॅप्टन लॉफ्ट वाचतां वाचतां मध्येंच थांबून त्यांच्याकडे पाहूं लागला. मेयर ॲलेक्सला म्हणाले, " अरे, खालीं बैस ना! असा उभा किती वेळ राहाणार? शिपाई, खुर्ची दे पाहूं ..."

शिपायानें मुकाट्यानें ॲलेक्सजवळ एक खुर्ची आणून ठेवली. तें पाहून लॉफ्ट म्हणाला, " आरोपीनें उभंच राहिलं पाहिजे असा कोर्टाचा रिवाज आहे ... "

" बसूं दे हो त्याला ... " मेयर म्हणाले, " आरोपी उभा होता असं तुम्ही रिपोर्टात तेवढं लिहा म्हणजे झालं ..."

" पण असे खोटे रिपोर्ट लिहिण्याची वहिवाट नाहीं ... " पण लॉफ्टच्या ह्या गुरगुरण्याकडे लक्षच न देतां मेयरनीं ॲलेक्सला बसायला पुन्हा सांगितलें. ॲलेक्स खुर्चीवर बसला. लॉफ्ट लगेच ओरडला, " हें तर कोर्टाच्या शिस्तीविरुद्ध आहे ... "

पण तितक्यांत कर्नलच म्हणाले, " बसूं दे त्याला. कांहीं हरकत नाहीं. "

लॉफ्टनें ॲलेक्सकडे एकदां रागानें पाहिलें आणि घसा साफ करून पुढें वाचायला सुरुवात केली, " 'कॅप्टन बेंटिकनीं आरोपीला अडवितांच त्यांच्या मस्तकांत आरोपीच्या पिकावाचा घाव बसला आणि मस्तकाची कवटी तत्काळ फुटून गेली ...' मेडिकल् रिपोर्ट सोबत जोडलेला आहे. वाचून दाखवूं?"

" कांहीं जरुरी नाहीं ... शक्य तितक्या लवकर आटपा सारं ..." कर्नल म्हणाले.

कॅप्टन लॉफ्ट पुढें वाचूं लागला, " ' हा सारा प्रकार आमच्या कित्येक शिपायांनीं प्रत्यक्ष डोळ्यांनीं पाहिलेला असून त्यांचे जबाब सोबत हजर केलेले आहेत. एकंदर साक्षीपुराव्यावरून आरोपीनें कॅप्टन बेंटिकचा खून केला असं शाबीत होत आहे. तरी ह्या लष्करी कोर्टानें आरोपीला देहान्त शासन द्यावं अशी शिफारस आहे ' ... शिपायांचे जबाब वाचून दाखवूं ?"

' नको ' असें म्हणून कर्नलनीं ॲलेक्सला विचारलें, " तुला गुन्हा कबूल आहे ?"

ॲलेक्स खिन्नपणें हसून म्हणाला, " हातांतल्या पिकावाचा मीं जोराचा तडाखा दिला खरा पण तो कुणाला कुठें लागला नि कोण मेलं तें मला माहीत नाहीं. "

" शाबास ॲलेक्स ! छान उत्तर दिलंस !" मेयर उद्गारले.

कॅप्टन लॉफ्टनें विचारलें, " म्हणजे ? कॅप्टन बेंटिकचा खून तुझ्या हातून झाला नाहीं, असं का तुला म्हणायचं आहे ?"

" मला कांहींच माहीत नाहीं. मीं त्याला फक्त एक फटका मारला नि लगेच मलाही कुणीं तरी तडाखा हाणला ..."

" तुला आणखी कांहीं सांगायचं आहे ?" असें विचारून कर्नलनीं पुढें म्हटलें, " तूं कांहींही सांगितलंस तरी ठरलेल्या निकालांत मुळींच बदल होणार नाहीं. पण आम्ही तुझं म्हणणं ऐकून घेऊं ... "

लगेच लॉफ्ट म्हणाला, " कर्नल, आपण असं बोलायला नको होतं. कारण, अशा बोलण्यानें कोर्ट निःपक्षपाती नाहीं असा विनाकारणच गैरसमज होण्याचा संभव आहे ... "

हें ऐकून मेयर उगीचच रुक्षपणें हसले. त्यांच्याकडे पाहून स्मित करून कर्नलनीं पुन्हा ॲलेक्सला विचारलें, " कांहीं सांगायचं आहे का तुला ?"

ॲलेक्सनें हात वर करण्यासाठीं उचलतांच दुसराही हात बेडीमुळें आपो-आपच उचलला गेला. पुन्हा पूर्ववत् हात मांडीवर ठेवून ॲलेक्स बोलूं लागला, " मी रागानें बेभान झालों होतों. माझा स्वभाव मानी नि तापट आहे. मी स्वतंत्र माणूस आहें. कुणाचेही कसलेही हुकूम ऐकण्याची मला आजन्मांत संवयच नाहीं. ह्या गृहस्थानें मला काम करण्याचा हुकूम फर्माविला ... शिवी-गाळही केली ... साहजिकच संतापून हातांतल्या पिकावाचा तडाखा लगावला मीं ... तो मला वाटतं, चुकून भलत्यालाच लागला ... पण खरं सांगायचं म्हणजे मला ह्या — ह्या माणसालाच मारायचं होतं ... " असें म्हणून ॲलेक्सनें आपली तीक्ष्ण दृष्टि लॉफ्टवर रोखली.

" तुला कुणाला मारायचं होतं, हा मुद्दा महत्त्वाचा नाहीं. कुणाचा का होईना पण तुझ्या हातून खून झाला एवढं मात्र निश्चित. तुला आतां त्याबद्दल पश्चात्ताप होतोय् का ? " असें म्हणून ते लॉफ्टकडे वळून बोलले, " आरोपीला पश्चात्ताप झाला होता असं रिपोर्टांत नमूद करतां आलं तर रेकॉर्डच्या दृष्टीनें तें बरं दिसेल. "—आणि मग पुन्हा त्यांनीं ॲलेक्सला विचारलें, " ह्या कृत्याबद्दल तुला वाईट नाहीं वाटत ? "

" मुळींच नाहीं ! " ॲलेक्स म्हणाला, " वाईट वाटायचं कारणच काय ? स्वतंत्र माणसाला मग्रूरपणानें करडे हुकूम सोडण्याचा कुणाला काय अधिकार आहे ? मी स्वतंत्र मनुष्य आहें. एका काळीं मेयरच्या हाताखालचा एक अधिकारी होतों ... "

" पण देहान्ताची शिक्षा सुनावली तरी सुद्धा तुला वाईट वाटणार नाहीं ? "

" मुळींच नाहीं ! " ॲलेक्सचें हें निश्चयी स्वरांतलें उत्तर ऐकून कर्नल लान्सर सर्दच झाले.

" आरोपीला शेवटीं फार पश्चात्ताप झाला होता असं रिपोर्टांत मात्र लिहा हं ! " असें लॉफ्टला सांगून कर्नल ॲलेक्सला म्हणाले, " ॲलेक्स, तुझ्यावर कॅप्टन बेंटिकच्या खुनाचा आरोप शाबीत झाला आहे. म्हणून हें कोर्ट तुला ताबडतोब गोळी घालून ठार करण्याची शिक्षा देत आहे ! " नंतर पुन्हा

लॉफ्टकडे वळून त्यांनीं विचारलें, " सर्व कांहीं पद्धतशीर झालं ना ? कांहीं विसरलों तर नाहीं ना मी ? "

" तुम्ही मला विसरलांत ना कर्नल ! " असें म्हणत मेयर खुर्चीवरून उठून अलेक्सजवळ गेले. नेहमींच्या संवयीप्रमाणें ॲलेक्स चटकन् उठून अदबीनें उभा राहिला.

मेयर ॲलेक्सला म्हणाले, " ॲलेक्स, मी ह्या गांवचा लोकनियुक्त मेयर आहें. हे लोक आक्रमक...आमचे शत्रू आहेत. ह्यांनीं आपला देश विश्वास-घातानें, जुलूम-जबरदस्तीनें अचानक स्वारी करून बळकावलेला आहे ..."

मेयरसाहेबांचें हें भाषण ऐकून लॉफ्ट गरजला, " साहेब, भर कोर्टांत हें असलं भाषण ... " पण लगेच कर्नलनीं म्हटलें, " बोलूं दे त्यांना ... माघारीं कुजबुजण्यापेक्षा उघडपणें मोठ्यांदा बोललेलं फार चांगलं ... ऐकायला काय हरकत आहे ? " असें म्हणून लॉफ्टला गप्प केलें.

मेयरसाहेबांचें बोलणें चालूच होतें. " हे लोक आमच्या गांवांत घुसले त्या वेळीं गांवकऱ्यांप्रमाणंच मीही गोंधळून, गांगरून गेलों. काय करावं हेंच आम्हां कुणाला सुचेना. पण ह्या तुझ्या उघड धाडसी कृत्यामुळें आतां मात्र सर्व वस्तु-स्थितीवर लख्ख प्रकाश पडला आहे. आमचा मार्ग आम्हांला स्पष्ट दिसूं लागला आहे. तुझा वैयक्तिक खासगी क्रोध म्हणजे सार्वजनिक क्रोधाचा उगमच होय. शत्रूला सामील होऊन त्यांच्याशीं मी सहकार्य करीत आहें असं गांवांतले लोक मजविषयीं बोलतात, मला ठाऊक आहे. त्यांचा तो गैरसमज प्रत्यक्ष कृतीनेंच मी लवकरच नष्ट करीन. पण तूं आज मृत्यूच्या दारांत उभा आहेस...आमच्यां-तून कायमचा निघून जाणार आहेस ... तुझ्या मनांत माझ्याविषयीं निष्कारण गैरसमज राहूं नये म्हणूनच हें मी ह्यावेळीं तुला सांगत आहें ..."

ॲलेक्सनें आपलें मस्तक नम्र करून म्हटलें, " मेयरसाहेब, आपलं अंतःकरण मी ओळखतों ..."

कर्नल लान्सरनीं विचारलें, " सारी तयारी आहे ? कमांडिंग ऑफिसर कोण आहे ? "

" मी आहें. " लेफ्टनंट टॉडर म्हणाला.

मेयरनीं ॲलेक्सला प्रेमळ स्वरांत विचारलें, " घाबरलास ? "

ॲलेक्सनें नुसताच हुंकार दिला. त्याचा कंठ दाटून आला. डोळे अश्रूंनीं डबडबले.

मेयरसाहेबांचीही तीच स्थिति झाली. पण चटकन् स्वतःला सावरून ॲलेक्सची पाठ थोपटीत ते म्हणाले, " धीर धर बेटा ! घाबरूं नकोस ... हा प्रसंगच असा आहे कीं त्यावेळीं तुझा काय, पण माझा आणि ह्या–ह्या–रणदेवांचाही धीर खचूनच जाईल ! पण ॲलेक्स, एक गोष्ट मात्र पक्की लक्षांत ठेव... आम्हीं ह्या लोकांना, आमच्या वैऱ्यांना आतां ह्यापुढें क्षणाचीही स्वस्थता लाभूं देणार नाहीं. ह्यांनीं इथून चालतं झालं पाहिजे किंवा इथेंच हाल हाल होऊन मेलं पाहिजे. दुसरा तरणोपाय ह्यांना नाहीं ... तुझ्या बलिदानाचं मोल थोर आहे. तुझ्या मृत्यूमुळेंच लोकांत जागृति होऊन एकजूट निर्माण होणार ! माझं बोलणं ह्यावेळीं तुला वेदान्ताप्रमाणं रुक्ष वाटेल, पण मी तुला खात्रीनें सांगतों कीं तुझे देशबांधव तुझ्या मृत्यूचा सूड शत्रूवर उगवल्याखेरीज स्वस्थ राहाणार नाहींत. जा–आनंदानें मृत्यूला कवटाळायला तयार हो ! " – असें म्हणून मेयरनीं ॲलेक्सला आपल्या छातीशीं कुरवाळलें आणि वात्सल्यभरानें त्याच्या गालाचें चुंबन घेतलें.

ॲलेक्सनें मेयरसाहेबांकडे एकदा भरल्या डोळ्यांनीं पाहिलें आणि लगेच आपले डोळे गच्च मिटून घेतले.

लेफ्टनंट टॉडरनें शिपायांना इशारा दिला. शिपायांनीं लगेच दंडाला धरून ॲलेक्सला बाहेर नेलें आणि सैनिकांच्या स्वाधीन केलें. ॲलेक्सला ताब्यांत घेऊन तुकडीनें कूच केलें.

कॅप्टन लॉफ्ट टेबलावरचे कागदपत्र आवरीत होता. कर्नलनीं त्याला विचारलें, " शिक्षेची जागा कुठें ? बाजार चौकांतच ना ? "

" होय साहेब ! जाहीर रीतीनेंच गोळी घातली पाहिजे. " लॉफ्ट उत्तरला.

मेयरसाहेब खिडकीकडे गेले. चटकन् कोणी तरी तावदानावरील बर्फ पुसून काढलें. पुसलेल्या भागाकडे आश्चर्यानें पाहात मेयर जरा वेळ स्तब्ध राहिले पण मग चटकन् कर्नलकडे वळून म्हणाले,

" तुम्ही काय करताहांत ह्याची पूर्ण जाणीव तुम्हांला असेलच...एका बेगुन्हा माणसाचा कायद्याच्या नांवाखालीं धडधडीत खून ..."

" नाइलाज आहे. आमचं कर्तव्य आम्हांला केलंच पाहिजे. " कर्नल थंडपणानें बोलले.

दिवाणखान्यांत शांतता पसरली. पण ती फार वेळ टिकली नाहीं. थोड्याच वेळांत बाजार चौकाच्या बाजूनें बंदुकांची फैर झडल्याचा आवाज आला ! लान्सरनीं सुटकेचा एक दीर्घ निश्वास टाकला. मेयरनीं मात्र कपाळाला हात लावून दीर्घ श्वास घेतला. इतक्यांत बाहेर लोकांचा गोंगाट–गलगा, आरडा-ओरड सुरू झाली. बाहेरून कोणीतरी झाडलेल्या बंदुकीच्या गोळीनें खिडकीचें तावदान खळकन् फुटून कांचेचे तुकडे चहूंकडे उडाले आणि लेफ्टनंट प्रॅकल खांदा वर करीत आपल्या खुर्चीवरून धाडकन् खालीं कोसळला ! ती गोळी त्याच्या खांद्याला चाटून गेली होती.

" झालीच पुन्हा अत्याचाराला सुरुवात ! " कर्नल लान्सर ताडदिशीं खुर्चीवरून उठून गर्जू लागले, " मेजर हंटर, कॅप्टन लॉफ्ट, पळा–पळा ताबडतोब गुन्हेगाराला शोधून काढा ... बाहेर बर्फावर त्याचीं पावलं उमटलीं असतील. जलदी करा. नाहींतर तीं पुन्हा बुजून जातील ... गांवांतल्या प्रत्येक घराची झडती घेऊन एकूण एक हत्यारं जप्त करा ... पिस्तुल, बंदुकी बाळगणाऱ्या प्रत्येक इसमाला अटक करा ... आणि मेयरसाहेब, तुम्हांलाही आम्ही अटक केली आहे ! ह्या क्षणापासून तुम्हीं आमच्या नजरकैदेंत राहिलं पाहिजे...आणि एक गोष्ट ध्यानात

ठेवा...पुन्हा असा अत्याचाराचा प्रकार घडेल तर आमच्या एका माणसाबद्दल आम्ही तुमच्या पांच, दहा, शंभर माणसांना गोळ्या घालायला कचरणार नाहीं!"

मेयर शांतपणें म्हणाले, "जुन्या आठवणी जतन करणारे आहांत तुम्ही!"

कर्नल थोडे चपापले. क्षणमात्र त्यांनीं मेयरसाहेबांच्या नजरेशीं आपली नजर भिडविली. दोघांनींही एकमेकांचें मनोगत जाणलें. पण मग लगेच ताठर-पणानें कर्नल म्हणाले, "कसल्याही स्मृति मी उराशीं बाळगीत नसतों..." मेजर हंटर आणि कॅप्टन लॉफ्ट आपापलीं पिस्तुलें सरसावून कर्नलसाहेबांच्या हुकुमाप्रमाणें कामगिरी बजावण्यासाठीं घाईघाईनें निघून गेले.

फुटक्या खिडकीजवळ जाऊन मेयर खिन्नपणानें उद्गारले, "हिमाचा मधुर नि शीतल सुगंध!"

# ५

दिवसांमागून दिवस आणि महिन्यांमागून महिने निघून गेले. बर्फ पडायचें आणि वितळायचें असें कांहीं दिवस चालून अखेर तें वितळायचें बंद झालें. त्या छोट्या शहरवजा गांवांतल्या काळ्या इमारती बर्फानें आच्छादल्या गेल्या आणि बर्फांतून दारापर्यंत जाण्यासाठीं प्रत्येक इमारतीसमोर खंदक खणावे लागले. हिंवाळा लवकर जोरांत सुरू झाला. बंदरांत रिकाम्या बोटी येत व कोळसा भरून घेऊन परत निघून जात. पण खाणींतला कोळसा आतां पूर्वीप्रमाणें झपाट्यानें सहजासहजीं बाहेर येईनासा झाला. बाकबगार खाणी-कामगारांच्या हातून वारंवार चुका होऊं लागल्या. त्यांचें कामही मंद गतीनें वेंधळ्यासारखें होऊं लागलें. यंत्रांची मोडतोड सुरू झाली आणि पुन्हां त्यांच्या दुरुस्तींतही फार वेळ जाऊं लागला. लोकांनीं हळुहळू शत्रूवर सूड उगविण्याची तयारी सुरू केली होती. योग्य संधीचीच ते वाट पाहात होते.

गांवांत कांहीं स्वार्थी फितूर लोकही होतेच. आपल्याला आयुष्यांत स्थैर्य आणि सुस्थिती लाभेल अशा समजुतीनेंच ते शत्रूला सामील होऊन मदत करीत होते. पण त्यांनाही आतां शत्रूच्या आसऱ्याचा भरंवसा वाटेनासा झाला. कारण, आक्रमकांचा लोकांवरचा वचक कमी होत चालल्याचें त्यांना दिसून येऊं लागलें आणि गांवकऱ्यांनींही त्यांच्यावर दांत धरल्याचा कटु अनुभव त्यांना रोजच्या व्यवहारांत मिळूं लागला. ओळखीचे, विशेष परिचयाचे लोकही त्यांच्याशीं द्वेषबुद्धीनें वागून त्यांचें तोंड चुकवूं लागले.

एकंदरींत, प्रक्षुब्ध वातावरण निर्माण होऊन चहूंकडे प्रच्छन्न मृत्यूचीच अवकळा पसरली.

डोंगरावरून गेलेल्या ज्या रेल्वेनें तो गांव देशाच्या इतर भागाला जोडला गेला होता, त्या रेल्वे लाइनवर अपघात होऊं लागले. बर्फाचे मोठमोठे दगड कोसळल्यामुळें लाइन नादुरुस्त होऊं लागली आणि रेल्वेचे रूळही अजिबात उखडले जाऊं लागले. लाइनची प्रथम नीट तपासणी केल्याखेरीज कोणत्याही गाडीचा प्रवास धोक्याचा होऊन बसला. त्या अपघातांबद्दल कित्येक लोकांची धरपकड करून त्यांना गोळ्या घालण्यांत आल्या. पण व्यर्थ! परिस्थिति कायमच राहिली. अधूनमधून तरुणांचें एकादें टोळकें इंग्लंडला निसटून जाई. इंग्रजांनींही एकदां खाणीवर बॉम्बफेक करून थोडेंसें नुकसान केलें आणि शत्रूबरोबरच कांहीं दोस्तांचेही बळी घेतले. पण त्याचाही कांहींच उपयोग झाला नाहीं. हिंवाळ्याचा जोर वाढत चालला आणि त्याचबरोबर लोकांच्या अंतःकरणांतली सूडाची भावनाही बळावत चालली.

अन्नधान्याच्या पुरवठ्यावर नियंत्रण घालण्यांत आलें. शत्रूचे हुकूम बिनतक्रार पाळणाऱ्यांनाच धान्य देण्यांत येऊं लागलें. इतरांच्यावर उपासमारीचा प्रसंग ओढवला. त्यामुळें सर्वच लोक नाइलाजानें शत्रूचे हुकूम वरकरणीं पाळूं लागले. शत्रूलाही अन्नधान्यपुरवठ्यावरील आपलें नियंत्रण जास्त कडक करणें अशक्य झालें. कारण, पोटाला भरपूर अन्न दिलें नाहीं तर अर्धपोटीं राहून कामगार लोक खाणींतला कोळसा खणून काढण्याचीं, ओझीं वाहाण्याचीं वगैरे अंगमेहनतीचीं कामें कशीं करणार? हा पेंच निर्माण झाला. लोक जरी वर वर शांत दिसत होते तरी त्यांच्या नजरेंतला द्वेष व त्वेष मात्र अधिकाधिक प्रखरच होत चालला.

शत्रूच्या सैनिकांवर तर साऱ्या गांवानें जणूं कांहीं कडकडीत बहिष्कारच टाकला होता. गांवांतला कोणीही माणूस त्यांच्याशीं बोलत नसे. त्यांच्याकडे पाहातही नसे. त्यामुळें त्यांची मोठी कुचंबणा होऊं लागली होती. एक प्रकारें गांवकऱ्यांच्या वेढ्यांतच आपण अडकून पडल्यासारखें त्यांना वाटूं लागलें. क्षणभर देखील पहारा ढिला करायला कोणी शिपाई धजेना. पहारा ढिला झाला, एकादा सैनिक गांवांत कोठें फिरूं लागला, एकाद्या बाईकडे गेला

किंवा दारू पिऊन झिंगला कीं तो तात्काळ नाहींसा होऊन पुन्हा कधीं कोणाच्या दृष्टीला पडेनासा झाला. आणि मग त्याचें प्रेत मात्र कोठें तरी बर्फाच्या ढिगाऱ्याखालीं गाडलेलें आढळून येई ! असे प्रकार बरेच झाल्यामुळें कोणीही सैनिक आपलें ठाणें सोडून गांवांतून एकटा दुकटा फिरायला घाबरूं लागला.

अशा रीतीनें सैनिकांचें जीवन अतिशय धोक्याचें आणि कंटाळवाणें होऊन गेलें. सैनिक झाला तरी तो माणूसच ! दिवसांतून कांहीं तास आणि वर्षांतून कांहीं महिनेच तो सैनिक म्हणून असूं शकतो. पण एरवीं, पुन्हा त्याला माणसांत, आपल्या मित्रमंडळींत मिसळावेंसें वाटतेंच. खाणें-पिणें, नाच-गाणें, मित्र-मैत्रिणी, गप्पागोष्टी, हास्यविनोद ह्या सर्वांचीच त्याला आवश्यकता वाटूं लागते. आणि ह्यांपैकीं कांहींच मिळेनासें झालें म्हणजे मग साहजिकच त्याच्या मनाची तळमळ सुरू होते. आणि ह्या गोष्टी जितक्या दुर्लभ होत जातात तितकीच त्याची त्यांबद्दलची आसक्तीही अधिकाधिक वाढत जाते.

शत्रूच्या शिपायांची मनःस्थिति अशीच झाली. आपल्याआपल्यांतच गाणें बजावणें करून ते आपल्या मनाची करमणूक करून घेऊं लागले. पण त्यांत त्यांना गोडी वाटेना. जिवलग मित्रांच्या आणि प्रेमळ आप्तेष्टांच्या आठवणींनीं त्यांचीं मनें रात्रंदिवस बेचैन होऊं लागलीं. युद्ध कधींच संपणार नाहीं, आपणांला घरीं परत जायला मिळणार नाहीं, आणि गांवकरी शेवटीं ससेहोलपट करून आपणांला सळो कीं पळो केल्याखेरीज राहाणार नाहींत अशीच त्यांच्या मनानें हाय घेतली. त्रासदायक निराश विचारांचें थैमान डोक्यांत सुरू होऊन त्यांना जास्तजास्तच घराची ओढ लागूं लागली. त्यांनीं त्या गांवावर संपूर्ण ताबा मिळविला होता तरी आतां त्यांना त्या गांवाचा वीट येऊं लागला. मनांतून भीतीच वाटूं लागली त्यांना गांवकऱ्यांची. त्यांचे तसेच विचित्र कडवट अनुभव त्यांना रोजच्या जीवनक्रमांत येऊं लागले. दहापांच गांवकरी आनंदानें गप्पागोष्टी करीत हास्यविनोदाचे फवारे सोडीत बसलेले कोठें दिसले कीं त्यांच्यांत जाऊन मिसळण्याची साहजिकच त्या शिपायांनाही अनिवार

इच्छा व्हायची. पण ते जवळ गेले कीं लगेच त्या लोकांचा तो हास्यविनोद एकदम बंद पडून तिथलें सारें प्रसन्न, मोकळें आनंदी वातावरणच पार नाहींसें व्हायचें ! लोक मुकाट्यानें उठून आपापल्या घरीं चालते व्हायचे आणि अशा प्रकारच्या त्यांच्या त्या सहानुभूतिशून्य तुटक वागणुकीमुळें ते शिपाई मात्र मनांतून अगदीं खट्टू होऊन जायचे. बिचाऱ्यांना इतरत्रही असेच चमत्कारिक अनुभव यायचे. हॉटेलांतील गरमागरम स्वादिष्ट खाद्यपदार्थांच्या खमंग वासानें तोंडाला पाणी सुटून शिपाई हॉटेलांत जायचे, ते पदार्थ मागवायचे, पण तोंडांत घालतांच ते त्यांना थुंकून टाकणेंच भाग पडायचें ! कारण, खूप मीठ-तिखट-मसाला घालून ते सारे पदार्थ मुद्दामच बेचव, खारट, किंवा तिखट-जाळ केलेले असायचे !

आपल्या देशांतल्या व इतर जिंकलेल्या मुलुखांतल्याही बातम्या त्य शिपायांना मधून मधून वाचायला मिळत आणि त्या सर्व चांगल्या, आशादायकच असत. प्रथम प्रथम त्यांचा त्या बातम्यांवर विश्वास बसत असे, पण पुढें पुढें मात्र त्यांना त्या तितक्याशा विश्वसनीय वाटेनाशा झाल्या. उलट, आपल्या मायभूमीचा सर्वनाश झाला तरीही कोणी आपणांला अखेरपर्यंत कळूं द्यायचे नाहींत आणि मग इथें परदेशांत ह्या गांवकऱ्यांकडूनच आपण किडामुंगीसारखे नाहक चिरडले जाणार, अशीच साऱ्या शिपायांनीं धास्ती घेतली. आणि ती अगदींच अनाठायीं नव्हती. कारण, बेल्जम-रशियामधून आपल्या लोकांना माघार घ्यावी लागली, ही गोष्ट ते विसरले नव्हते, आणि मॉस्कोंतून काढता पाय घेतल्यावेळचा तो भयंकर हाहाकार तर त्यांच्या डोळ्यांसमोर सारखा उभाच होता. गमिनी काव्यानें लढणाऱ्या रशियन शेतकऱ्यांनीं आपल्या लोकांना कशी पळतां भुई थोडी केली, त्यांची सरसहा कत्तल करून बर्फामध्यें त्यांच्या सडलेल्या प्रेतांचा खच कसा पाडला इत्यादि गोष्टी आठवल्या कीं त्या सैनिकांच्या अंगावर शहारेच यायचे. आणि आपण थोडे जरी गाफिल राहिलों, निष्काळजीपणानें वागलों किंवा जास्त वेळ बेसावधपणें झोपून गेलों तरी इथलेही लोक आपली तीच गत करणार अशा

भीतीनें त्यांची छाती धडधडायलाच लागायची. त्यामुळें रात्री त्यांना निर्घोरपणें झोपही लागेनाशी झाली. बेचैन जिवाला दिवसां तिळभर उसंत नाहीं आणि रात्रीं सुद्धां डोळ्याला डोळा नाहीं, अशा परिस्थितींत ते अगदीं मेटाकुटीला आले. जीव नकोसा झाला त्यांना. स्थानिक परिस्थिति हरघडी भेडसावीत होती आणि आपल्या देशाकडील खरी वस्तुस्थिति काय आहे ह्याचीही त्यांना गंधवार्ता लागत नव्हती. वृत्तपत्रांतल्या बातम्या त्यांना खऱ्या वाटत नव्हत्या आणि अधिकाऱ्यांना कांहीं विचारलें तर त्यांच्याकडूनही समाधानकारक उत्तरें मिळत नव्हतीं. मग त्या अधिकाऱ्यांनाच कांहीं ठाऊक नव्हतें कीं ठाऊक असूनही सैनिकांना तें कळूं देण्याची त्यांची इच्छा नव्हती, कोणास ठाऊक ! स्वदेशाकडून येणाऱ्या रिपोर्टावर खुद्द अधिकाऱ्यांचाही विश्वास नव्हता हेंही तितकेंच खरें.

प्रतिकूल परिस्थितींत सर्वच बाजूंनीं कोंडमारा झाल्यामुळें शिपायांच्या मनाची उद्विग्नता प्रतिक्षणीं वाढत राहून त्यांची अतिशयच केविलवाणी अवस्था झाली. जेते लोकच जिंकलेल्या जनतेला घाबरूं लागले हें मात्र निश्चित. त्यांच्या मनावर भीतीचें, अविश्वासाचें आणि संशयाचें एवढें जबरदस्त दडपण पडलें कीं रात्रीं गस्त घालतांना ते स्वतःच्याच सावलीवर भराभर गोळ्या झाडूं लागले ! अष्टौप्रहर एक तऱ्हेची विलक्षण भीषण शांतता आणि अदृश्य भीतीची काळीकुट्ट छाया त्यांच्या भोवतीं पसरलेली असायची. त्यामुळें त्यांच्यापैकीं तिघांना तर एकाएकीं चक्क वेडच लागलें. दिवसरात्र एकसारखे ते रडत ओरडत सुटले. मग अर्थातच त्यांची रवानगी परत मायदेशाकडे करावी लागली. वास्तविक सर्वच सैनिकांना वेड लागायचें, पण वेड लागल्यामुळें स्वदेशीं परत पाठविलेल्या सैनिकांना दयेच्या गोड नांवाखालीं तेथें ठार मारण्यांत येतें अशी बातमी लागल्यामुळें ती वेडाची साथ फार पसरली नाहीं. परंतु एकंदर परिस्थितीचा मनावर अत्यंत अनिष्ट परिणाम होऊन ठाण्यावरले शिपाई भ्याड आणि दुःखी बनले आणि रस्त्यांतून गस्त घालीत हिंडणारे शिपाई जास्तच क्रूर व संशयी बनले.

जी स्थिति सैनिकांची तीच त्यांच्या अधिकाऱ्यांची. सैनिकांपेक्षां ते अधिक सुशिक्षित, सुसंस्कृत आणि जास्त जबाबदारीच्या जागांवर असल्यामुळें तर

त्यांच्या मनांतील भीतीची, चिंतेची आणि वेदनांची तीव्रताही थोडी अधिकच होती. त्यांना तर दुहेरी काच होता. गांवांतले लोक त्यांच्या हातून होणाऱ्या छोट्या मोठ्या चुकांवर नजर लावून बसलेच होते. पण खुद्द त्यांच्या हाताखालचे शिपायीही त्यांच्या मनाच्या कमकुवतपणाकडे आणि वर्तनांतील ढिलाईकडे बारीक लक्ष ठेवून होते. ह्या दुहेरी ताणामुळें त्यांचेंही मानासिक धैर्य पार खचून जाण्याच्या बेतांत आलें होतें. शिपायांचें धाबें दणाणलेलें आणि अधिकारीही जेरीस आलेले! जेत्यांची अशी विलक्षण दुर्बल, नाजुक अवस्था झालेली असल्यानें त्यांच्या सामर्थ्याला थोडासा तडा पडतांच काय दुर्दशा उडेल, प्रतिकाराच्या पहिल्याच ठिणगींतून भयंकर बंडाळीचा वणवा कसा भडकेल ह्याची पूर्ण कल्पना जितांना आणि जेत्यांना दोघांनाही आलेली होती.

वर्ष संपत आलें. हिंवाळ्यांतल्या मोठ्या रात्री सुरू झाल्या. दुपारीं तीन वाजतांच अंधार पडून सकाळीं नऊ वाजेपर्यंत उजेड दिसेनासा झाला. बॉम्बर्सच्या भीतीनें खिडक्यांना काळें फासण्याचा कायदा जारी करण्यांत आल्यामुळें संध्याकाळपासून सकाळपर्यंत सारा गांव कभिन्न काळोखांत बुडून गेलेला असायचा. तरी पण आकाशांत इंग्रजांचीं विमानें घरघरायला लागलीं, कीं दिवाबंदीचा कायदा धाब्यावर बसवून कोळशाच्या खाणीजवळ हटकून प्रकाश दिसायचा! एकदा पहारेकऱ्यांनीं कंदील घेऊन जाणाऱ्या एका माणसाला व बॅटरीनें खुणा करणाऱ्या एका पोरीला गोळ्या घातल्या. पण त्याचा कांहींच परिणाम झाला नाहीं. गोळ्या फुकटच गेल्या म्हणायच्या.

मेयरसाहेबांच्या वाड्यांतल्या वरच्या हॉलमधला आरामशीरपणाही आतां पार नाहींसा झाला होता. ब्लॅकआऊटसाठीं खिडक्यांच्या तावदानांवर काळे कागद चिकटविण्यांत आले होते. अधिकाऱ्यांचे गणवेष, दुर्बिणी, गॅस्‌मास्कस्‌ हेल्मेटें—ह्यांहून फारसें मूल्यवान सामानसुमान तेथें दिसत नव्हतें. आणि तिथली शिस्तही थोडीशी शिथिलच झालेली होती. थोडीशी ढिलाई ठेवायलाच हवी, नाहींतर एकादे वेळीं सर्वच यंत्र तुटून फुटून जायचें असाच जणूं अधिकाऱ्यांनीं विचार केला असावा.

भिंतीवर भली दांडगी सावली टाकून हिस्स्स् असा आवाज काढीत पेट्रोमॅक्सच्या दोन बत्त्या तेथें टेबलावर ढणढणत होत्या. त्यांच्या प्रकाशांत मेजर हंटर आपलें काम करीत बसला होता. अलीकडे रेल्वे लाईनवर वरचेवर अपघात होऊं लागल्यामुळें त्याच्या ड्रॉईंग–बोर्डला आजकाल विश्रांतीच मिळेनाशी झाली होती. पण कामाच्या वाढत्या बोजाबद्दल मेजरला मुळींच वाईट वाटत नव्हतें. तो हाडाचा इंजिनिअर असल्यानें रोज नवीन नवीन प्लॅन्स् तयार करण्याची त्याला हौसच वाटायची. ह्यावेळींही बोर्डवर टी–स्क्वेअर खालीं वर करीत पेन्सिलीनें कसलें तरी स्केच काढण्यांतच तो गढून गेला होता. मध्यभागीं ठेवलेल्या टेबलाजवळच्या एका खुर्चीवर गळ्याभोंवतीं गुंडाळलेल्या फडक्यांत हात अडकवून लेफ्टनंट प्रॅकल कसलें तरी एक सचित्र नियतकालिक वाचण्यांत मग्न झाला होता. आणि त्याच्या टेबलाच्या दुसऱ्या टोकाजवळ लेफ्टनंट टॅाडर पत्र लिहीत बसला होता. मधून मधून काय आणि कसें लिहावें ह्याचा विचार करीत तो वर छताकडे पाहात राहायचा.

हातांतल्या सचित्र मासिकाचीं पानें चाळतां चाळतां एका चित्रावर बोट ठेवून प्रॅकल म्हणाला, “ ह्या रस्त्यावरचीं सगळीं दुकानें मला माहीत आहेत. डोळे मिटून ओळीनें मी त्यांचीं नांवें झटझट सांगूं शकेन ... ह्या इथल्या स्टोअर्सच्या मागल्या बाजूला एक रेस्टॉरंट आहे ... ‘ बर्डेन्स ’ त्याचं नांव ... ह्या चित्रांत इथें दिसतंयच तें ... ”

“ मला माहीत आहे तें. फार चांगले खाद्यपदार्थ मिळतात तिथें ... ताजे नि रुचकर, ” आपलें काम करतां करतांच वर न पाहातां हंटर म्हणाला.

“ कॉफी तर काय ! ए वन् ! ”

“ पण आतां कुठली कॉफी आणि टॉफी ? तें रेस्टॉरंट तरी तिथें ज[illegible] राहिलंय् कीं नाहीं देव जाणे ! ” टॅाडर म्हणाला.

“ अलीकडलं कांहीं माहीत नाहीं ... ” प्रॅकल सांगूं लागला, “ पण मागं अशी एक फक्कड पोरगी होती तिथें ! वा रे वा ! तिनें आणून दिलेल्या

ग्रंथ संग्रहालय,
विभाग ... म.वा.
क्रमांक ७७९९३
नों. दि. 3.9.73

कॉफीचा घुटका घेतांना असा मजा यायचा ! आणि तिची नजर तरी किती गहिरी नि मादक ! आणि केव्हांही पाहिलं तरी तिचे डोळे पाणावलेले... जशी कांहीं नुकतीच ती रडत किंवा हासत होती ! " नंतर एक लांब उसासा टाकून छताकडे पहात तो म्हणाला, " एकदा फिरलोय मी तिच्याबरोबर, तिच्या मोहक संगतीचा लाभ घेतलाय्... अजून ती तिथेंच आहे कीं नाहीं कुणास ठाऊक ! "

" कुठल्या तरी एकाद्या फॅक्टरींत काम करीत असेल झालं ! " टॉडर म्हणाला.

" म्हणजे ? आपल्या देशांत आतां पोरींचेंही रेशनिंग सुरूं झालंय् वाटतं ? " ब्रॅकलनें हसत हसत विचारलें.

" काय हरकत आहे व्हायला ? "

" बाकी, तुम्हांला पोरींची किंमत आहे कुठें म्हणा ! तरुण स्त्रियांचं तुम्हांला कधींच कौतुक वाटत नाहीं नि महत्त्वही पटत नाहीं ... "

" तें कां ? योग्य तेवढं तात्पुरतं महत्त्व देतच असतों मी स्त्रियांना. पण माझ्या जीवनांत मात्र मी त्यांना कधींच कायमचं स्थान पटकावून देत नसतों. "

" मग काय ? आपल्या अंगावरच त्यांना नेहमीं लोळण घेऊं देतां वाटतं ? " ब्रॅकलनें उपरोधिकपणानें विचारलें. तो विषयच बदलावा म्हणून टॉडरनें हंटरला एकदम विचारलें, " मेजरसाहेब, तुमचा तो डायनॅमो कधीं दुरुस्त होणार आहे ? ह्या बत्त्यांचा अगदीं वीट येऊन गेलाय्... "

" इतक्यांत सुरू व्हायला पाहिजे. चांगल्या तज्ज्ञ लोकांना मी तिथें कामाला लावून आलोंय्... आणि ह्यापुढें तिथला पहाराही जरा कडकच करणार आहें मी ... "

" पण तो डायनॅमो फोडणारा इसम अजून सापडला कीं नाहीं ? " ब्रॅकलनें विचारलें.

“ एकंदर पांचजणांना अटक केलीय्...त्यांत तो बहुतेक असेलच... थोडीशी माहिती असली कीं कुणालाही सहज बिघडवून टाकतां येतो डायनॅमो... जरा शॉर्ट केला कीं आपोआपच त्याचे तत्काळ बारा वाजतात. पण आतां इतक्यांत लाइट आला पाहिजे.”

“ ह्या साऱ्या जंजाळांतून सुखरूप सुटका होऊन आम्हांला कधीं एकदा घरीं परत जायला मिळतंय् कुणास ठाऊक !” पण प्रॅकलच्या ह्या बोलण्याकडे लक्ष न देतां काढलेल्या नकाशाकडे त्रासिक मुद्रेनें पाहात हंटर पुटपुटला, “ हा रेल्वेचा फांटा मी चार वेळां तयार केला. पण नेमकी इथेंच कशी मोडतोड होते कळत नाहीं. प्रत्येक खेपेला रस्ता तरी बदलायचा कुठें नि कसा ? बर्फा-मुळें जमीन झालीय् दगडासारखी टणक...”

इतक्यांत एकाएकीं दिवे लागले. त्याबरोबर लगेच पेट्रोमॅक्स बत्त्या मालवून टाकून टॉडर उद्गारला, “ देव पावला ! डोकं उठलं होतं ह्या बत्त्यांच्या आवाजानें...” नंतर आपलें पत्र झटपट पुरें करून त्याची घडी करीत तो म्हणाला, “ अलीकडे फारशीं पत्रंच येत नाहींत घराकडून... गेल्या दोन आठवड्यांत मला फक्त एकच पत्र मिळालं...”

“ तुम्हांला कुणी पत्रं लिहितच नसेल. मग तीं मिळणार कशीं ?” प्रॅकलनें म्हटलें.

“ तसंही असेल कदाचित्.” असें म्हणून टॉडरनें हंटरला विचारलें, “ पण काय हो मेजर, आमच्या घरीं कांहीं विशेष घडलं – म्हणजे कुणी आजारी पडलं किंवा मेलं – तर ती तरी बातमी आम्हांला कळविण्यांत येईल कीं नाहीं ?”

“ मी काय सांगूं ?” हंटर उत्तरला.

“ मला तर हें भिकार गांव कधीं एकदा नशीबाचं सुटतंय् असं होऊन गेलंय्...”

“ भले ! अहो, तुम्हांला तर युद्ध संपल्यावर इथेंच स्थायिक व्हायचं होतं ना ? तुम्हींच म्हणत होतां कीं हा प्रदेश सुपीक आहे... चार पांच शेतं एकत्र

करून इस्टेट करायची ... इथले लोक फारच सज्जन ... आणि इथलीं तीं हिरवींगार माळरानं, हरणं नि छोटीं छोटीं गोंडस मुलं ... ”

ब्रॅकलनें असें खिजवायला सुरुवात करतांच टॉडर एकदम उसळून म्हणाला, “ माफ करा बुवा ! आग लावा ह्या गांवाला ! नांव काढूं नका इथल्या लोकांचं ! लेकाचे अगदींच तुसडेपणानें वागतात ... उर्मट, घमेंडखोर ... शिंचे पाहात सुद्धा नाहींत आमच्याकडे ... आणि कांहीं विचारलं तर प्रेतासारखा चेहरा करून तुटक उत्तरं देतात ... टेरिबल ! तशाच त्या पोरी ! एकजात बर्फासारख्या थंड. कधीं आमच्याशीं बोलतील, हसतील ... नांव नाहीं ... ” इतक्यांत दारावर टक्टक् असा हलकाच आवाज झाला व कोळशाचा डबा घेऊन जोसेफ आंत आला. डबा ठेवून तो पुन्हां हलक्या पावलांनीं परत निघाला. तोंच ब्रॅकलनें त्याला हाक मारून विचारलें, “ जोसेफ, घरांत ब्रँडी, वाईन कांहीं आहे कीं नाहीं ? ”

जोसेफनें मानेनेंच नाहीं म्हणून सांगितलें. त्याबरोबर चारदोन अस्सल शिव्या हासडीत टॉडर त्याच्या अंगावर धावून खेंकसला, “ तोंड शिवलंय् का तुझं ? तोंडानें उत्तर दे ... ”

“ नाहीं ... वाईन, ब्रँडी कांहीं नाहीं घरांत ... ” वर न पाहातांच जोसेफनें सांगितलें.

“ चल, चालता हो नजरेपुढून ... ” असें म्हणून टॉडरनें खिशांतल्या हातरुमालानें कपाळावरचा घाम पुसला.

“ तुम्हांला जिरवलं जोसेफनें. ” असें म्हणून हंटर हसूं लागला.

टॉडर मटकन् खुर्चीवर बसला आणि दोन्ही हातांनीं डोकें गच्च दाबून धरून भग्न स्वरांत ओरडला, “ मला एक सुंदर तरुणी हवी आहे ... घरीं जावंसं वाटतंय् मला ... इथेंसुद्धा एक जवान देखणी छोकरी आहे ... रोज बघतों मी तिला ... त्या जुन्यापुराण्या लोखंडी सामानाच्या दुकानाजवळ राहते ती ... ती मला हवी आहे ... तिच्या सहवासासाठीं अगदीं वेडा झालोंय् मी ... ”

" टॉंडर ! सांभाळा ! ताळ सोडत चाललांत ! " ऍकल म्हणाला.

इतक्यांत हॉलमधले दिवे गेले आणि चहूंकडे पुन्हां काळोख झाला. टॉंडर काडी ओढून पेट्रोमॅक्सचे दिवे लावूं लागला. हंटर म्हणाला, " मला वाटलं, पकडलेल्या पांचजणांत खरा गुन्हेगार असेल म्हणून ... पण तो तर बेटा निसटलेलाच दिसतो. बाकी, मला आतां सत्रांदां डायनॅमोकडे धावपळ करायला वेळ नाहीं ... तज्ज्ञ माणसांवरच दुरुस्तीचं काम सोंपवून आलोंय् मी ... "

टॉंडरनें दोन्ही बत्त्या लावल्या. हंटर त्याला करड्या स्वरांत म्हणाला, " हें पाहा लेफ्टनंट, तुम्हांला भलतंच कांहीं बरळावंसं वाटत असेल तर तें इथें आमच्याजवळच नि हलक्या आवाजांत बरळा. मोठ्यांदा ओरडूं नका. तुमचं बोलणं शत्रूच्या कानीं पडणार नाहीं ह्याची खबरदारी घ्या ... "

" बरोबर आहे. " टॉंडर म्हणाला, " चहूंकडे शत्रु भरून उरला आहे ... प्रत्येक स्त्री, प्रत्येक पुरुष, फार काय, प्रत्येक पोर सुद्धा शत्रु आहे. त्यांचीं तोंडं दारांच्या फटींतून डोकावतात ... खिडक्यांच्या पडद्यांआडून त्यांचे डोळे लुकलुकतात ... वैरी आमचा कानोसा घेतात ... पण आम्हीं त्या लोकांचा — वैऱ्यांचा पराभव केलाय् ! ... आम्ही त्यांचे मालक ! ते आमचे गुलाम ! आमच्या हुकुमांची वाट पाहातात ते ! अर्ध्या अधिक जगावर आज आमचा ताबा आहे ... इतरत्र असंच चाललंय् का मेजरसाहेब ? "

" मला माहीत नाहीं ... "

" घ्या ! ऐका हें ! आम्हांला माहीत नाहीं ! सारे रिपोर्ट हातीं पडतात, तरी आम्हांला ठाऊक नाहीं ! आमच्या सैनिकांचं, आमच्या नव्या व्यवस्थेचं जिंकलेल्या प्रदेशांतील जनतेनें अत्यंत हर्षभरानें स्वागत केलं ... सार्वत्रिक विजयाच्या वर्तमानपत्री दुंदुभी जोराजोरानें गरजताहेत ! पण आमच्याविषयीं ते रिपोर्ट काय म्हणताहेत ? इथल्या लोकांनीं आमच्यावर फुलं उधळलीं ? ... आम्हां विजयी वीरांच्या पायांखालीं फुलांच्या पायघड्या पसरल्या ? ... छट् ! इथले भयंकर लोक तर आमच्या सूडाची वाट पाहात बर्फांत दबा धरून बसलेत ! ... "

हंटर म्हणाले, " मनांतली सारी मळमळ ओकून टाकलीत...आतां तरी बरं वाटतंय् ना तुम्हांला ? "

टेबलावर हळुहळू मुठी ठोकीत बसलेला प्रॅकल म्हणाला, " असं मलमलतं बडबडणं ह्यांना शोभत नाहीं. कसं झालं तरी शिपाई गडी हे ! शिपायांनीं असल्या गोष्टी बोलायच्या नसतात ... "

इतक्यांत हलकेच दार उघडून कॅप्टन लॉफ्ट आंत आला. कपड्यावरचें बर्फ झाडीत तो उद्गारला, " छे बुवा ! काय हा भयंकर त्रास ! "

" आणखी कांहीं नवीन गडबड ? " हंटरनें विचारलें.

" सारखी सुरूच आहे कीं गडबड. तुमच्या डायनॅमोवर पुन्हां त्या लोकांनीं धाड घातली. खाणींतलं काम तेवढं सुरळीत चालू करून आलोंय्... "

" म्हणजे ? तुमच्या तिथेंही आणखी कांहीं भानगड झाली वाटतं ? "

" नेहमींचीच कर्मकटकट ! यंत्रांची मोडतोड नि कामाचा खोळंबा ! पण आज मात्र मी मोडतोड करणाऱ्याला बरोबर पकडून तिथल्या तिथें गोळी घालून ठार केलं ... पण मेजर ह्या सर्व प्रकरणावर मीं एक तोडगा काढलाय्... रोज ठराविक प्रमाणांत कोळसा खणून काढलाच पाहिजे अशी प्रत्येक कामगारावर सक्ति करणार आहें मी ... पण कामगारांना उपाशी ठेवून भागणार नाहीं. मग त्यांच्यानें कामच होणार नाहीं. म्हणून खूप विचार करून धान्यवांटपाची एक नवीन योजना मीं अंमलांत आणण्याचं ठरवलं आहे. ...कामगारानें ठरलेल्या प्रमाणांत जर रोज कोळसा खणून काढला नाहीं तर त्याच्या कुटुंबांतल्या मंडळींना अजिबात धान्यच द्यायचं नाहीं. भुकेनें टांचा घासून प्राणच सोडले पाहिजेत त्यांनीं ... कामगारांना मात्र खाणीवरच पोटभर जेवण द्यायचं. म्हणजे त्यांच्या अन्नाची घरच्या लोकांत वांटणी व्हायला नको. मला वाटतं, हा उपाय रामबाण आहे. कामगारांनीं काम तरी केलं पाहिजे नाहींतर आपल्या बायकांपोरांना उपाशी तरी मारलं पाहिजे. दुसरा मार्ग नाहीं. आत्तांच तसं सांगून टाकलं साऱ्या कामगारांना ... "

" मग काय म्हणाले ते ? "

“ काय म्हणाले ? तोंडांतनं चकार शब्द तरी कधीं काढतात ते ? नुसतं ऐकून घेतलं त्यांनीं. आतां पाहायचं काय होतंय् तें ! ” अंगांतला कोट काढून त्यावरचें बर्फ झटकीत लॉफ्ट म्हणाला. पण तितक्यांत त्याचें लक्ष सहज बाहेरच्या दाराकडे गेलें.

“ म्हणजे ? दार कसं उघडलं ? आंत येतांना तर मी घट्ट लावलं होतं. होय ना ? ”

“ होय ...” मेजर म्हणाला.

लॉफ्टनें जाऊन दाराला बोल्ट लावला आणि तो विषय तितक्यावरच संपला.

ग्रॅकल अजून मासिक चाळीतच बसला होता. “ पूर्व आघाडीवर आपण ह्या जंगी तोफा वापरीत आहों. पण मीं अजून असली एकादी तोफ पाहिलेली नाहीं. कॅप्टन, तुम्ही पाहिली आहे ? ” ग्रॅकलनें लॉफ्टला विचारलें.

“ हो–हो ! प्रत्यक्ष उडवतांनाही मीं त्या पाहिल्या आहेत. फारच राक्षसी तोफा ! त्यांच्या सरबत्तीपुढें कशाचाच टिकाव लागणं शक्य नाहीं. ” लॉफ्ट म्हणाला. त्याला टॅांडरनें मध्येंच एकदम विचारलें,

“ कॅप्टन, तुम्हांला घरची बातमी कळत असेल नाहीं ? ”

“ कळते थोडी थोडी...”

“ तिकडे सर्व ठाकठीक ? ”

“ अलबेल ! आमच्या फौजा सर्वत्र आगे दौड करीत आहेत ! ”

“ पण ब्रिटिशांचा अजून पराभव नाहीं ना झाला ? ”

“ प्रत्येक चकमकींत आम्हीं त्यांना हार खायला लावलं आहे...”

“ तरी पण अजून ते लढताहेत ! ”

“ उगीच कुठें तरी अधून मधून हवाई हल्ले करतात झालं ! लढतात कसले कपाळाचे ! ”

“ आणि रशियन लोक ? ”

" त्यांचा तर पार धुव्वा उडालाय् ! "

" पण त्यांचीही अजून लढाई–चढाई चालूच आहे ! "

" दंगल माजवणं म्हणजे लढाई करणं नव्हे ! "

" एकूण हें जागतिक युद्ध आपण जवळ जवळ जिंकलंच म्हणायचं ! "

" अलबत् ! "

त्यावर लॉफ्टकडे रोखून पाहात टॉडर म्हणाला, " कॅप्टन, तुम्हीं आतां मला जें जें सांगितलंत त्यावर तुमचा स्वतःचा तरी विश्वास आहे का हो ? "

" कॅप्टन, तुम्ही गप्प बसा पाहूं. ह्यावेळीं तुम्ही बोलूंच नका त्यांच्याशीं ह्या विषयावर..." प्रॅकल म्हणाला. पण त्याचें न ऐकतां लॉफ्टनें टॉडरला खडसावलें,

" म्हणजे ? काय, म्हणायचं काय आहे तुम्हांला ? तुमच्या प्रश्नाचा मतलब ... ? "

" इतकाच कीं, युद्ध जर संपत आलं असेल तर आतां आपणांला लवकरच घरीं परत जायला मिळेल ..."

" पण आपणांला अद्यापि जिंकलेल्या प्रदेशांची पुनर्घटना करायला थोडा तरी अवधि लागणारच कीं ! नवीन व्यवस्था अशी काय एका दिवसांत प्रस्थापित होत असते वाटतं ? " हंटर टॉडरला म्हणाला.

" आमची सगळी हयात खर्चीं पडणार म्हणायची ! " टॉडरनें म्हटलें.

त्यावर प्रॅकल म्हणाला, " मेजर, उगीच तुम्ही हा विषय वाढवताय त्यांच्याशीं तंडत बसून ... "

" लेफ्टनंट टॉडर ! तुमच्या एकंदर बोलण्याचा रोख मला निराळाच दिसतोय्...हा तुमचा संशयी, तक्रारी सूर मला बिलकुल खपणार नाहीं. बजावून ठेवतों ..."

" जाऊं द्या हो लॉफ्ट ! उगीच नका बोलूं त्यांना. बिचारे कंटाळून गेले आहेत ...आपण सारेजण, तसं म्हटलं तर कंटाळून, वैतागून गेलोंय्... "

" हो पण मेजर, टॅाडरनीं अशा राजद्रोही स्वरुपाच्या वेड्यावाकड्या शंका प्रकट करणं ..."

" पण मी सांगतों ना ? ह्यावेळीं तरी निदान तुम्ही त्यांना जास्त छेडूं नका ..." असें म्हणून हंटरनें लॉफ्टला विचारलें, " बरं, पण कर्नल कुठें आहेत ? "

" ते आपला रिपोर्ट लिहिताहेत. जादा कुमक मागविणार आहेत ते ... कारण, इथली कामगिरी प्रथम वाटली त्यापेक्षां फारच मोठी, जबाबदारीची आहे ..."

" जादा कुमक ? पण ती मिळेल का ? " प्रॅकलनें विचारलें.

" हें मी कसं सांगूं ? "

" जादा कुमक ! जादा रसद ! " टॅाडर हसून म्हणाला, " कुमक म्हणजे इथल्या शिपायांची जागा भरून काढण्यासाठीं शिपाई हवे असतील ... पण मग आपणांला घरीं तरी जायला मिळेल ... आपल्या शहरांतून राजरोस ऐटीनें हिंडायला तरी मिळेल मित्रांच्या घोळक्यांत ... ' ते पाहा लेफ्टनंट टॅाडर चाललेत ' – असं म्हणून कौतुकानें, अभिमानानें माझ्याकडे बोट दाखवतील सारे लोक ... कुणीही माझ्याकडे पाहून हेटाळणीनें हसणार नाहीं. पाठीमागून कुणी खंजीर खुपसण्याचीही धास्ती नाहीं ... आपल्या लोकांत, आपल्या माणसांत ... "

लॉफ्टनें पुन्हां डोळे मोठे करून टॅाडरकडे पाहिलें. प्रॅकल हळूच म्हणाला, " बडबडूं दे त्यांना खुशाल. तुम्ही लक्ष देऊं नका त्यांच्याकडे ... वेडाचा झटका आलेला दिसतोय् आज त्यांना ... "

" आतां स्टाफलाच तेवढं वेड लागायचं शिल्लक उरलंय ... बाकी सारं झालं ... "

" पण कॅप्टन, आम्हांला परत पाठवून दुसऱ्या लोकांना इकडे धाडून देतील असं खरंच वाटतंय् तुम्हांला ? " टॅाडरनें विचारलें.

" पण मी असं कधीं म्हणालों ? " लॉफ्ट खेकसला.

" तुम्ही आत्तांच म्हणालांत कीं ... "

" मी कांहीं सुद्धां म्हणालों नाहीं. हें पाहा लेफ्टनंट, आजघडीला आपण निम्में जग जिंकलं आहे. त्याची आपणाला नीट व्यवस्था लावली पाहिजे ... "

" पण उरलेल्या निम्म्या जगाची काय वाट ? "

" आणखी थोडे दिवस तें आमच्याशीं खुळ्यासारखें लढत राहील ... "

" मग आपली जगभर पांगापांग होणार ! ... "

" थोडे दिवस ! "

" कॅप्टन, त्यांना तोंड बंद करायला सांगा ... " प्रॅकल किंचित् घाबरून म्हणाला, " ह्यांचं हें लक्षण ठीक दिसत नाहीं मला ... "

तोंच टॉडर एकदम मोठ्यांदा हसून म्हणाला, " कॅप्टन, आज मला एक मजेदार स्वप्न पडलं ... कदाचित् खरंही असेल तें ... मनीं वसे तें स्वप्नीं दिसे, अशांतलाही प्रकार असेल तो ... "

" कॅप्टन, आवरा त्यांना ... " प्रॅकल म्हणाला.

" कॅप्टन, आपण हा गांव जिंकलाय् ... खरं ना ? "

" अगदीं खरं ! "

" गांव जिंकलाय् आम्हीं ! आणि आम्हीच भेदरून गेलों आहोंत ! गांवावर ताबा आमचा ! आणि आम्हीच गांवकऱ्यांच्या वेढ्यांत अडकलों आहोंत ! वा ! वा ! खूप गंमत आहे ! ... " एकाद्या वेड्याप्रमाणेंच टॉडर पुन्हां मोठमोठ्यांदा हसूं लागला. आणि हसतां हसतांच म्हणाला, " तरीच मला स्वप्नांत दिसलं कीं आमच्या डिक्टेटरला वेड लागलंय् ... "

आतां मात्र लॉफ्ट आणि हंटर, दोघांनाही टॉडरच्या बडबडीचें हसूं आलें. लॉफ्ट म्हणाला, " खरं आहे. पण आमचा नेता किती वेडा आहे, हें आत्तांपर्यंत साऱ्या जगाला कळून चुकलंय् ! बाकी, ही कल्पना राजधानीकडे पाठवून वर्तमानपत्रांत छापून आणलीच पाहिजे ... आमचा डिक्टेटर वेडा ! फारच छान कोटी ! " टॉडर हसतच होता. तो बडबडतच होता. " विजयामागून

विजय ! तरी पण आम्हीं क्लेशांच्या, सर्वनाशाच्या गर्तेतच खोल खोल गाडले जात आहोंत ! आमचा पुढारी डिक्टेटर वेडा, पागल आहे, हेंच खरं ... चिकटपट्टीला चिकटलेल्या माश्यांप्रमाणें आमची अवस्था झाली आहे. त्या माश्यांनीं आपण ती कागदाची पट्टी जिंकली आहे म्हणून बढाई मारावी त्याचप्रमाणें आम्ही आमच्याबद्दल मूर्खपणानें खोटी बढाई मारीत आहोंत ... दोनशें मैल लांबीची नवी चिकटपट्टी आम्हीं माश्यांनीं ताब्यांत घेतली. पण आतां ह्या माश्या त्यांत कायमच्या अडकून पडल्या ! प्रत्येक ठिकाणीं हीच तऱ्हा ! " —आणि मग टॅंडर पुन्हा इतकें खदखदून हसूं लागला कीं हसतां हसतां त्याला जोराचा ठसका लागला. तरी तो आपला हसतच होता. हंटर आणि प्रॅकल तर घाबरूनच गेले.

" चूप ! तोंड आवरा ... डिक्टेटरला दोष देण्याचा तुम्हांला अधिकार नाहीं ... " टॅंडरला गदगदा हालवून प्रॅकल म्हणाला. तरी पुन्हां टॅंडर हसतच सुटला. तो शुद्धीवर नसल्याची आतां मात्र लॉफ्टची खात्री झाली. त्यानें पुढें होऊन त्याच्या श्रीमुखांत भडकावली. तरी त्याचा कांहीं परिणाम झाला नाहीं. टॅंडर हसतच होता.

" लेफ्टनंट ! बंद करा हें खिंकाळणं ! " असें म्हणत लॉफ्टनें पुन्हा फाड्फाड् दोन मुस्कटांत लगावल्या. मग मात्र टॅंडर एकदम हसायचा थांबला. तो भानावर आल्यासारखा दिसला. त्यानें चकित होऊन आपल्या हाताकडे पाहिलें, तोंड चोळलें व टेबलाशीं जाऊन खालच्या मानेनें तो पुटपुटला, " मला घरीं जायचं आहे. "

# ६

अलीकडे गांवाचें एकंदर वातावरण दिवसां सुद्धा उदास आणि भयानकच भासूं लागलें होतें. हिवाळ्यांतल्या कंटाळवाण्या दीर्घ काळ्याकुट्ट रात्री सुरू झाल्यामुळें रात्रीच्या वेळीं तर तो भयानकपणा जास्तच जाणवत होता. आधींच अंधारी रात्र आणि त्यांतच ब्लॅकआऊटची भर ! त्यामुळें सर्वत्र काळोखाचेंच साम्राज्य पसरलेलें दिसायचें. कर्फ्यू हुकूम जारी असल्यामुळें सगळे रस्तेही निर्मनुष्यच असायचे. अंगावर भाराभर गरम कपडे चढवून हातांत टॉर्च घेऊन सहा–सहाजणांच्या गटानें फिरणारे गस्तवाले सशस्त्र शिपायी आणि गांवठी कुत्रीं ह्यांखेरीज चिटपांखरूं सुद्धां रस्त्याला दृष्टीस पडायचें नाहीं. हिमवर्षाव तर अखंड सुरूच असायचा. रस्त्यावरचें बर्फ लोकांच्या रहदारीमुळें दिवसां तुडविलें जायचें पण रात्रीं मात्र तें तसेंच सांचून राहायचे. बर्फाच्या ढिगाऱ्यांनीं वेढलेलीं बैठीं घरें शेणाच्या गारीप्रमाणें दिसायचीं आणि निमुळत्या छपरांच्या उंच इमारतींची ही कळा बर्फाच्छादनामुळें पांढऱ्या टोप्या घातलेल्या प्रचंड काळ्या पुतळ्यांप्रमाणेंच विचित्र भासायची. सर्वत्र भयाण भेसूर शांतता ! पण गस्तवाल्या शिपायांच्या बोलण्याचालण्याच्या आवाजानें आणि कुत्र्यांच्या भुंकण्यानें मात्र त्या शांततेचा मधून मधून भंग व्हायचा.

आजचीही रात्र अशीच होती. तांदळाच्या कण्यांप्रमाणें बारीक बारीक बर्फ पडतच होतें. बॉम्बर्स विमानांचें लक्ष वेधण्यासाठीं कोठेंही प्रकाशाचा इवलासा कवडसाही दिसत नव्हता. गस्तवाले नेहमींप्रमाणें गप्पागोष्टी करीत रस्त्यानें फिरत होते. त्यांच्या मनांतील आकांक्षा ह्यावेळीं भाषणाच्या रूपानें बाहेर उफाळून येत. मांस, सूप, लोणी, सुंदर सुंदर पोरी... सर्व कांहीं त्यांना हवें

होतें. आणि ह्याचसंबंधीं ते नेहमीं बोलत असत. आजही ते ह्याच विषयांवरच्या गप्पा मारीत होते. जुलमानें कराव्या लागणाऱ्या कामगिरीबद्दलचा आणि एकलकोंडेपणाचाही संताप त्यांच्या बोलण्यांत अधूनमधून व्यक्त होत होता.

बाजार चौकालगतच्या छोट्या गल्लींतल्या रस्त्यावर लहान लहान घरांची व दुकानांची खूपच गर्दी होती. तेथेंच लोखंडी सामानाच्या दुकानाशेजारीं एक छोटेसें घर होतें आणि त्याचेंही निमुळतें छप्पर बर्फानें आच्छादलेलेंच होतें. त्याचीं खिडक्या–दारें गच्च बंद केलेलीं असल्यामुळें आंतल्या दिव्याचा अंधुकसाही प्रकाश–किरण बाहेर डोकावत नव्हता. पण आंत लहानशा बैठकीच्या खोलींत एक रॉकेलचा स्टँड टेबलावर ढणढणत होता. बाहेरचें दार बंद होतें पण बेडरूमचें, सैंपाकघराचें वगैरे सगळीं दारें उघडींच होतीं. भिंतीजवळ एक लोखंडी स्टोव्ह असून त्यांत विस्तव होता. जमिनीवर जुनाट गालिचा अंथरला होता. हिरवळींत मरून पडलेल्या माशाचें व फर वृक्षाच्या फांदीवर मेलेल्या पक्ष्याचें, अशीं दोन चित्रें मागल्या भिंतीवर होतीं. हताश झालेल्या कोळ्याकडे ख्राइस्ट समुद्रावरून चालत येत आहे, असें एक चित्र उजव्या हाताच्या भिंतीवर होतें. रंगीत ब्लॅंकेट घातलेलें एक कोच व दोन खुर्च्या, मध्यभागीं असलेल्या एका छोट्याशा वाटोळ्या टेबलाभोवतीं होत्या. टेबलावरच्या दिव्याचा मंद उबदार प्रकाश खोलीभर पसरला होता. खोलींतल्या भिंतींना सोनेरी वेलबुट्टीचा पिंगट रंगाचा कागद लावलेला होता.

टेबलाजवळच एका जुन्या डोल-खुर्चीवर मॉली मॉर्डेन एकटीच बसली होती. एका जुन्या निळ्या स्वेटरची लोंकर उलगडून त्याची गुंडाळी करण्याचा तिचा उद्योग चालला होता. त्या लोंकरीची बरीच मोठी चेंडूसारखी गुंडी तिनें तयार केली होती. अर्धवट विणकाम, विणण्याच्या सुया, एक मोठी कात्री वगैरे वस्तु टेबलावर दिसत होत्या. विणतांना ती चष्मा लावीत नसल्यानें तोही तेथेंच होता. तिची केशभूषा व वेषभूषा साधीच पण व्यवस्थित नीटनेटकी होती. त्यामुळें तिचा देखणेपणा तर उठून दिसतच होता पण

वयाच्या मानानें ती बरीच तरुणही दिसत होती. हातांनीं झराझर लोंकर उसवून गुंडाळतांना मधून मधून तिची नजर बाहेरच्या दाराकडेही वळत होती. चहूंकडे अगदीं सामसूम होतें. वारा शीळ घालीत होता. गस्तवाल्या शिपायांच्या चालण्याबोलण्याचा अस्पष्ट आवाज मात्र ऐकूं येत होता. मॉलीनें लोंकरीची एक गुंडाळी पुरी करून दुसरी सुरू केली. तोंच बाहेरच्या दाराशीं कांहींतरी सळसळल्याचा आवाज झाला व दारावर तीन टिचक्या वाजल्या. मॉलीनें चटकन् उठून दार उघडलें. आणि पाहिलें तों सर्वांगाभोंवतीं काळें ब्लँकेट लपेटून घेतलेली, लालबुंद डोळ्यांची सैंपाकीण ॲनी दारांत उभी !

" तूं आणि ह्यावेळीं अशी अपरात्रीं इकडे कुणीकडे ? " मॉलीनें विचारलें.

" आधीं मला आंत येऊं दे ... " असें म्हणतच आंत शिरून ॲनीनें झटकन् दार लावलें. थंडीनें कुडकुडत होती ती.

" तिकडे शेगडीजवळ चल ... चांगले शेक हातपाय ... फारच काकडून गेलीस ... आज जरा विशेष गारठा पडलाय नाहीं ? ... " असें म्हणत मॉलीनें ॲनीला शेकोटीजवळ नेलें. हातपाय शेकत शेकत ॲनी म्हणाली, " हे शिपायांचे पांढरे पाय आपल्या गांवाला लागले ना ? म्हणूनच हिंवाळा लवकर आलाय् ... लढाईमुळें हवा खराब होते ... कीं हवा खराब झाल्यामुळें लढाई सुरू होते ? पण असंच कांहीं तरी आमचे बाबा नेहमीं म्हणायचे खरं ... "

" अग, नीट स्वस्थपणानें बैस तरी ... असं उभ्या उभ्याच किती वेळ... "

" छे बाई ! बसायला वेळच नाहीं मला ... ती मंडळी आतां इतक्यांत इकडे येणार आहेत ... "

" ती मंडळी म्हणजे ? "

" मेयरसाहेब, डॉक्टर विंटर नि दोघे ॲंडर्स बंधू ... " बोलत बोलतच ॲनीनें मटन–सॅंडविच्चिसची पुडी सोडली आणि ती मॉलीच्या हातीं देत म्हटलें, " हं आधीं खा हें ... "

मॉलीनें अधाशीपणानें त्या पदार्थांचा फडशा पाडून ॲनीला विचारलें, " पण तूं खाल्लीस का ? "

" मीच तर बनविलीं हीं ... मी खाल्ल्यावांचून कशी राहीन ? जेवणांतल्या साऱ्या पदार्थांची चव मालकाआधीं स्वैंपाकिणीलाच चाखायला मिळत असते."

ॲनीच्या बोलण्याचें मॉलीला हसूं आलें. पण लगेच तिनें सचिंत मुद्रेनें ॲनीला विचारलें, " पण काय ग, मेयरसाहेब इकडे माझ्या घरीं नि ह्या वेळीं कशाला येणार आहेत ? "

" अग, ते दोघे ॲंडर्स बंधू पहांटेच्या प्रहरीं इंग्लंडला बोटीनें पळून जाणार आहेत ... गांव सोडण्याचा प्रसंगच आलाय् त्यांच्यावर ... खाणींतल्या यंत्रांची नासधूस केल्याच्या आरोपावरून आज सकाळींच त्यांच्या भावाला, जॅकला गोळी घालण्यांत आली ... आणि आतां त्यांच्या कुटुंबांतल्या सर्वच मंडळींच्या धरपकडीचं सत्र शत्रूनें सुरू केलंय् ... तेव्हां त्या ॲंडर्स बंधूंना लपून छपूनच राहावं लागणार ... आणि त्यांना कसला तरी निरोप सांगायला मेयरसाहेब नि डॉक्टर त्यांना गुपचुपपणें इथें घेऊन येणार आहेत ... "

" पण मेयर तर आपल्याच वाड्यांत स्थानबद्ध — नजरकैदेंत आहेत ना ? मग ते बाहेर कसे पडूं शकणार ? "

" एक युक्ति योजिली आहे ... मेयरसाहेबांच्या बिछान्यावर जोसेफ झोपणार आहे ... त्यांचेच रात्रींचे कपडे घालून ... आणि मालकीणबाई जोसफच्या शेजारींच झोपणार ! म्हणजे कुणाला संशय येण्याचं कारण नाहीं. नोकराशेजारीं एकाच बिछान्यावर मालकीण झोपणार म्हणजे थोडेसें चमत्कारिक आहे हें. पण करायचं कसं ? "

" बाकी, खुद्द मालकाच्याच मऊमऊ बिछान्यावर बिचाऱ्या जोसेफला मात्र आज अगदीं गाढ सुख-निद्रा मिळणार ! " असें म्हणून मॉली हसली आणि पुढें म्हणाली, " पण असल्या वादळी हवेंत ॲंडर्स बंधूंना बोटीचा प्रवास धोक्याचाच ... "

“ पण इथें राहून शत्रूच्या गोळीला फुकट बळी पडण्यापेक्षां ...”

“ हो, पण ही मंडळी येणार आहेत तरी केव्हां ? ” मॉलीनें मध्येंच विचारलें.

“ आत्तां, अर्ध्या-पाऊण तासांत ! ... मी मुद्दाम घाईघाईनें तुला आधीं सूचना द्यायला आलें ... जातें मी आतां ... पुन्हां येणारच आहें मी त्यांच्याबरोबर ... ”

“ पण तुला कुणी पाहिलं नाहीं ना रस्त्यानें येतांना ? ”

“ आयुष्यांत मी काय आजच पहिल्यांदा चोरून घराबाहेर पडून रात्रीची फिरतेय् होय ? आणि आतां बुढ्या झालेल्या माझ्यासारख्या स्वैंपाकिणीकडे बघणार तरी कोण ? ” असें म्हणून ॲनी लगबगीनें जाऊं लागली पण मध्येंच थबकून हसत हसत म्हणाली, “ बाकी, तितकीशी कांहीं मी अजून म्हातारी झालें नाहीं म्हणा ! पण बाई जातेंच आतां ... इकडे तुझ्या घरीं येण्यांत कांहीं धोका नाहीं असं मला मेयरना जाऊन कळवलं पाहिजे ... ” असें म्हणून ॲनी चटकन् बाहेर पडली आणि अंधारांत दिसेनाशी झाली. मॉलीनें दार बंद केलें.

मॉलीनें पुन्हा विणकाम हातांत घेतलें, पण लगेच तें बाजूला ठेवून दिलें आणि मग शेगडींतले निखारे हालवून सारखे करून आंत आणखी कोळसे टाकले. पण परत ती आपल्या जाग्यावर जाऊन बसणार तोंच पुन्हां कोणीतरी दारावर टक् टक् केलें. ॲनीच पुन्हां परत आली असावी अशा समजुतीनें ‘ पुन्हा कां परतली ही ? ’ असें पुटपुटत तिनें दार उघडलें.

पण दारांत ॲनी नव्हे तर लेफ्टनंट टॅांडर उभा होता !

“ कोण–कोण तुम्ही ? काय पाहिजे तुम्हांला ? चालते व्हा ! ” मॉली खेकसली.

“ घाबरूं नकोस. मी तुला कसलाही त्रास देण्यासाठीं आलों नाहीं. मला आंत येऊं दे ... ” असें बोलतच टॅांडर घरांत शिरला. मॉलीनें दार लावून

टाकलें. आणि पुन्हा दरडावून विचारलें,

" पण कोण पाहिजे तुम्हांला ? "

" मला तूं हवी आहेस ! मला तुझ्याशीं बोलावंसं वाटतं. तुझंही बोलणं ऐकावंसं वाटतं ! बस्स ! एवढीच माझी इच्छा ..."

" पण अशा अपरात्रीं जबरदस्तीनें माझ्या घरांत घुसण्याचं तुम्हाला काय कारण ? "

" मी जरा वेळ बसतों नि निघून जातों. तुला कसलाही त्रास देत नाहीं. माझ्यावर विश्वास ठेव. माझं म्हणणं नीट ऐकून तरी घे ... मी लेफ्टनंट आहें. माझं नांव टॅाडर. युद्धाची चालू परिस्थिति आपण विसरून जाऊं या ... आणि हासत खेळत मजेनें घटकाभर गप्पागोष्टी करूं या ... शत्रुत्वाचं नातं विसरून मित्रत्वाच्या नात्यानेंच आपण परस्परांना जवळ करूं या ... " टॅाडर कळवळून उत्कट जिव्हाळ्यानेंच बोलत होता. मॅालीनें त्याच्या मुद्रेकडे क्षणभर निरखून पाहिलें आणि मग तिच्या ओठांवर स्मित झळकलें. तिनें विचारलें,

" पण मी कोण ? कुठली ? तुम्हाला ठाऊक आहे का ? "

" हो–हो. मी तुला कितीतरी वेळां गांवांत हिंडतांना पाहिलं आहे ..."

" छे–छे ! तुम्हांला माझी कांहींच माहिती दिसत नाहीं. "

" पण तूं सुंदर आहेस ... तुझ्याशीं मला खूप खूप बोलावंसं वाटतंय् ... "

" समजलं. म्हणजे तुम्हांला एकलेपणाचा कंटाळा आलाय् ... " खुर्चीवर बसून हसत हसत मॅाली म्हणाली.

" अगदीं बरोबर ओळखलंस. " ओठावरून जीभ फिरवीत टॅाडर म्हणाला, " तशी तूं चतुरच आहेस. माझी खात्रीच होती, तूं माझी मनःस्थिति नि परिस्थिति जाणणारच ... एकाकी जीवन जुलमानें कंठावं लागत असल्यामुळें मला अगदीं वेड लागायची पाळी आली आहे ग ! अगदीं एकटं एकटं वाटतं मला इथल्या रुक्ष, द्वेषपूर्ण वातावरणांत ... थोडा

वेळ तरी आपण दोघें नाहीं का बोलत बसूं शकणार ? टॅाडर एकाद्या अजागळ पोराप्रमाणें उभा राहून अजीजीच्या स्वरांतच बोलत होता.

मॉलीनें विणकाम हातीं घेऊन बाहेरच्या दाराकडे नजर टाकीत म्हटलें, " बसा थोडा वेळ. पण इथें तुम्हांला पंधरा मिनिटांपेक्षां जास्त वेळ थांबतां येणार नाहीं. "

इतक्यांत कसला तरी आवाज झाला. मॉलीची नजर दाराकडे गेली. टॅाडरनें चपापून विचारलें, " घरांत दुसरं कुणी आहे ? "

" छे ! छपरावरचं सांचलेलं बर्फ खालीं पडलं. त्याचा आवाज झाला. तें सगळं काढून टाकायला हवं. पण आतां घरांत कुणी पुरुष माणूस नाहीं ... "

" म्हणजे ? आमच्याकडूनच कांहीं बरंवाईट घडलं का ? "

मॉलीनें मानेनेंच होकार दिला.

" माफ कर हं ! " असें म्हणत टॅाडर खुर्चीवर बसला. " मग मी छप्पर साफ करून देऊं का ? "

" छे–छे ! मुळींच नको. "

" तें कां ? "

" अहो, तुम्हीं माझीं घरचीं कामं करूं लागलांत तर लोक काय म्हणतील ? मी शत्रूशीं संगनमत केलंय् असं समजून ते मला गांवांतून हाकलून देतील ना ? "

" हो, तेंही खरंच. आम्ही गांवाचे शत्रु आहोंत नाहीं का ? पण तुझ्यासाठीं वाट्टेल तें करण्याची माझी तयारी आहे. मला तूं हवी आहेस ... "

" मग त्यासाठीं एवढीं आर्जवं–आळवण्या करून माझ्याजवळ दीनपणें याचना करण्याचं काय कारण तुम्हांला ? " परिस्थिति काबूंत आल्यासारखी वाटून किंचित् कठोर स्वरांत मॉली म्हणाली, " तुम्ही जेते आहांत ! हवी असलेली वस्तु जेते लोक हातानें हिसकावून घेत असतात ! त्यासाठीं असे दीनपणानें हात पसरीत नसतात ! "

" पण मला तसं करायचं नाहीं. तुझ्याशीं पशूप्रमाणें वागायचं नाहीं..."

" मी तुमच्यावर प्रेम करावं म्हणतां ? "

" हो. कां नाहीं ? तूं किती मोहक आहेस ! तुझ्याइतकी सुंदर, चतुर, प्रेमळ चेहेऱ्याची तरुणी कितीतरी दिवसांत मला दिसली नाहीं. इथें तर कोणत्याही स्त्रीच्या मुद्रेवर सहानुभूति, दया ... "

" माझ्या मुद्रेवर दिसते तुम्हांला सहानुभूतीची, दयेची छटा ? "

" दिसावी अशी इच्छा आहे ..." मॉलीकडे निरखून पाहात टॉडर म्हणाला.

अखेर आपली नजर खालीं वळवीत मॉलीनें म्हटलें, " एकूण, माझ्यावर तुमचं प्रेम जडलेलं दिसतंय् लेफ्टनंटसाहेब ! "

" होय. आणि तूं सुद्धां माझ्यावर प्रेम करावंस, अशी माझी इच्छा आहे. तूं मला आपला म्हण ... शब्दांनीं सांगूं नकोस. नजरेनेंच बोल ... रात्रंदिवस तुझाच विचार माझ्या मनांत घोळत असतो. तुला आमच्या लोकांकडून कदापि त्रास पोचूं नये अशा अर्थाचे मीं हुकूम सोडले आहेत. तुला कधीं कुणीं त्रास दिला ? "

" नाहीं- " मॉली शांतपणें म्हणाली. जास्तच भावनावेगानें टॉडर म्हणाला, " मी तुझ्यावर एक कविताही रचली आहे ... दाखवूं म्हणून ? "

" लांबलचक नाहीं ना ती ? तुम्हांला इथून लवकर गेलं पाहिजे. लक्षांत आहे ना ? "

" हो. पण अगदीं छोटी आहे माझी कविता. फक्त चारच ओळी ... " असें म्हणतच टॉडरनें खिशांतून एक कागदाची घडी काढून ती मॉलीच्या हातांत दिली. दिव्यापाशीं वाकून चष्मा लावून मॉली सावकाशपणें वाचूं लागली.

दिव्य कान्ति तव मुखचन्द्राची;
प्रीति - पूर्णिमा अखण्ड फुलती !
नाचवि नित मम हृदयसागरा
उसळत आनन्दाची भरती !

तिनें कागदाची घडी करून ती मांडीवर ठेवीत विचारलें, “ खरंच, तुम्हीं लिहिलींत ही कविता ? ”

“ होय. मीच लिहिली ती ... ”

“ मला उद्देशून ? ... खरं नाहीं वाटत मला ... कुणाची कविता ही ? खरं सांगा ... ”

“ माझी नव्हे ...एका प्रख्यात कवीची आहे ... ” जरासें ओशाळून टॅाडर म्हणाला, “ पण मला ही कविता फार आवडते ... तुझा मुखचंद्रमा, तुझे निळे डोळे ... ” आणि मग तो मोठ्यांदा हसूं लागला. मॉलीही हसली. पण मग एकदम थांबून तो किंचित् विषण्णतेनें म्हणाला, “ ईश्वरसाक्ष ! इतक्या मोकळ्या मनानें किती तरी दिवसांत मी हसलों नाहीं ... तूं दिखील किती गोडगोड दिलखुलास हसतेस ग ! तुझं हें प्रसन्न मधुर हास्य तुझ्या सौंदर्याइतकंच विलोभनीय आहे ... ”

“ पुन्हा तुमचं काव्य सुरू झालं. पुरे करा हें प्रेमाचं पुराण ! इथून आतां लवकर जा ... ”

“ प्रेमाशिवाय जीवन नाहीं. माणसाला प्रेमाची भूक स्वाभाविकच असते. प्रेमाशिवाय हृदय रुक्ष, शुष्क होऊन जातं ...एकलेपणाची आग नाहीं ग सहन होत ... ”

मॉलीनें खुर्चीवरून उठून दाराकडे किंचित् भेदरलेली नजर टाकली. तिची मुद्रा उग्र बनून तिच्या नजरेंत सूडाची छटा तरळूं लागली. तिनें टॅाडरला स्पष्ट शब्दांत विचारलें, “ तुम्हांला इथें रात्रभर मुक्काम करायचा आहे का ? ”

“ तसं मीं कधीं म्हटलं ? माझा सहवास तुला आवडत नाहीं का ? ”

“ माझाच सहवास तुम्हांला आवडणार नाहीं. तिरस्कार कराल तुम्ही माझा. मी कुमारिका नाहीं ... विधवा आहें ... ”

“ पण मी तुला आवडत नाहीं का ? ”

" तुम्ही सुसंस्कृत, सुशिक्षित आहांत ! परस्परांविषयीं आसक्ति असेल तरच प्रीति सुफल होते, सुखदायी होते . . तुम्हांला कळलं पाहिजे हें ... "

" असं कां बरं बोलतेस ? माझी प्रीतीची भूक ... "

" तुम्हांला प्रीतीची भूक लागली आहे, पण माझ्या उपाशी पोटाला अन्नाची भूक लागली आहे ... आज दोन दिवस माझ्या पोटांत अन्नाचा कण नाहीं ... तुम्हीं लोकांनीं धान्य देण्याचं बंद करून आम्हांला उपाशी मारायचं ठरवलंय् ... मीं तुमच्यावर प्रेम करायला हवं ना ? मग आधीं मला खायला द्या कांहीं तरी ... "

" काय बोलतेस हें ? माझी चेष्टा तर करीत नाहींस तूं ? "

" चेष्टा ? पोटांत आग पडलेल्या माणसाला चेष्टा सुचत नाहीं. आणि प्रेमचेष्टा तर नाहींच नाहीं ! लेफ्टनंटसाहेब ! इतका वेळ इथें तुम्ही माझ्या सहवासांत आनंदांत वेळ घालवलांत त्याचं मोल म्हणून तरी ... "

" छे–छे ! असं बोलणं तुला शोभत नाहीं ... "

" कां शोभत नाहीं ? भुकेनें माझे प्राण व्याकुळ झाले आहेत ... गेल्या महायुद्धानंतर तुमच्या देशांतल्या तरुण स्त्रियांवर कोणता प्रसंग ओढवला होता तुम्हांला ठाऊक नाहीं ? एका अंड्यासाठीं, पावाच्या एका तुकड्यासाठीं त्यांना आपल्या शीलाचं बलिदान करावं लागलं होतं ! तसाच प्रसंग आज तुम्ही आमच्यावर ... "

" पुढें बोलूं नको ... "

" कां बोलूं नको ? मी तुम्हांला फुकटांत का हवी आहें ? माझा भाव दोन सॉसेजीस आहे. जास्त आहे का हा भाव ? "

" छे–छे ! माझ्याच्यानें हें ऐकवतच नाहीं. आमच्याबद्दलचा तुझा द्वेष ... रास्त असेल तो ... पण तूं माझ्यावर रागावूं नकोस. मी शत्रुपक्षाचा लेफ्टनंट असलों तरी एक साधा माणूस म्हणूनच ह्यावेळीं तुझ्याकडे आलों आहें ... तुझं माझं कसलंच वैर नाहीं ... तूं माझा द्वेष करूं नकोस ... "

“ मी तुमचा द्वेष करीत नाहीं. पण मी भुकेली आहें म्हणूनच ... ”

“ मी तुला वाटेल तें देईन पण ... ”

“ पण काय ? एकूण तुम्हांला प्रेम करणारी प्रेयसी हवी आहे. अन्नाच्या मोबदल्यांत देहाचं दान करणारी वेश्या नको आहे, असंच ना ? ”

“ किती कठोर बोलतेस तूं ? ”

“ सत्य नेहमीं कठोर नि कटुच असतं ... ” मॉलीनें असें म्हणून क्षणभर टॉंडरकडे पाहिलें. टॉंडर उठून तिच्याजवळ गेला आणि तिचा हात आपल्या हातांत घेऊन मृदु स्वरांत म्हणाला, “ कृपा करून माझा तिरस्कार करूं नकोस.”

“ नाहीं करीत ... मी दिखील एकटीच आहें ... ” बोलत असतांना मॉलीचीं बोटें टॉंडरच्या हातावरून फिरलीं.

“ ह्या साऱ्या लढाईच्या धुमश्चक्रींत आपल्यालाही जगायचा हक्क आहेच ना ? ”

“ होय. ” टॉंडरच्या गालांवरून हात फिरवून मॉली उद्‌गारली. तिच्या खांद्यावर हलकेच हात ठेवून टॉंडर म्हणाला, “ मी तुझा सांभाळ करीन. मृत्यूचं थैमान सुरू असलं तरी आपणांला जगायचा हक्कच आहे ... ”

“ जगायचा हक्क ... ” मॉली एकदम कावरीबावरी झाली. एकदम तिचें सर्वांग शहारलें. नेत्र विस्फारून ती शून्य दृष्टीनें समोर भिंतीकडे पाहात राहिली ...

“ काय झालं ग ? ” टॉंडरनें चपापून खांद्यावरचा हात काढून मॉलीला विचारलें.

पण कसल्या तरी दुःखदायक पूर्वस्मृतींचें चित्र डोळयांपुढें प्रत्यक्ष पाहात असल्यासारखी कष्टी मुद्रा करून आपल्याच तंद्रींत मॉली चमत्कारिक गंभीर स्वरांत बोलूं लागली, “ पहिल्यांदा शाळेंत जाणाऱ्या मुलासारखे मीं त्यांना कपडे घातले. त्यांच्या शर्टचीं बटणं लावलीं. त्यांचं सांत्वन करण्याचा प्रयत्न केला. पण ते घाबरले होते ... त्यांना घरीं यायला परवानगी तरी त्यांनीं कां दिली कुणास ठाऊक ? गोंधळून गेले होते ते. काय चाललंय् हेंच मुळीं त्यांना समजेना. ते तसे शूर होते पण त्या प्रसंगीं घाबरले ... पहिल्यांदा शाळेंत जातांना

लहान मुलगा घाबरतो तसेच ते घाबरले ... जातांना त्यांनीं मला विचारलं देखील नाहीं ... नेहमींसारखं माझं चुंबन देखील घेतलं नाहीं घराबाहेर पडतांना ... ”

“ कुणाविषयीं बोलतेस तूं ? ” टॉडरनें घाबरून विचारलें.

“ माझ्या पतीविषयीं ! ”

“ म्हणजे ? एकूण, तो तुझा नवरा होता ! ”

“ होय. तुम्ही-तुम्ही लोकांनींच त्याला गोळी घालून ठार केलंत ! मला वैधव्य दिलंत ! मेयरसाहेबांकडे गेलें मी. पण तेही त्यांना जीवदान देऊं शकले नाहींत ... नाइलाज झाला त्यांचा ... त्यावेळीं त्या चमत्कारिक प्रसंगावर माझा विश्वासच बसेना. पण आतां मात्र विश्वास बसतोय् ... अर्धवट उबदार असलेल्या बिछान्यांत एकलेपणाच्या जाणीवेनें रात्रीं तळमळत पडलें म्हणजे तो भयंकर प्रसंग डोळ्यांसमोर उभा राहातो ... ”

टॉडरची मुद्रा काळवंडून गेली. मॉलीची समजूत कशी घालावी हेंच त्याला समजेना. बावचळलेल्या मुद्रेनें तो म्हणाला, “ बराय् ... जातों मी ... देव तुझं भलं करो ... गुड् नाइट ! ... पण पुन्हा मी येऊं ना ? ”

“ मला विचारूं नका. ”

“ पुन्हा येईन मी. ” असें म्हणून टॉडर मुकाट्यानें चालता झाला. ‘ देव तुझं भलं करो ! ’ असें पुटपुटत समोरच्या भिंतीकडे शून्य नजर लावून मॉली तशीच उभी होती.

इतक्यांत हलकेच दार उघडून ॲनी आंत आली. मॉलीचें तिच्याकडे लक्षच गेलें नाहीं. येतांक्षणींच नापसंतीच्या रागीट स्वरांत ॲनीनें विचारलें, “ मॉली ! दार उघडं होतं ? कोण आलं होतं ? ”

मॉलीनें नुसतें ॲनीकडे पाहिलें. अजून तिचे डोळे विस्फारलेलेच होते. ॲनीनें पुन्हा म्हटलें, “ कुणी तरी बाहेर गेलेलं मीं पाहिलं ! शिपायासारखा दिसला ... ”

“ शिपाईच होता तो ! ” मॉलीनें शांतपणें सांगितलें.

“ तुझ्याकडे कशाला आला होता तो ? ”

“ रात्रीं अपरात्रीं लष्करी लोक एकस्त्यादुकस्त्या स्त्रियांचीं घरं कशाला धुंडाळीत असतात, ठाऊक नाहीं तुला ? ”

“ म्हणजे ? मॉली ! तूंच का बोलतेस हें ? त्या कोरेलप्रमाणं तूं दिखील शत्रूला सामील झालीस काय ? ”

“ मुळींच नाहीं. ”

“ मेयरसाहेब इथें आल्यावर त्यांना जर कांहीं दगाफटका झाला तर त्याची सर्व जबाबदारी तुझ्यावर आहे. ”

“ माझी जबाबदारी मी ओळखतें ... ”

“ पण तो मघांचा शिपाई पुन्हा आला तर ? ”

“ तो पुन्हा येणार नाहीं. मी त्याला आंत घेणार नाहीं ... ”

“ मग त्यांना इथें बोलावूं ? इथें कांहीं धोका नाहीं ना ? ” मॉलीकडे संशयाच्या नजरेनें पाहातच ॲनीनें विचारलें.

“ मुळींच धोका नाहीं. बोलाव त्यांना. कुठें आहेत ते ? ”

“ बाहेर तिकडे कुंपणाआड उभे आहेत ... ”

“ घेऊन ये त्यांना ... ”

ॲनी गेल्यावर मॉलीनें आपले केस सारखे केले. डोळे स्वच्छ पुसले. मान झटकून पुन्हा पूर्ववत् दिसण्याचा प्रयत्न केला. इतक्यांत कांहीं तरी खुसपुसलें आणि दोन गौरवर्ण सुदृढ तरुण आंत आले. त्यांच्या अंगांत जाकिटें असून त्यांवर काळे स्वेटर होते. दोघेही जुळ्या भावंडांसारखे दिसत होते. हेच ते कोळी ॲडर्स बंधू–विईल नि टॉम !

“ गुड् ईव्हिनिंग, मॉली ! तुला कळलीच असेल सारी हकीकत ... ” टॉम म्हणाला.

" होय. ॲनीनें सांगितलंय् मला सगळं. पण सफरीला आजची रात्र चांगली नाहीं ..."

" वा ! असलीच वादळी रात्र फार चांगली. चांदण्या रात्रीं विमानं टेहळूं शकतात. आज ती धास्ती नाहीं. पण मॉली, मेयरनीं कशाला बोलावलंय् आम्हांला इथें ? "

" मला काय ठाऊक ? कांहीं तरी निरोप सांगायचा असेल ... तुमच्या बंधूविषयींही समजलं. फार वाईट झालं ..."

" परिस्थितीचा तडाखा तुलाही मिळालाच आहे कीं ..."

" मला तर जन्माची आठवण राहिलीय् सध्यांच्या परिस्थितीची ..."

इतक्यांत मेयरना व डॉक्टर विंटरना घेऊन ॲनी आली.

मेयरनीं येतांक्षणींच कोट-टोपी कोचावर टाकून मॉलीच्या कपाळाचें चुंबन घेतलें आणि ॲनीकडे वळून ते म्हणाले, " ॲनी, तूं दाराशीं उभी राहा आणि पहारेकरी आले कीं एक टिचकी वाजव, पहारेकरी पुढें निघून गेले कीं एक टिचकी वाजव आणि कांहीं धोका दिसला तर मग दोन टिचक्या वाजव ... बाहेरचं दार बंद करतांना त्याला थोडी फट ठेव म्हणजे कुणी आलं, गेलं तर तुला तें कळेल ... "

मधल्या खोलीचें दार घट्ट लावून घेऊन ॲनी बाहेरच्या दाराजवळ जाऊन उभी राहिली.

सर्व मंडळी आसनस्थ झाल्यावर डॉ. विंटर ॲंडर्स बंधूंना म्हणाले, " आज तुम्ही जाणार असं समजलं ... "

" गेलंच पाहिजे आम्हांला ... " टॉम म्हणाला.

" पण तुम्ही कोरेललाही बरोबर नेणार म्हणे ? " मेयरनीं विचारलें.

" होय. तसंच करणं योग्य आहे. " टॉम कडवटपणें हसून म्हणाला, " त्याचीच होडी आम्ही घेऊन जातोंय् ... त्याला इथें गांवांत ठेवण्यापेक्षां ..."

" पण त्याला बरोबर नेणं धोक्याचं वाटत नाहीं तुम्हांला ? "

" पण ह्यापुढें त्याला इथें गांवांत राहूं देणं जास्त धोक्याचं आहे. "

" हो, पण तुम्ही त्याला कसे उचलणार इथून ? तो काय तसा गाफील माणूस आहे ? मोठा धूर्त कावेबाज कोल्हा तो ... " डॉ. विंटर म्हणाले.

" पण आम्हीही वस्ताद आहोंत कीं ! रात्रीं एक-दीडच्या सुमारास तो घरीं परत जात असतो. आम्ही भिंतीआड दडून बसणार आणि एकदम त्याची मुस्कटदाबी करून त्याच्याच बागेंतल्या जवळच्या वाटेनें त्याला समुद्राकडे नेणार. त्याची होडी तिथें आहेच. दुपारींच आम्ही ती पाहून, तपासून ठेवलीय् ... " विईल अँडर्स म्हणाला.

" पण एकंदरींत हें सारं धोक्याचंच. तो कोरेल आरडाओरड करील ... मग गस्तवाले येतील ... "

" पण त्याला ओरडूं देतो कोण ? सरळ नेऊन समुद्रांत बुडवायचा ! अहो, इथें उगीच कधीं तरी लोकांच्या तावडींत तो सांपडायचा ... लोक त्याला ठार करायचे आणि त्याच्यापायीं पुन्हा पांचपन्नास लोकांचे मुडदे पडायचे ! त्यांपेक्षां त्याला तिकडे समुद्रांतच गुपचुप जलसमाधि दिलेली काय वाईट ? " असें म्हणून टॉम मिष्किलपणानें हसला.

" पण मेयरसाहेब, तुम्ही आम्हांला कशाला बोलावलंत भेटीला ? " विईलनें विचारलें.

" तुम्हांला कांहीं सांगायचं आहे. " मेयरसाहेब म्हणाले, " मी व डॉक्टरनीं खूप विचार केला चालू परिस्थितीचा. आमच्यावर अचानक हल्ला चढवून शत्रूनें अन्यायानें आमचा गांव ताब्यांत घेतला हें खरं असलं तरी आम्ही अजून जिंकले गेलों नाहीं खास ... "

इतक्यांत दारावर टिचकी ऐकूं आली. त्यासरशीं खोलींत एकदम शांतता पसरली. मॉलीच्या हातांतल्या विणकामाच्या सुया जागच्या जागीं थबकल्या. मेयरनीं पुढें केलेला हात तसाच हवेंत लोंबकळत राहिला. टॉम डाव्या हाताच्या बोटानें कान खाजवीत होता. तो हात तेथेंच थांबला. प्रत्येक व्यक्तीनें निश्चल,

निस्तब्ध होऊन आपले डोळे दारावर खिळविले. प्रथम अस्पष्टपणें पण नंतर वाढता असा पहारेकऱ्यांच्या बुटांचा करकर आवाज ऐकूं येऊं लागला. ते दारावरून निघून गेल्यावर त्यांच्या चालण्याबोलण्याचा आवाज ऐकूं येईनासा झाला. दारावर दुसरी टिचकी वाजली. लगेच सर्वांनीं सुटकेचा श्वास टाकला. खोलींतील वातावरण पूर्ववत् झालें. ॲनीनें आपली कामगिरी उत्कृष्ट बजावल्या-बद्दल मेयर खूप झाले. 'बिचारी थंडीनें कुडकुडत असेल' असें म्हणून त्यांनीं आपला ओव्हरकोट दार उघडून ॲनीला नेऊन दिला आणि परत आपल्या जाग्यावर येऊन बसत ते म्हणाले, " ही ॲनी नसती तर माझं कसं झालं असतं देव जाणे ! बिचारी चहूंकडे हिंडते, सारं पाहाते, ऐकते आणि घरबसल्या गांवांतली सारी बित्तंबातमी मला येऊन कळवते ..."

ॲनीच्या गुणवर्णनांत मेयरसाहेब तल्लीन झालेले पाहून टॉमनें हळूच सुचविलें, " मेयरसाहेब, आम्हांला जरा घाई आहे जायची ..."

" हो - खरंच !" मेयर मूळ मुद्यावर आले, " तर काय सांगत होतों मी... थोड्याच दिवसांपूर्वी शत्रूनें ॲलेक्स मॉर्डनला गोळी घालून ठार केलं आणि आज तुमच्या बंधूची—जॅक्सूचीही त्यांनीं तीच गत केली. ह्या प्रकारामुळें आपले लोक मनांतून खूप संतापले आहेत. पण उपयोग काय नुसतं संतापून ? शत्रूचा सूड घेतला पाहिजे. हा लढा कल्पनेविरुद्ध कल्पना असा नसून जनतेविरुद्ध जनता असा आहे ..."

" माझ्यासारख्या डॉक्टरनें संहाराची, हिंसेची भाषा बोलणं जरा चमत्कारिकच आहे. पण लोक प्रतिकारासाठीं मनांतून फारच हपापलेले आहेत. पण शत्रु शस्त्रसंपन्न आहे आणि आपण निःशस्त्र आहोंत. शत्रूच्या सैनिकांपेक्षां आमची संख्या जास्त आहे. पण नुसत्या मनुष्यबळाचा काय उपयोग ? शस्त्रबळ हवं ! आमच्या मनांत हिंमत आहे. अंगांत ताकद आहे. पण निःशस्त्र माणसाची हिंमत फार वेळ तग धरूं शकत नाहीं ..." डॉ. विंटर म्हणाले.

विईल ॲंडर्सनें विचारलें, " पण मग आम्ही काय करावं अशी आपली इच्छा आहे ? "

" शत्रूशीं लढण्याची इच्छा असूनही आम्ही शस्त्राभावीं लढूं शकत नाहीं. त्यांतून शत्रूनें आमच्यावर आतां भूकमारीचा नवाच प्रयोग सुरू केला आहे. अन्नाच्या अभावीं भुकेनें प्राण सोडायची पाळी आली आहे लोकांवर ... "
थोडें थांबून मेयर पुढें म्हणाले, " तुम्ही इंग्लंडला निघालां आहांत. तेव्हां तिथल्या लोकांना आम्हांला शस्त्रं पाठवायला सांगा. कदाचित् तुमच्या सांगण्याकडे ते तितकेसें लक्ष देणार नाहींत. परंतु साऱ्या गांवाच्या वतीनें तुम्ही त्यांना एवढा विनंतीवजा निरोप सांगाच ... आम्हांला शस्त्रं हवीं आहेत ... "

इतक्यांत पुन्हा दारावर टिचकी वाजली व सर्वजण जागच्याजागीं थिजल्यासारखे झाले. बाहेरून पहारेकऱ्यांच्या धांवपळीचा आवाज आला. विईल लगेच आंतल्या खोलींत गेला. धावण्याचा आवाज घरानजीक आला. इतक्यांत कोणीतरी पहारेकऱ्यांना दुसरा हुकूम दिला असावा. कारण, ते लगेच मॉलीच्या घराकडे न येतां दुसरीकडेच धावत गेले. ते निघून जातांच दारावर दुसरी टिचकी वाजली.

" कुणाचा तरी पाठलाग चाललाय् . . . कुणाच्या बरं मागें लागले असतील ? "

" इकडेच वळले होते वाटतं . . ."– पण तो विषय तितक्यावरच थांबला.

टॉम चुळबुळ करीत मेयरना म्हणाला, " एकूण तुम्हांला तोफा, बंदुका हव्या आहेत. होय ना ? "

" छे – छे ! असल्या मोठ्या अवजड युद्धसाहित्याचा इथल्या सध्यांच्या परिस्थितींत आम्हांला कांहींच उपयोग होणार नाहीं . . . " मेयर म्हणाले, " आमच्या छोट्या मोठ्या हालचालींवर डोळ्यांत तेल घालून शत्रूनें पाळत ठेवली आहे. म्हणून सहज चोरून वापरतां येणारीं, साधीं, लहान लहान गुप्त शस्त्रं आम्हांला हवीं आहेत. छोट्या मशीनगन्स्, टॉमी गन्ससुद्धा नकोत. फक्त छोटे बॉम्बस्, डायनामिटच्या कांड्या, असलीं स्फोटक द्रव्यं, फार काय, विषसुद्धां पाठवून द्या म्हणावं . . . विष दिखील उपयोगांत आणायला कांहीं हरकत नाहीं. हें कांहीं धर्मयुद्ध नव्हे. बोलूनचालून दगाबाजीचं, अमानुष

अत्याचारांचं राक्षसी तांडव हें ! इथें न्यायनीतीचा प्रश्नच नाहीं. ठकाशीं ठक बनून शत्रूंचेच दुष्ट उपाय आम्ही आतां त्यांच्या विरुद्ध योजणार ! ब्रिटिश बॉम्बर्सनीं खाणीवर वगैरे खुशाल मोठे बॉम्बस् टाकावेत. पण आमच्या उपयोगासाठीं मात्र त्यांनीं छोटे हातबॉम्बसुद्दी विमानांतून खालीं फेकावेत. म्हणजे मग आम्ही सशस्त्र होऊनही शत्रूला त्या गोष्टीची गंधवार्ता कळणार नाहीं आणि आमच्यापैकीं कुणाकुणाजवळ कसलीं कसलीं शस्त्रं आहेत, ह्याचाही त्याला थांगपत्ता लागणार नाहीं. मग कराल ना एवढी कामगिरी ? " मेयरनीं अँडर्स बंधूंना अगदीं कळवळून विचारलें.

टॉमी अँडर्स म्हणाला, " इंग्लंडला आम्ही सुखरूप पोंचलों तर हा तुमचा निरोप तिथल्या युद्धखात्यांतल्या अधिकाऱ्याना अवश्य कळवूं. पण मी असं ऐकलंय् कीं तिथले अधिकारी अशीं युद्धोपयोगी शस्त्रं सामान्य जनतेच्या हातीं द्यायला अजून तयार नाहींत. "

" खरं म्हणतां ? हें नव्हतं मला ठाऊक. पण इंग्लंड–अमेरिकेंत अजूनही जर अशाच विचारसरणीच्या लोकांच्या हातांत राज्यकारभार असेल तर मग जगाची धडगतच नाहीं म्हणायची ! पण तुम्ही त्यांना आमचा निरोप तर नीट समजावून सांगा. मग पाहूं पुढें काय होईल तें. आम्हाला मदत हवी आहे आणि तीही फक्त छोट्या गुप्त शस्त्रांची. ती मिळाली कीं मग कसं नि काय करायचं तें सारं आमचं आम्ही पाहून घेऊं ... " असें म्हणून मेयरनीं डॉ. विंटरकडे अर्थपूर्ण दृष्टीनें पाहिलें.

डॉक्टर म्हणाले, " आम्ही शत्रूला हरतऱ्हेनें हैराण करून सोडूं. त्यांचे रेल्वेरस्ते उखडून टाकूं ... धान्याचे, दारू-गोळ्याचे साठे उडवून लावूं ... "

" त्यांची झोपच उडवून टाकूं कायमची ! " मॉली म्हणाली.

" त्या दोस्तांनीं आम्हांला नुसती डायनामीटस् दिलीं तरी आम्ही तीं जमिनींत पुरून ठेवूं आणि वेळप्रसंगीं त्यांचा उपयोग करूं. " विंटर म्हणाले.

" अच्छा ! एवढाच ना तुमचा निरोप ? "

" हो–हो, एवढाच निरोप. ही कामगिरी तुम्ही पार पाडलीत म्हणजे आपल्या मायभूमीची मोठी मोलाची सेवा तुमच्या हातून घडल्यासारखं होणार आहे. " मेयर म्हणाले.

" पण त्या लोकांनीं आमची मागणी मनावरच घेतली नाहीं तर ? " टॉमनें विचारलें.

" तुमचा आज रात्रीं फरारी होण्याचा जसा प्रयत्न आहे, तसाच हा एक प्रयत्न ... "

" ठीक आहे. आम्ही आमच्याकडून प्रयत्नांची पराकाष्ठा करतों ... बरं, पण जातोंच आम्ही आतां ... "

" जरा थांबा. रस्त्यावर आसपास कुणी आहे का तें पाहायला आधीं ॲनीला सांगतों. म्हणजे मग तुमचा मार्ग निर्धोक ... " असें म्हणत मेयर उठले तोंच घाबऱ्या घाबऱ्या येऊन ॲनी सांगूं लागली, " समोरच्या रस्त्यानें कुणी एक सैनिक इकडेच येत आहे ... मघाशीं तुम्ही येण्यापूर्वीं एक सैनिक इथें मॉलीकडे आला होता. तोच पुन्हा आलेला दिसतोय् ... " बाहेरच्या दाराला कुलूप ठोकून आलें आहे ... "

सर्वांच्या संशयी नजरा मॉलीवर खिळल्या. मेयरनीं जरा दरडावूनच विचारलें, " मॉली, ॲनी सांगते हें खरं का ? "

" होय, खरं आहे तें. " मॉलीनें अंमळ विचार करून निर्भयपणानें उत्तर दिलें.

" कोण, कशाला आला होता तुझ्याकडे ? " विंटरनीं विचारलें.

" लेफ्टनंट टॅांडर, माझ्याशीं प्रणयचेष्टा करायला ... "

" म्हणजे ? मॉली, मॉली, तूं संकटांत तर सापडलेली नाहींस ? " मेयरसाहेबांच्या मनांत मॉलीविषयीं सहानुभूति उत्पन्न झाली. त्यांचा राग मावळला.

तितक्यांत दारावर टक् टक् असा आवाज झाला. मेयर म्हणाले, " आलाच वाटतं तो. मॉली, आम्ही इथेंच थांबतों. तो तुला त्रास देऊं लागला तर तुझ्या मदतीला ... "

“ नको–नको. ” मॉली एकदम म्हणाली, “ तुम्ही आतां इथें थांबूं नका. लवकर निघून जा. तो मला त्रास देऊं लागला तर त्याचा समाचार घ्यायला, कायमचा निकाल लावायला माझी मी समर्थ आहें ... पण तुम्ही मात्र त्या मागल्या दारानें बाहेरचा रस्ता धरा ... ” असें म्हणून मॉलीनें दार उघडून जवळजवळ ढकललेंच बाहेर सर्वांना. ॲनी मात्र मागें रेंगाळत राहिली. ती म्हणाली, “ एव्हांच तूं त्या टॉडरला कांहीं सांगूं नकोस हं ! ”

“ म्हणजे ? ॲनी, तूं मला काय दुधखुळी समजतेस कीं दुष्ट समजतेस ? ”

“ तसं नव्हे ग ! पण–पण कशाला ग पुन्हा आलाय् तो ? ”

“ मरायला ! तुला काय करायच्या नसत्या चौकशा ? चालती हो आधीं ... ” असें म्हणत मॉलीनें ॲनीला दाराबाहेर लोटलें नि दार बंद केलें.

तिकडे बाहेरच्या दारावर टक् टक् चाललेंच होतें. हलक्या आवाजांतल्या पुरुषाच्या हांकाही ऐकूं येत होत्या.

सर्व मंडळी निघून गेल्यानंतर आपल्यावरील एक जबाबदारी संपली म्हणून मॉलीनें समाधानाचा निःश्वास टाकला.

तिच्या मनावरचें दडपण मात्र जास्तच वाढल्याचें तिच्या मुद्रेवरून स्पष्ट दिसत होतें.

सावकाशपणें मॉली बैठकीच्या खोलींत टेबलाजवळ आली. टेबलावर तिचें विणकामाचें सामान आणि मोठी कात्री पडलेली होती. त्यांतली कात्री तेवढी मॉलीनें उचलली आणि लांब सुऱ्यासारखी आपल्या मुठींत घट्ट धरून पाहिली. एक प्रकारचें निराळेंच तेज तिच्या डोळ्यांत क्षणभर चमकून गेलें. कसला तरी ठाम निर्धार केल्यासारखी मुद्रा करून तिनें आपला खालचा ओठ चावला आणि ती कात्री आपल्या अंगावरच्या पोशाखांत लपवून ठेवली. नंतर तिनें एकाच फुंकरींत दिवा मालवून टाकला. खोलींत सर्वत्र काळोख पसरला. नाहीं म्हणायला शेगडींतले निखारे मात्र अंधुकपणें धगधगत होते.

बाहेरचें दार पुन्हा जोरानें ठोठावलें गेलें.

"आलें–आलेंच हं लेफ्टनंटसाहेब!" असें म्हणत अंधारांत चांचपडतच मॉली बाहेरचें दार उघडायला गेली. मॉलीनें दार उघडतांच टॉडर घरांत शिरला.

त्यानंतर लेफ्टनंट टॉडर पुन्हां कधीं कोणाच्या दृष्टीस पडला नाहीं!

२८८६१
आ. भा.
११३४
२७/३/८

# ७

बर्फाच्छादित पांढऱ्या शुभ्र टेकड्या उशाशीं घेऊन बर्फाची पांढरी पासोडी आपादमस्तक पांघरून सारा गांव गाढ झोपीं गेला होता. आसपासच्या प्रदेशांत पांढऱ्या वाळूप्रमाणें बर्फाचे जाड जाड थर पसरलेले होते आणि शिशिराचें सुरेल संगीत गात गार गार वारा त्या बर्फावर रेंगाळत होता. कडाक्याच्या थंडीमुळें घरांच्या खिडक्या बंदच होत्या. शेगडींतील विस्तवाच्या धूम्ररेखा मात्र मधूनच तरळतांना दिसत होत्या.

बर्फाची भुरभुर बंद होती. निरभ्र आकाशांत चिमुकली चंन्द्रकोरही झळकत होती. चन्द्राच्या फिकट प्रकाशामुळें रात्र काळोखी असूनही पुष्कळच उजळ दिसत होती. तरी पण ब्लॅकआऊटमुळें गांवावरली अंधारी अवकळा कायमच होती. आणि कर्फ्यू ऑर्डरमुळें रस्तेही अगदीं शांत, निवांत, निर्जनच होते. गस्तवाल्या सैनिकांचे गट मात्र आपली कामगिरी बजावीत वेगवेगळ्या भागांतून हिंडत होते. खाणीवरले पहारेकरी सैनिक आवाज ऐकण्याचीं यंत्रें कानांना लावून एकसारखी आकाशाची टेहळणी करीत होते. कारण आजच्यासारख्या निरभ्र रात्रीचें हवामान बॉम्बहल्ल्याला विशेष अनुकूल असतें, हें त्यांना ठाऊक होतें.

गांवाच्या खालच्या टोंकाला कामगारांच्या वस्तींत एक कुत्रें मोठमोठ्यांदा भुंकत होतें. थंडीचा भयंकर कडाका आणि आपला भयाण एकलेपणा ह्याबद्दल तें जोरजोरानें तक्रार करीत होतें कीं आकाशाकडे तोंड करून पृथ्वीतलावरची एकंदर हालहवाल आपल्या भाषेंत परमेश्वराला कळवीत होतें, कुणास ठाऊक ! आवाजांत योग्य चढउतार करून उंच मोकळ्या गळ्यानें

खणखणीतपणें रोजचें रडगाणें गाण्यांत त्याचा विलक्षण हातखंडा होता, एवढें मात्र खरें !

गस्तवाल्या सैनिकांपैकीं एकजण म्हणाला, “ हें शिंचं कुत्रं दिवसेंदिवस जास्त जास्तच ओरडून त्रास द्यायला लागलंय्. माझ्याच गोळीला तें केव्हां तरी खास बळी पडणार ! ”

“ छे–छे ! ठार करूं नको त्याला. ” दुसरा शिपाई म्हणाला, “ भुंकूं दे बिचाऱ्याला. मला तर त्याचं हें भुंकणं फार गोड लागतंय् कानाला. माझ्या-जवळ एक पिवळं कुत्रं होतं. तें येटं घसा खरवडून दिवसरात्र ओरडत राहायचं. पण मला कधीं त्याचा त्रास वाटायचा नाहीं. ”

“ पण मग पुढें काय झालं त्याचं ? ”

“ दुसरं काय व्हायचं ? गांवांतल्या इतर कुत्र्यांप्रमाणेंच अधिकाऱ्यांनीं एक दिवस त्याचीही वाट लावून टाकली ! ”

“ माणसांना अन्न पुरावं म्हणूनच त्यांनीं सगळ्या कुत्र्यांना ठार मारलं ! ”

“ तें ठीक केलं. आमचे अधिकारी आहेतच तसे सुपीक डोक्याचे. पण मला गंमत वाटते कीं, इथल्या लोकांजवळ आमच्याइतकाही अन्नधान्याचा सांठा नाहीं. तरी पण त्यांनीं कुत्रीं पाळलींच आहेत. आतां आपल्या धन्या-प्रमाणेंच तींही रोड, हडकुळीं आहेत, ही गोष्ट निराळी ... ”

“ इथले लोक गाढव आहेत आणि म्हणूनच ते आमच्याकडून झटपट जिंकले गेले. आमच्याप्रमाणें ह्यांचेही मेंदु जर तल्लख असते तर त्यांनाही योजना आखतां आल्या असत्या ... ”

“ पण लढाई संपल्यावर तरी आपणांला कुत्रीं पाळायला मिळतील का रे ? ’ तिसऱ्यानें मध्येंच विचारलें.

“ अमेरिकेंतून निरनिराळ्या जातींचीं झकास कुत्रीं आणून त्यांची पैदास मोठ्या प्रमाणांत करतां येईल ... ”

“ पण अमेरिकेंत कसलीं कुत्रीं आहेत, कोण जाणे ! ”

" तिथल्या एकंदर गोष्टींप्रमाणेंच चक्कर छाप असतील ... "

" पण हा कुत्रीं पाळण्याचा घाणेरडा षोक हवाच कशाला ? "

" नाहीं म्हणायला पोलीसखात्याला मात्र शिकारी कुत्र्यांचा थोडा फार उपयोग होऊं शकतो. पण ... "

" आपल्या डिक्टेटरला तर म्हणे विलक्षण चीड आहे कुत्र्यांची. कुत्रं पाहिलं कीं त्याचं पित्तंच खवळतं, असं मीं ऐकलंय् ... "

" लोक वाटेल तें उठवतात आणि त्यावर तुझ्यासारखे बावळे विश्वास ठेवतात."

पण इतक्यांत विमानांची घरघर ऐकूं येऊं लागल्यामुळें एकदम आपलें बोलणें थांबवून ते सारे गस्तवाले चपापून जागच्याजागीं थबकले.

कॉर्पोरल म्हणाला, " दोन आठवड्यांनंतर हे पुन्हा आज उगवले ... "

" बरोब्बर बारा दिवसांनंतर ! " एका शिपायानें त्याची चूक दुरुस्त केली.

खाणीवरल्या पहारेकऱ्यांनींही विमानांची घरघर ऐकली.

" फार उंचावरून उडताहेत ... " सार्जंट म्हणाला.

" फारच उंच ... मला वाटतं, वीस हजार फुटांवर असतील ... नुसतीं वरून जात असतील ... " वर पाहात लॉफ्ट म्हणाला.

" पण फार दिसत नाहींत. फक्त दोन-तीनच ... बॅटरीला हुकूम देऊं ? ... " सार्जंट म्हणाला.

" नको–फक्त त्यांना तयार राहाण्याचा इशारा दे ... आणि कर्नलना बोलावून आण ... पण नकोच. कांहीं जरुरी नाहीं. अजून तीं विमानं फार उंचावर आहेत आणि त्यांनीं अजून 'डाइव्ह' ला ... खालीं झेप घ्यायलाही सुरुवात केलेली नाहीं ... कदाचित् तीं इथें येणारही नाहींत ... "

" मला वाटतं, तीं गोल गिरक्या घेत असावींत ... "

मधमाश्यांच्या घुमावाप्रमाणेंच विमानांचा होणारा तो घुम् आवाज लोकांनीं बिछान्यांत पडल्या पडल्याच ऐकला. त्यांनीं जास्तच पांघरूण लपेटून घेतलें

आणि आवाजाकडे कान लावले. मेयरच्या वाड्यांत झोपलेले कर्नल लान्सर विमानांच्या घरघरीनें जागे झाले आणि सताड नजरेनें वर छताकडे पाहात राहिले. आवाज ऐकण्यासाठीं त्यांनीं क्षणमात्र श्वास रोखून धरला, पण त्यांची छाती एवढ्या जोरानें धडधडूं लागली कीं त्यांना ती विमानांची घरघर ऐकूंच येईना. मेयर ऑर्डेन गाढ झोपेंत होते. त्यांना तो आवाज स्वप्नांतच ऐकला असें वाटून ते फक्त ह्या कुशीवरून त्या कुशीवर वळले आणि पूर्ववत् गाढ झोंपी गेले.

आकाशांत अतिशय उंचावर चिखलाच्या रंगाचीं दोन बॉम्बफेकीं विमानें गोल गिरक्या घेत घेत वाढत्या वेगानें वर वर जाऊं लागलीं ...

...आणि मग प्रत्येक विमानांतून शेंकडों लहान लहान वस्तूंचा खालीं वर्षाव होऊं लागला. विमानांतून सुटल्यावर थोड्याच वेळांत प्रत्येक वस्तू-भोवतींची निळया रंगाची छोटीशी छत्री हलकेच उघडली गेली आणि त्या साऱ्या वस्तू हवेवर तरंगूं लागल्या.

आपली कामगिरी बजावून तीं विमानें लगेच आलेल्या दिशेनें परत निघून गेलीं. त्यांनीं टाकलेल्या वस्तू म्हणजे दहा इंची डायनामीटचीं नळकांडीं होतीं.

छोट्या छोट्या निळया छत्र्या सांवरीच्या कापसाप्रमाणें तरंगत तरंगत वाऱ्यानें पांगल्या आणि शेतांत बीं पेरावें त्याप्रमाणें जमिनीवर सर्वत्र पेरल्या गेल्या. त्या इतक्या सावकाश खालीं तरंगत येऊन जमिनीवर अलगद टेकल्या, कीं तीं नळकांडीं जागजागीं उभी करून ठेवल्याप्रमाणें दिसूं लागलीं. त्यांच्या भोवतींच्या छत्र्या आपोआपच पुन्हा पूर्ववत् गुंडाळल्या गेल्या. जंगलांत, शेतांत, टेकडीवर, घरांवर, अंगणांत, झाडाझुडपांवर जिकडे तिकडे बर्फांत रुतून बसलेलीं डायनामीटचीं नळकांडींच ! एक नळकांडें तर सेंट अलबर्ट मिशनऱ्याच्या पुतळयाच्या डोक्यावर अवतीर्ण होऊन त्याच्या बर्फाच्या मुकुटांत ताठ उभें राहिलें आणि दुसरें रस्त्याच्या मधोमध गस्तवाल्यांच्या समोर एका शिपायाच्या पायाशींच येऊन पडलें ! एकादा टाइम–बॉम्ब असेल अशा समजुतीनें सर्व शिपाई घाबरून दूर पळाले. पण मग कॉर्पोरलनें धीर करून

जवळ जाऊन टॉर्चच्या प्रकाशात पाहिलें, तों हातरुमालाएवढें एक निळ्या रंगाचें पॅराशूट त्या नळकांडीभोवतीं आस्ते आस्ते गुंडाळलें जात होतें.

सकाळीं उजाडतांच आपापल्या नित्याच्या व्यवसायासाठीं घराबाहेर पडलेल्या लोकांचें लक्ष जागजागीं बर्फावर पडलेल्या त्या निळ्या छत्र्यांकडे चटकन् वेधलें गेलें. त्यांनीं तीं नळकांडीं जवळ जाऊन उचललीं, त्यांच्याभोवतीं गुंडाळलेल्या कागदावरचा छापील मजकूर वाचला, घाईघाईनें तीं खिशांत कोंबलीं आणि मग पुढें गुप्तस्थळीं तीं दडवून ठेविलीं.

त्या नळकांडींभोवतीं चॉकोलेट गुंडाळलेलें आहे असें कळतांच गांवांतल्या पोरांनीं त्या नळकांड्यांच्या शोधार्थ रानोमाळ भटकून उरले सुरले डायनामीटस् हुडकून काढले, चॉकोलेट खाऊन टाकलें आणि नळकांडीं मात्र काळजीपूर्वक जपून आणून आपल्या आईवडिलांच्या हवालीं केलीं. पण मुलांनीं आणलेलीं तीं डायनामीटसचीं नळकांडीं पाहातांच कांहीं पालकांची भीतीनें गाळणच उडाली. त्यांनीं तीं तत्काळ शत्रु–सैनिकांना नेऊन दिलीं. पण असल्या भ्याड लोकांची संख्या सुदैवानें फारच कमी होती. शत्रूनेंही त्या नळकांड्यांचा चहूंकडे कसून तपास चालविला. पण त्याला त्या कामांत मुलांच्या इतकेंही यश आलें नाहीं. एकही नळकांडें सापडलें नाहीं.

कर्नलसाहेबांच्या सपरिवार वास्तव्यामुळें मेयरसाहेबांच्या वाड्याला एकाद्या लष्करी छावणीचीच कळा आलेली होती आणि त्यांतल्या मुख्य दिवाणखान्याला तर व्यापारी कचेरीचेंच स्वरूप प्राप्त झालें होतें. ॲलेक्स मॉर्डेनच्या खटल्याच्या दिवशीं आणून ठेवलेलें मोठें डायनिंग टेबल अजूनपर्यंत तसेंच तिथें असून कागदपत्रांच्या बऱ्याचशा फायली त्यावर पडलेल्या दिसत होत्या. फळीवरच्या घड्याळांत नवाचे टोले पडले. सकाळपासूनच ढग येऊं लागल्यामुळें आजही सूर्यदर्शन नव्हतेंच.

ॲनी मेयरसाहेबांच्या खोलींतून येऊन टेबलावरच्या कागदपत्रांकडे पाहात राहिली. तोंच कॅप्टन लॉफ्ट आला आणि ॲनीला पाहून दारांतच थबकून ओरडला, " काय करतेस इथें ? "

“ कांहीं नाहीं साहेब ! टेबल साफ करायला आलेंय् मी ...” किंचित् चपापून ॲनी चिडून म्हणाली.

“ कांहीं नको टेबल साफ करायला. चालती हो इथून ...”

“ पण दिवाणखानाही झाडायचा आहे ...”

“ जा म्हणतों ना तुला ?” — ॲनी मुकाट्यानें निघून गेली.

कॅप्टन लॉफ्टनें टेबलाजवळच्या खुर्चीवर बसत फर्मावलें, “ आण तें इकडे ... ठेव इथें ... आणि कर्नलसाहेबांना बोलाव. म्हणावं, मी इथें आलोंय् ...”

खांद्याला रायफल अडकाविलेल्या एका शिपायानें बरीचशीं निळीं पुडकीं लॉफ्टच्या पुढ्यांत टेबलावर आणून ठेवलीं आणि कर्नलसाहेबांना बोलवायाला तो निघाला. तोंच मेजर हंटरशीं बोलत बोलत कर्नलसाहेबच तेथें आले. मेजर हंटरच्या हातांत कसला तरी एक पिवळा चौकोनी कागद होता.

“ गुड मॉर्निंग कॅप्टन !” असें म्हणून कर्नलनीं त्या पुडक्यांवर नजर टाकीत हंटरला विचारलें, “ हें तुम्ही पाहिलंत का ?”

“ हो, पाहिलंय् कीं ...” आपल्या हातांतल्या कागदावरून नजर न काढतांच हंटरनें उत्तर दिलें.

“ अहो, नुसतं पाहून काय होणार ? तपासून पाहिलंत का ?”

“ मला सवडच कुठें आहे तपासून पाहायला ? ... आज पुन्हां तीन ठिकाणचे रूळ उखडून टाकले गेलेत ! आणि तेही सगळे दहा मैलांच्या टापूंतले ! हें पाहा ! ...” हातांतला पिवळा कागद कर्नलना दाखवीत हंटर म्हणाला.

“ तें राहूं दे तूर्त. ही वस्तु आधीं तपासून पाहा तुम्ही ...” असें म्हणून कर्नलनीं एक निळें पुडकें उचलून तें हंटरच्या हातीं दिलें.

हंटरनें त्या पॅकेटकडे थोडा वेळ निरखून पाहिलें आणि मग त्यावरचें वेष्टण दूर करून आंतली ट्यूब चाकूनें कापली, तिचा वास घेतला आणि थंडपणानें

म्हटलें, "कर्नल, हा तर सगळा गाढवपणा आहे! एक छोटासा स्वस्त बाजारी डायनामीट आहे हा! ह्यांत नायट्रो-ग्लिसरीन किती टक्के आहे हें मात्र मला तपासल्याशिवाय सांगतां येणार नाहीं." नंतर नळीचें टोक पाहात तो म्हणाला, "ह्याला रेग्युलर डायनामीट कॅप आहे ... फल्मिनेट ऑफ मर्क्युरी आहे ... फ्यूज वगैरे सारं कांहीं व्यवस्थित आहे ... फ्यूज एक मिनिट अवधीची दिसते ... अगदींच मामुली कारभार ..." हंटरनें नळी टेबलावर फेंकून दिली. कर्नलनें लॉफ्टला विचारलें, "असे किती डायनामाइटस् टाकले गेले असतील?"

"कांहींच कल्पना नाहीं ... पण पुष्कळच टाकलेले असावेत ... आम्हांला हे पन्नास मिळाले पण पॅराशूटस् मात्र नव्वद सापडले. मला वाटतं, लोक आंतल्या ट्यूब्स् काढून घेऊन पॅराशूटस् हवेंत सोडून देतात गंमतीनें ..."

हंटर नळीवरचें तांब्याचें टोपण न्याहाळून पाहात होता. कर्नल त्याला म्हणाले, "पण हंटर, ह्याच्याभोंवतीं गुंडाळलेला कागद तुम्ही पाहिलांत का?"

"त्यांत काय आहे विशेष पाहाण्यासारखं?"

"हें बघा ना, गोड गोड चॉकोलेट आहे ..."

"ती युक्ति आहे शत्रूची! चॉकोलेटच्या आमिषामुळें हे डायनामीटस् पोरांबाळांच्यासुद्धां हातांत पडावेत!"

इतक्यांत एक शिपाई आला आणि कर्नलच्या हातांत एक चौकोनी पिवळा कागद देऊन निघून गेला. त्या कागदावरून नजर फिरवीत मोठ्यांदा हसून कर्नल म्हणाले, 'मेजर हंटर, हें घ्या जादा काम! आणखी दोन ठिकाणचे रूळ उपटून टाकलेत!"

"छाऽऽन! पण आतां पांच ठिकाणची दुरुस्ती मी कशी करूं शकणार? माझ्याजवळ पुरेसे रूळही नाहींत ..."

"जुन्या फाट्यांचे रूळ काढावे लागतील ..."

"वा! मग अगदीं नामीच होईल कीं रस्ता!" हंटर चिडक्या स्वरांत बोलला.

"नामी होऊं दे. नाहीं तर निकामी होऊं दे ... पण रस्ता तर तयार होईल !"

"पण हें असेंच कुठवर चालणार ? तात्रडतोब आळा घातलाच पाहिजे ह्या अपघातांना !" हंटर त्रासून म्हणाला.

"पण प्रथम ह्या प्रकरणाचा पक्का बंदोबस्त केला पाहिजे." डायनामीटकडे पाहात लॉफ्ट म्हणाला, "ज्याच्याजवळ हा सापडेल त्याला भयंकर कडक शासन केलं जाईल, असं फर्मान आत्तांच्या आत्तां काढलं पाहिजे ..."

"हो–हो. पण जरा दमानें घ्या. ज्यांत त्यांत तुमची अशी घिसाडघाई असते." कर्नल स्मितपूर्वक म्हणाले.

"पण अशा प्रकारांना वेळींच आळा घातला नाहीं तर इथले लोक आपणांला भ्याड, दुबळे समजतील ..."

"हो पण ही वस्तु काय आहे, हें तर प्रथम पाहिलं पाहिजे. मग त्या संबंधींची उपाययोजना ! हंटर, तुमचं खरं मत सांगा पाहूं ..."

"सांगितलं ना ? वापरायला सोपा असा हा एक साधा मिनिट-बॉम्बच आहे म्हणा ना. पण ह्याचा उपयोग कसा करायचा हें मात्र ठाऊक पाहिजे. नाहीं तर सर्व फुकट आहे."

कर्नलनीं ट्यूबभोवतीं गुंडाळलेल्या कागदावरच्या छापील मजकुराकडे बोट दाखवींत विचारलें, "पण हें वाचलंत का ?"

"वाचलं नाहीं ... नुसती नजर टाकलीय् त्यावर ..." हंटर म्हणाला.

"मी वाचलंय्, पण तुम्हीही हें एकदां ऐकावं अशी माझी इच्छा आहे ..." असें म्हणून कर्नल तो मजकूर मोठ्यांदा वाचूं लागले.

"'स्वतंत्र देशांतील लोक हो ! ही ट्यूब लपवून ठेवा. तुम्हांला कदाचित् ह्याची केव्हां तरी जरूर पडेल ... पकडले जाऊं नका ... तुमच्या दोस्तांनीं तुम्हांला हें बक्षीस पाठविलें आहे. तुमच्या देशावर स्वारी करणाऱ्या तुमच्या शत्रूला योग्य प्रसंगीं ह्याचा अहेर करा ... ह्या ट्यूबच्या साहाय्यानें फार

मोठे अपघात घडवून आणण्याचे फोल प्रयत्न करूं नका' ..." पुढें त्यांनीं त्या मजकुरावरून धावती नजर टाकायला सुरुवात केली. " '**आगगाडीचे रूळ**—रात्रीच्या वेळीं हें काम उरका ... वाहतुकींत अडथळा आणा ... दोन रूळांच्या सांध्याजवळ ही ट्यूब ठेवून ती घट्ट बांधून टाका आणि ती जागा चिखलानें किंवा बर्फानें बुजवून टाका. म्हणजे नळी त्या जागेवरून हालणार नाहीं. फ्यूज पेटविल्यानंतर साठ अंक मोजायच्या आंतच स्फोट होईल ...' '**पूल**—पूल फक्त खिळखिळे करून टाका. पार उध्वस्त करूं नका. तसेंच संदेशवाहक तारांचे खांब, सामानवाहू लष्करी मोटरी, रस्त्यावरचे बंद नाले, शत्रूचे खाद्यपदार्थांचे सांठे ... सर्वांचा तुम्ही नायनाट करूं शकाल ...' "

" कर्नलसाहेब, हें प्रकरण फार भयंकर दिसतंय् ... ह्या बाबतींत सक्त उपाय योजलेच पाहिजेत. क्षणाचीही दिरंगाई धोक्याची आहे ... पण हेडक्वार्टर्सचं काय म्हणणं आहे ? तुम्ही त्यांना ह्यासंबंधीं विचारलंत ना ? "

" होय तर. पण त्यांचं म्हणणं मी तुम्हांला आधींच—त्यांना न विचारतांच सांगूं शकलों असतों." असें म्हणून कर्नल हसले.

" पण त्यांनीं काय सांगितलं तें तर कळूं दे ..."

" अहो, दुसरं काय सांगणार ते ? ... 'चॉकोलेटमध्यें विष घाला ... प्रत्येक डायनामीटजवळ एक एक छुपा सांपळा ठेवा' ... कशा आहेत एकेक दिव्य कल्पना ! डोकीं पण डोकीं आमच्या जनरल स्टाफचीं ! जगांतले सारे लोक महामूर्ख आहेत, अशीच त्यांची समजूत दिसते. "

" पण जनरल स्टाफचं सांगणं विशेष वावगं आहे असं मला नाहीं वाटत ..." लॉफ्ट गंभीरपणानें म्हणाला.

" भले बहाद्दर ! तुम्हीही त्यांच्याच माळेतले मणी दिसतांय् ! " कर्नल लॉफ्टला म्हणाले, " अहो हें कसं तुमच्या ध्यानांत येत नाहीं, कीं चॉकोलेटमध्यें विष घालून होणार काय ? फार तर एक दोन मुलें सुरुवातीला फसून मरतील.

पण पुढें ? तसंच त्या सांपळ्यांचं ! लांब काठीनें ह्या डायनामीटच्या नळ्या लोक उकरून नेतील आणि सांपळे जाग्यावरच राहतील. इथले लोक आपणांला वाटतात तेवढे बावळट नाहींत. पक्के धूर्त, चलाख आहेत. आयुष्यांत फसलेच तर फक्त एकदाच फसतील. पुन्हा दुसऱ्यांदा फसणार नाहींत."

"माफ करा कर्नल ! पण हें तुमचं बोलणं मला तर पराभूत मनोवृत्तीचंच द्योतक दिसतंय्." लॉफ्ट म्हणाला, "कांहीं झालं तरी आपणांला ह्या अनिष्ट प्रकारांचा कायमचा बंदोबस्त केलाच पाहिजे. कारण, हे डायनामीटस् फक्त इथें ह्याच गांवांत पडले असतील असं नाहीं ..."

"आज पहिल्यांदाच आणि तेंही ह्या गांवांतच हे डायनामीटस् पडले आहेत, इतरत्र नाहींत."

"कशावरून ?"

"दोन कारणांमुळें मला असं वाटतंय्. एक तर हा गांव आपण अचानक हल्ला चढवून बळकावलाय् आणि दुसरं असं कीं, बाहेरच्या जगाशीं ह्या गांवाचं दळणवळण अद्यापि सुरक्षितपणें सुरू आहे. इथली बरीचशी तरुण मंडळी परदेशीं पळून गेली आहेत, तुम्हांला ठाऊकच आहे."

"आणि म्हणूनच मी म्हणतोंय् कीं आपणांला कांहीं तरी केलं पाहिजे." लॉफ्ट म्हणाला.

"तुम्हांला जनरल स्टाफवर घेण्याची शिफारस मात्र मला ताबडतोबच केली पाहिजे." कर्नल खोंचक स्वरांत म्हणाले, "पुढें आलेल्या पेंचप्रसंगाचं एकंदर स्वरूप काय आहे तें कळण्यापूर्वी, समजून घेण्यापूर्वीच तुम्हांला एकदम कामाला लागण्याची नेहमींच घाई सुटते ... लॉफ्ट, हल्लीं जमाना बदलला आहे. पूर्वीच्या काळीं ठीक होतं. व्याप्त प्रदेशांतील लोकांना निःशस्त्र करायचं आणि जगाशीं त्यांचा सगळा संबंध तोडून टाकायचा ! जगांत काय चाललंय् तें त्यांना कळूंच द्यायचं नाहीं. पण चालू युगांत ह्या गोष्टी शक्य नाहींत. लोकांना तुम्ही अज्ञानांत ठेवूं शकत नाहीं. आतां लोक रेडिओ ऐकतात. साऱ्या

जगाची हालहवाल त्यांना घरबसल्या कळूं शकते. बरं, त्यांना रेडिओ ऐकण्याची सक्त मनाईही करतां येणं शक्य नसतं. कारण, कित्येकदां त्यांच्या रेडिओचा थांगपत्ता लागणंही कठीण असतं. खरं ना ?"

मध्येंच पहारेकऱ्यानें मि. कोरेल भेटायला आल्याची वर्दी कर्नलना दिली. 'त्यांना थोडा वेळ बाहेरच थांबायला सांग' असें म्हणून कर्नलनीं आपलें बोलणें पुढें सुरू केलें, "शिवाय, लोकांना जगांतलीं सर्व वृत्तपत्रं वाचायला मिळतात ... त्यांच्या मदतीसाठीं आकाशांतून शस्त्रास्त्रंसुद्धा पडूं शकतात. हेंच पाहा ना ? आज मिनिट-बॉम्ब आले, उद्यां हात-बॉम्ब, परवां विष ..."

"पण अजून तर विष टाकलं गेलं नाहीं ..." लॉफ्ट घाबरून म्हणाला.

"अजून नाहीं टाकलं, पण टाकतील ! समजा, मुलांच्या खेळांतल्या-सारखे छोटे फेकायचे तीर, त्यांचीं टोकं सायनामीड विषामध्यें बुडवून विमानांतून टाकले नि ते इथल्या लोकांच्या हातीं पडले तर ? अगदीं आवाज न करतां ते तुमच्या युनिफार्ममध्यें घुसून तुमच्या कातडीला स्पर्श करतील आणि त्या विषाचा केवढा घातुक परिणाम होईल, केवढा हाहाकार उडेल ह्याची तुम्हांला कल्पना आहे ? अहो, विषप्रयोगाची नुसती अफवाच उठली तरी बस्स आहे. निर्धास्तपणें आरामशीर जेवण जेवण्याची किंवा साधं पाणी सुद्धां पिण्याची छाती होणार नाहीं आपल्या लोकांची ! आपलं धैर्य खचून जाईल कायमचं ..."

कर्नलसाहेबांचा आणि लॉफ्टचा संवाद इतका वेळ मुकाट्यानें ऐकत बसलेल्या मेजर हंटरनें आतां मात्र तोंड उघडलें, "कर्नलसाहेब, तुम्ही सध्या शत्रूच्या प्रतिचढाईचा इतिहास लिहिताय् वाटतं ?"

मेजर हंटरच्या प्रश्नांतली खोच लक्षांत येऊन कर्नल किंचित् हसून म्हणाले, "छे हो ! मी आपला संभवनीय गोष्टी बोलताय्."

"पण असल्या गोष्टी बोलत बसण्याची ही वेळ नव्हे." अधीर वृत्तीनें लॉफ्ट म्हणाला, "आपणांला हे डायनामीटस् ताबडतोब शोधून काढले

पाहिजेत. इथल्या लोकांनीं संघटित प्रतिकाराची एकादी प्रभावी योजना आंखली असेल तर तिचंही तत्काळ निर्मूलन करून टाकलं पाहिजे."

"अर्थात्! हें कठोर कर्तव्य आपणांला केलंच पाहिजे. तुम्ही नि लेफ्टनंट प्रॅकल आतां त्याच उद्योगाला लागा. ह्यावेळीं आणखी कांहीं ज्युनिअर ऑफिसर्स असते तर फार बरं झालं असतं. टॅांडरच्या खुनामुळें मोठं नुकसान झालं आपलं. त्या बाईच्या फंदांत पडण्याची दुर्बुद्धि त्याला कुठून आठवली कुणास ठाऊक!"

"पण लेफ्टनंट प्रॅकलचंही लक्षण मला ठीक दिसत नाहीं."

"कां? काय करतात ते?"

"करीत नाहींत कांहीं. पण नेहमीं खिन्न, उदास राहून विक्षिप्तासारखेच वागतात ..."

"ते कसे वागत असतील त्याची कल्पना आहे मला. ह्या विषयावर मी कितीदां तरी वरिष्ठांजवळ बोललोंय्... आणि तसें बोललों नसतों तर कदाचित् आज मेजर जनरल झालों असतों मी ... खरं म्हणजे ह्या लोकांचा त्यांत फारसा दोष नाहीं. आमचंच मुळांत चुकलेलं आहे. 'जगांतल्या सर्व तरुणांपेक्षां तुम्ही शूर, बुद्धिमान् आहांत' असंच आम्ही आमच्या लोकांना आजवर सांगत आलों आहोंत. पण तें सपशेल खोटं असून जगांत आपल्यापेक्षांही जास्त शूर नि हुषार लोक आहेत, असं जेव्हां त्यांच्या प्रत्ययास येतं तेव्हां साहाजिकच त्यांच्या मनाला जबरदस्त धक्का बसतो. विजय मिळवल्यानंतर कसं वागावं ह्याचं शिक्षण आम्हीं आमच्या लोकांना दिलंय् आणि विजयाच्या वेळीं ते उत्तम वागतात, हें मलाही मान्य आहे; पण पराभवानंतर कसं वागायला हवं तें कुठें त्यांना ठाऊक आहे?"

"पराभव?" किंचित् कठोर स्वरांत लॉफ्ट म्हणाला, "पण आमचा पराभव तर कुठेंच झालेला नाहीं." कर्नलनीं थंडपणानें लॉफ्टकडे नजरेला नजर भिडवून फक्त रोखून पाहिलें. लॉफ्टनेंही तसेंच त्यांच्याकडे पाहिलें. पण शेवटीं त्याची नजर चळली जाऊन तो म्हणाला, "सर! ..."

“ थँक्यू ! ”

“ पण अपमानाच्या जाणिवेनें दुसऱ्या कुणाकडून तुम्ही अशी माफीची अपेक्षा कां करीत नाहीं कधीं ? ”

“ आपण वरिष्ठांचा अपमान केला हें ज्याच्या ध्यानांतच येत नाहीं त्याला काय दोष द्यायचा ? तो अपमान कसला नि त्याबद्दल क्षमा तरी कसली ? पण जाणूनबुजून एकाद्यानें अपमानकारक वर्तन केलं म्हणजे ... पण जाऊं दे हा विषय ... तुम्ही आतां तुमच्या उद्योगाला लागा. प्रॅकलना नीट सांभाळून घ्या ... झडल्यांचं सत्र सुरू करा ... पण हें पाहा, एक गोष्ट लक्षांत ठेवा ... लोकांनीं उघड उघड कांहीं अत्याचार केल्याखेरीज त्यांना गोळ्या घालीत सुटूं नका ... ”

“ यस् सर ! ” असें म्हणत औपचारिक अभिवादन करून लॉफ्ट निघून गेला.

हंटर कर्नलना म्हणाला, “ आज त्या बिचाऱ्या लॉफ्टवर बराच गहजब उडवलांत ! ”

“ मग काय करणार ? त्याच्या स्वभावाची जात मी ओळखली आहे. इथल्या एकंदर परिस्थितीमुळें ते गेलेत घाबरून. अशा वेळीं झणझणीत शब्दांचा कडवट डोस देण्याखेरीज त्यांचं बावचळलेलं मन थाऱ्यावर आणायला दुसरा मार्गच नाहीं. घायकुती स्वभावाचा, आततायी, हट्टी, हडेल-हप्पी माणूस तो ! उतावळ्या अविचारानें स्वतःवर एकाद्य वेळीं प्राणसंकट ओढवून घ्यायचा. एकाद्याचा जसा सहानुभूतीवर, सौजन्यावर विशेष विश्वास असतो तसा त्यांचा लष्करी सांप्रदायाच्या प्रतिष्ठेवर नि करड्या शिस्तीवर भयंकर भरंवसा आहे. पण ... पण तें जाऊं दे. तुम्ही आतां रेल्वे लाईनच्या दुरुस्तीच्या कामाला लागा. तुमच्या मागचा हा दुरुस्तीचा त्रास आतां ह्यापुढें जास्तच वाढत जाणार. मोठमोठे अपघात होणार ... आणि मला वाटतं, आज रात्रींच पुन्हां ... ”

" खरं आहे. पण ह्या प्रकरणीं राजधानीकडून कांहीं हुकूम आले आहेत का ? "

" हो. पण मी न सांगतांही तुम्ही त्या हुकुमांचं स्वरूप सहज ओळखूं शकाल. ' चळवळ्या लोकांना पकडून गोळ्या घाला, पुढाऱ्यांना ओलीस ठेवा ! ' ... पण इकडे गांवांतल्या लोकांच्या मनांत आमच्याविषयींचा द्वेष नि संताप एकसारखा कसा भडकत चालला आहे हें आमचं आम्हांला माहीत ! सुप्त ज्वालामुखीचा स्फोट केव्हां होईल त्याचा नेम नाहीं ... "

" पण नजरकैदेंत ठेवलेल्या लोकांच्या यादीपैकीं कुणाला देहान्त शासन देण्यांत आलं आहे का ? " मेयरसाहेबांच्या बेडरूमच्या बाजूला पाहून हंटरनें विचारलें.

नकारार्थी मान हालवून कर्नल म्हणाले, " अजून तरी नाहीं. "

" कामाच्या दगदगीनें तुम्ही अगदीं त्रासून गेलेले दिसतांय् कर्नलसाहेब ! "

" कामाच्या दगदगीपेक्षां ह्या आमच्या लोकांच्या भगभगीलाच मी जास्त कंटाळलोंय् ... "

" मग मी तुमच्याबद्दल तसा रिपोर्ट करूं का हेडक्वार्टर्सकडे ? "

मेजर हंटरच्या ह्या प्रश्नाचा रोख कर्नलनीं ओळखलासें दिसलें. क्षणभर त्यांनी आपले डोळे हातांनीं झांकले. आणि मग एकदम त्यांची मुद्रा उग्र दिसूं लागली. छाती फुगवीत ताठ मानेनें करड्या आवाजांत ते म्हणाले, " मेजर हंटर ! मी लष्करी अधिकारी आहें. साधा सिव्हिलियन् नव्हे ...सध्यां आधींच आपल्याजवळ अधिकाऱ्यांचा तुटवडा आहे. तुम्हांला ठाऊक आहे. चला, मुकाट्यानें आपल्या कामाला लागा ... "

हंटर हसत हसत उठून चालायला लागला. कर्नलनीं त्याला कोरेलना आंत घाडून द्यायला सांगितलें, पण दरवाजा उघडतांच हंटरला लेफ्टनंट प्रॅकल दारांत उभा असलेला दिसला. त्यानें तेथूनच कर्नलना सांगितलें, " हे प्रॅकल तुम्हांला भेटायला आले आहेत. "

"येऊं दे त्यांना आंत." कर्नलसाहेबांची परवानगी मिळतांच ब्रॅकल आंत आला आणि खालीं मान घालून खिन्न मुद्रेनें त्यांच्यासमोर उभा राहिला. कर्नलनीं 'बसा' म्हटल्यावर टेबलावर कोपरें टेकून मरगळल्यासारखाच तो एका खुर्चीवर बसत म्हणाला, "साहेब तुमच्याशीं मला थोडं बोलायचं आहे."

पण कर्नलनीं लगेच हसून म्हटलें, "तुम्ही काय बोलणार मला ठाऊक आहे."

"गांवांतले लोक आमच्याविषयीं फारच अढी धरून बसलेत मनांत..."

"तेंच–तेंच. समजलं सारं. म्हणजे गांवांतली एकादी पोरगी तुमच्या मनांत भरली आहे. पण ती तुम्हांला जवळ येऊं देत नाहीं, तुमचा द्वेष करते असंच ना?" कर्नलनीं विचारलें. ब्रॅकल थक्कच झाला. कर्नल पुढें म्हणाले, "अहो, ह्यांत एवढं नवल कसलं वाटलं तुम्हांला? ही गोष्ट ओळखणं कांहीं कठीण नाहीं. तुमच्यासारख्या तरुण मंडळींचं, विशेषतः तरुण सैनिकांचं हें उघड गुपित आहे. सैन्यासाठीं जवानमर्दांची जरूर असते आणि जवानमर्दांना जवान पोरींची जरूर असते. तुम्ही गांठलेली पोरगी तुम्हांला वश होत नाहीं वाटतं?"

"जराशी नाराजच दिसते ती..."

"म्हणून तुम्ही असे हताश, निरुत्साही झालांत वाटतं?"

"इथें करमेनासंच झालंय् मला..."

"मग काय? घरीं परत जायचं आहे तुम्हांला? पण तुम्ही गेल्यावर इथें आमची किती कुचंबणा होईल बरं? अशाच एका बाईच्या लफड्यांत सापडून लेफ्टनंट टॉंडर आमच्यांतून कायमचे निघून गेले आणि आतां तुम्ही सुद्धा–"

"नाहीं! साहेब, घरीं जाणार नाहीं मी!" ब्रॅकल एकदम म्हणाले.

"गुड्! तसे तुम्ही विचारी, समंजस आहांतच. आतां मी तुम्हांला एक सांगतों. तुम्हांला तें पटेलही. तुम्ही सैनिक आहांत! सर्वसामान्य माणसांहून निराळे आहांत. सैनिकाच्या जीवनांत ख्यालीखुशालीला, मौजमजेला मुळींच स्थान नाहीं. ऐषआरामाला तर राहोच, पण प्रत्यक्ष प्राणालाही फारसं महत्त्व

नाहीं. साऱ्या वासना मारून, सारे मोह दूर सारून स्वतःच्या पंचप्राणांवर तिलांजली सोडायला सैनिकानें सदैव सिद्ध असलं पाहिजे. शिस्त सांभाळणं आणि वरिष्ठांचे हुकूम पाळणं एवढंच सैनिकाचं मुख्य कर्तव्य ! वरिष्ठांचे हुकूम कदाचित् चुकीचे, मनाला न पटणारेही असू शकतील. पण तो विचार सैनिकानें करायचा नसतो. फक्त हुकूम पाळायचे. सैनिकाच्या जीवनाचा मार्ग गुलाबाच्या सुगंधी ताटव्यांतून नव्हे तर नेहमीं खाचखळग्यांतून, काट्याकुट्यांतूनच गेलेला असतो. वास्तविक ह्या कटु सत्याची पूर्ण कल्पना आमच्या वरिष्ठांनीं तुम्हां लोकांना प्रारंभींच करून द्यायला हवी होती. पण तसें न करतां, उलट भलभलत्या अवास्तव विकृत कल्पना मात्र त्यांनीं तुमच्या डोक्यांत कोंबल्या आणि म्हणूनच लष्करी जीवन म्हणजे केवळ चैन–चंगळ, आराम–विराम अशीच तुमची अनिष्ट भ्रामक समजूत होऊन बसली आहे. पण एवींतेवीं हा पेशा तुम्ही आतां पत्करला आहे खरा. प्रत्यक्ष येणाऱ्या भल्याबुऱ्या अनुभवांनीं शहाणे व्हा आणि डोकं नीट ठिकाणावर ठेवून वागा ... तुमचं मन तुम्हींच सावरलं पाहिजे. आम्हांला तुमच्या मनावर नियंत्रण घालतां येणं शक्य नाहीं. ”

“ थँक्यू सर ! ” असें म्हणत प्रॅकल खुर्चीवरून उठला.

“ आणि तसंच त्या तुमच्या प्रेयसीबद्दल ... ” कर्नल म्हणाले, “ तुम्ही त्या पोरीला प्रेमानें वश करा किंवा तिच्यावर बलात्कार करा ! तिला तुमची तात्पुरती रखेली म्हणून ठेवा किंवा तिच्याशीं कायमचं लग्न लावा. काय हवं तें करा. आम्ही त्या बाबतींत पंचाईत करणार नाहीं. तुम्हालाही कांहीं विचारणार नाहीं ... पण प्रसंग पडल्यास वरिष्ठांचा हुकुम होतांच तिला तत्काळ तिथल्या तिथें गोळी झाडून ठार मारायला मात्र तुमची तयारी असली पाहिजे. ”

“ यस् सर ! थँक्यू सर ! ”

“ ठीक आहे. जा तुम्ही आतां. पण पुन्हा बजावतों, मीं सांगितलेलं विसरूं नका ... आणि हें पाहा, ते कोरेल अजून बाहेर उभे असले तर त्यांना

इकडे आंत धाडून द्या ..." प्रॅकल दार उघडून बाहेर जाईपर्यंत कर्नल-साहेबांची नजर त्याच्यावर खिळलेली होती.

प्रॅकल निघून गेल्यानंतर मि. कोरेल आंत आले. पण ते आतां पूर्वीचे ऐटबाज, बेफिकीर, आनंदी, हसतमुख कोरेल दिसत नव्हते. काळजीनें काळवंडलेला कष्टी चेहेरा, खोल गेलेले निस्तेज डोळे, खप्पड गाल, मळके कपडे असा त्यांचा कळकट अवतार होता. प्लॅस्टरच्या बॅंडेजवरून त्यांचा डावा हातही मोडलेला दिसत होता.

"गुड् मॉर्निंग कर्नलसाहेब!" दिवाणखान्यांत पाऊल टाकतांच कोरेल म्हणाले, "ह्यापूर्वीच मी तुमच्याकडे येणार होतों. पण तुमचं आमच्याकडे अजिबात लक्ष नाहीं ... म्हणून म्हटलं जावं न जावं ..." बोलत बोलतच कर्नलनीं बसा म्हणायची वाट न पाहातां कोरेलनीं एक खुर्ची अडविली.

"पण तुम्ही तुमच्या रिपोर्टच्या उत्तराची वाट पाहात होतां ना?" कर्नलनीं विचारलें.

"फक्त रिपोर्टच्या उत्तराची नव्हे ... आणखीही बऱ्याच गोष्टींच्या खुलाशाची मी वाट बघत होतों ... तुम्ही मला अधिकाराची जागा देण्याचं साफ नाकारलंत ... कवडीमोलाचा म्हणून माझी प्रत्यक्ष तोंडावर संभावना केलीत ... पण तुम्ही हें विसरलांत कीं, तुमच्या आधींपासून मी ह्या गांवांत ठाण मांडून बसलों आहें ... तुमच्या इथल्या यशस्वी मोहिमेचं सगळं श्रेय मलाच आहे ... मी नको नको म्हणत असतांनाही तुम्ही ऑर्डेनना मेयर-पदावर ठेवलंत ..."

"पण मीं तसं केलं नसतं तर गांवांत सध्यांपेक्षांही जास्त गोंधळ माजला असता."

"हा मतभेदाचा प्रश्न आहे." कोरेल म्हणाले, "मी तुम्हांला इतकंच सांगतों कीं हे मेयर ऑर्डेनच गांवांतल्या बंडखोर लोकांचे पुढारी आहेत."

"नॉन्सेन्स! ते तर एक साधेसिधे सज्जन गृहस्थ आहेत."

कर्नलनीं असें म्हणतांच कोरेलनीं लगेच आपल्या खिशांतून एक काळें नोटबुक काढून म्हटलें, " हा पाहा, त्यांच्या सज्जनपणाचा पुरावा ! मी खडा न् खडा माहिती मिळविली आहे. "

" ती कशी ? "

" अहो, कशी म्हणजे ? सांगितलं ना ? . . . मी इथला फार दिवसांचा रहिवासी आहें. तुमच्यासारखा काल-परवां आलों नाहीं. मला गांवांतली रोजची बित्तंबातमी पुरविणारीं माझीं माणसं आहेत इथें . . . लोकांनीं आत्तांपर्यंत केलेल्या प्रत्येक अत्याचाराशीं मेयर ऑर्डेनचा प्रत्यक्ष संबंध आहे. लेफ्टनंट टॅाडरचा खून झालेल्या घरांत, म्हणजे मॉली मॉर्डेनच्या घरांत त्या रात्रीं खुनाच्या वेळीं मेयर ऑर्डेन समक्ष हजर होते ! पुढें बोला . . . इतकंच काय, पण खून करून मॉली आपल्या घरांतून पळून गेली तीदेखील मेयर ऑर्डेनच्याच एका नातेवाईकाकडे ! मी त्या नातेवाईकाकडे तिचा तपास केला पण तेथूनही ती कुठें फरारी झाली आहे. अर्थात् मेयरच्याच मदतीनें ! तसं म्हटलं तर, आत्तांपर्यंत गांवांतून पळून गेलेल्या सर्वच लोकांना मेयरनीं मदत केलेली आहे . . . जास्त काय सांगूं ? हा माझा हात मोडलाय् ना ? पण ह्याही प्रकरणाच्या मुळाशीं मेयरांचाच हात आहे ! "

" खरंच ? कसं काय, काय झालं ? " कर्नलसाहेबांचें कुतुहल जागें झालें.

" अहो, तुमच्या लेफ्टनंट टॅाडरचा खून पडला त्याच रात्रींची गोष्ट. मी एक-दीडच्या सुमारास घरीं निघालों होतों तोंच कुणीतरी पाठीमागून माझ्यावर एकदम झडप घातली आणि माझ्या मुसक्या बांधल्या. साहजिकच मी ओरडलों . . . आणि तितक्यांतच गस्तवाल्यांची चाहूल लागल्यानें मला तसंच तिथें रस्त्यांत टाकून देऊन कुणी तरी दोघेजण समुद्राच्या बाजूला पळून गेले . . . माझ्याच होडींतून ते परदेशीं पसार झाल्याचं मला दुसऱ्या दिवशीं कळलं . . . गस्तवाले वेळेवर आले म्हणूनच माझे प्राण वांचले . . . नुसत्या ह्या हातावरच भागलं . . . नाहींतर समुद्रांत बुडवून मला जिवंत जलसमाधि देण्याचाच बेत होता . . . आणि हें सगळं कारस्थान मेयर ऑर्डेनचंच !

शकाच नाहीं ... काल रात्रीं इथें विमानांतून डायनामाइटस्, छोटे छोटे सुरुंग टाकण्यांत आले ना ? त्या घटनेशीं सुद्धां मेयरसाहेबांचाच संबंध असावा असा मला दाट संशय आहे ..."

" पण ह्या सगळ्या गोष्टी तुम्ही सिद्ध करूं शकतां का ? "

" नाहीं ! प्रत्यक्ष पुराव्याच्या अभावीं तें शक्यच नाहीं. पण मेयर ऑर्डेन इथल्या बंडखोर लोकांचे पुढारी आहेत, ही गोष्ट मात्र नक्की ! "

" मग ह्या बाबतींत तुम्ही कोणता उपाय सुचवितां ? "

" आपल्याला फारच कडक उपाय योजिले पाहिजेत. "

" पण ते कोणते ? "

" लोकांच्या चांगल्या वागणुकीबद्दल मेयर ऑर्डेनकडून तुम्ही लेखी जामीन घेतला पाहिजे. "

" म्हणजे ? "

" आजपासून – ह्या घटकेपासून गांवांत कुठें दंगाधोपा, आघात-अपघात झाला, फार कशाला, डायनामाइटच्या एका ट्यूबचा फ्यूज जरी कुणी पेटवला तरी त्याबद्दल मेयरना जबाबदार धरून तुम्ही त्यांना तत्काळ देहान्त शासनाची शिक्षा द्या ! " असें म्हणून कोरेलनीं खिशांतून एक लखोटा काढला आणि तो कर्नलसाहेबांच्यापुढें फेकून म्हटलें, " तुम्हांला वाटेल, मी कांहीं तरी बेजबाबदारपणानें बडबडतोंय् पण हें पाहा, माझ्या रिपोर्टाचं खुलासेवार उत्तर राजधानीकडून आलं आहे ... मलाही विशिष्ट अधिकार देण्यांत आलेले आहेत ... नीट वाचून पाहा ... "

कर्नलसाहेबांनीं तो लखोटा वाचण्याची तसदी न घेतां फक्त कोरेलकडेच तिरस्काराचा एक तीक्ष्ण कटाक्ष फेकून म्हटलें, " भले ! म्हणजे माझ्यावर मातच केलीत म्हणायची तुम्ही ! परस्पर तिकडून हुकूम आणवलेत ... "

इतक्यांत दूर अंतरावर कोठें तरी स्फोट झाल्याचा आवाज एकदम ऐकूं आला. त्याबरोबर कोरेल पुन्हा म्हणाले, " पाहिलंत कर्नलसाहेब ! हें अस्सं

होणार ! तावडतोब तुम्ही मेयरना अटक करा ... त्यांना ओलीस ठेवून घ्या ... मग बघा, हे सारे प्रकार तावडतोब बंद पडतील ... "

" आणि तसं नाहीं झालं तर ? "

" मेयरना ठार करायचं ! "

" पण मेयरना ठार करून सुद्धां लोकांची चळवळ नाहींच थांबली तर ? "

" मग डॉक्टर विंटरना अटक करायची ! ते इथें कोणत्याही अधिकार-पदावर नसले तरी मेयरच्या खालोखाल गांवांत त्यांचंच वजन आहे. लोकांचा फारच विश्वास आहे त्यांच्यावर ... "

" पण डॉक्टर विंटरनाही गोळी घातल्यावर मग पुढें काय ? "

" मग आपलंच राज्य ! आपणच इथले पुढारी – अधिकारी ! बंडाळीचा बीमोड होणार ! गांवांतले हे दोन प्रमुख पुढारी ठार केले कीं सगळं बंड एकदम थंड ! "

" तुम्हांला खरोखरीच असं वाटतं ? "

" नुसतं वाटतं नव्हे, माझी खात्री आहे ... "

ह्यावर कर्नलनीं ज्या विशिष्ट तऱ्हेनें मान हालविली त्यावरून त्यांना कोरेलचें म्हणणें अजिबात पटत नसल्याचें दिसलें. तरी पण त्यांनीं सेंट्रीला हाक मारून जवळ बोलाविलें आणि सांगितलें, " मेयर ऑर्डेन आणि डॉक्टर विंटर ह्या दोघांनाही अटक करण्यांत आलेली आहे. मेयरसाहेबांच्यावर चांगलं लक्ष ठेव आणि डॉक्टर विंटरना तावडतोब इकडे घेऊन येण्याबद्दल सार्जंटला सांग. " आणि मग कोरेलकडे वळून ते म्हणाले, " मि. कोरेल, ह्या एकंदर घटनेबद्दल सर्वस्वीं तुम्ही जबाबदार आहांत ! लक्षांत ठेवा. "

# ८

मेयरसाहेबांना अटक झाल्याची वार्ता वाऱ्याच्या वेगानें गांवांत पसरली. दारांच्या फटींतून हलक्या आवाजांत कुजबुजून किंवा नुसत्या अर्थपूर्ण सांकेतिक नजरेनें प्रत्येकजण ती वार्ता दुसऱ्याला कळवूं लागला. रेशनिंगच्या दुकानात धान्य विकत आणायला गेलेले लोक तेथल्या कारकुनांच्या कानांशीं लागून त्यांना मेयरना अटक केल्याचें हळूच सांगत, आणि अशा रीतीनें ती बातमी हां हां म्हणतां गांवभर पसरली.

त्या वार्तेनें लोकांच्या मनाला धक्का बसला. तरी पण त्यांच्या अंतःकरणांत उसळलेला एक प्रकारचा विचित्र आसुरी आनंद कायमच होता. शत्रूशीं गनिमी काव्यानें लढून त्याला हैराण करण्यासाठीं आतां असंख्य छोटे छोटे सुरुंग त्यांच्या हातीं आलेले होते आणि ते कितपत काम देतात ह्याचाही त्यांनीं प्रत्यक्ष अनुभव घेतलेला होता. हेंच त्यांच्या आनंदाचें कारण होतें. आज त्यांचीं अंतःकरणें नव्या उत्साहानें, उल्हासानें भारून, भरून गेलीं होतीं.

मुलें सुद्धां आतां सावधगिरीनें वागूं लागलीं होतीं. बर्फांत खेळतां खेळतां त्यांना कोठें एकादा डायनामाइट सापडला कीं त्याच्या भोवतींच्या पॅकेटमधलें चॉकोलेट खाऊन, तो लगेच बर्फांत पुरून ठेवून त्याची वार्ता ते आपल्या आईबापांना दक्षतेनें देऊं लागले.

गांवाबाहेर सहज एका इसमाला एक डायनामाइटची नळी सापडली. त्यानें सूचना वाचल्या. ती नळी बर्फांत उभी केली आणि तिचा फ्यूज पेटवून तो धावत जाऊन साठ अंक मोजीत दूर उभा राहिला. पण त्यानें भराभर अंक मोजल्यामुळें अडसष्टाव्या अंकाच्या वेळीं स्फोट झाला !

'काम देणारे सुरुंग आहेत हे!' असें म्हणून मोठ्या उत्साहानें तो लगेच आणखी नळ्या शोधून काढण्याच्या उद्योगाला लागला.

स्फोटाचा आवाज कानीं पडतांच इशारा दिल्याप्रमाणें सारे लोक भराभर घरीं जाऊन दारें बंद करून बसले. सर्व रस्ते ओसाड दिसूं लागले. तिकडे खाणीवरले पहारेकरी शिपाई प्रत्येक खाणकामगाराची अंग-झडती घेऊं लागले. पण कोणाजवळच डायनामाइट न सांपडल्यामुळें चिडून जाऊन अखेर त्यांनीं कामगारांना शिवीगाळ सुरू केली. तरी पण कामगारांनीं आपली शांत वृत्ति ढळूं दिली नाहीं. त्या शिपायांकडे फक्त एकदा थंड निर्विकार नजरेनें पाहून ते आपल्या कामाला लागले. त्यांच्या त्या नजरेंत प्रच्छन्न आनंदाची तेजस्वी छटा मात्र संपूर्णपणें तरंगत होती.

मेयरसाहेबांच्या वाड्यांत, दिवाणखान्यांतलें टेबल साफसूफ केलेलें दिसत होतें. मेयरसाहेबांच्या खोलीपाशीं एक सशस्त्र सैनिक पहारेकरी उभा होता. ॲनी शेगडींत कोळसे घालीत होती. तिनें त्या पहारेकऱ्याला चिडक्या स्वरांत दरडावून विचारलें, " काय रे, तुम्ही आतां ह्यांचं काय करणार आहांत ? "

पहारेकऱ्यानें कांहींच उत्तर दिलें नाहीं.

तितक्यांत बाहेरचा दरवाजा खाडकन् उघडला गेला आणि एका शिपायानें डॉ. विंटरना दंडाला धरून आंत आणून सोडलें आणि दरवाजा पुन्हा बंद करून तो तेथेंच समोर उभा राहिला.

डॉ. विंटरनीं ॲनीला विचारलें, " मेयरसाहेबांची काय हालहवाल आहे ? त्यांची तब्येत वगैरे ठीक आहे ना ? "

" ठीकच आहे म्हणायची. पण मी त्यांना तुम्ही आल्याचं कळवतें हं. " असें बोलून कांहींशा हुकुमी आवाजांतच ॲनी पहारेकऱ्याला म्हणाली, " डॉक्टर विंटर आले आहेत म्हणून मेयरसाहेबांना कळव ... ऐकूं आलं कीं नाहीं ? "

पहारेकरी जागचा हालला नाहीं. तो कांहीं बोललाही नाहीं. पण तितक्यांत

बेडरूमचें दार उघडून खुद्द मेयरसाहेबच त्या पहारेकऱ्याकडे ढुंकूनही न पाहातां तसेच थेट दिवाणखान्यांत आले. पहारेकऱ्यानें थोडीशी हालचाल केली पण मग लगेच मुकाट्यानें तो आपल्या जाग्यावर जाऊन उभा राहिला.

मेयरसाहेब ॲनीला म्हणाले, " थँक्यू ॲनी ! तूं इथेंच जवळपास राहा. कदाचित् तुझी मला जरूर लागेल. "

" बरं साहेब, " असें म्हणून ॲनीनें विचारलें, " बाईसाहेब ठीक आहेत ना ? "

" हो–हो. त्यांची वेणीफणी चालली आहे. तुला भेटायचं आहे त्यांना ? "

" होय साहेब ! " असें म्हणून ॲनी त्या पहारेवाल्याकडे रागानें पाहात पाहात बेडरूममध्यें गेली आणि तिनें दार बंद करून घेतलें.

" कसं काय डॉक्टर ! ह्यावेळीं तूं इकडे कोणीकडे ? " मेयरनीं विचारलें.

त्यावर बाहेरच्या दाराजवळ उभ्या असलेल्या शिपायाकडे बोट दाखवीत हसत हसत डॉक्टर म्हणाले, " ह्या दोस्तानें मला इथें अटक करून आणलं आहे. "

" वाटलंच मला. व्हायचंच होतं हें केव्हां तरी. पण ते आतां पुढें काय करणार आहेत, कळत नाहीं. " मेयर म्हणाले.

नंतर ते दोघे मित्र बराच वेळ एकमेकांकडे फक्त पाहात राहिले. परस्परांचें मनोगत त्यांनीं नुसत्या नजरेनेंच ओळखलें आणि मग बराच वेळ चाललेलें बोलणें पुढें सुरू केल्याप्रमाणें मेयर म्हणाले, " मी मनांत आणलं असतं तरी हे प्रकार थांबवणं मला शक्यच नव्हतं . . . "

" हें मला कळतंय् पण शत्रूला मात्र कळत नाहीं. " डॉ. विंटर म्हणाले, " प्रत्येक काम अगदीं वेळच्या वेळीं आणि तेंही योग्य वेळींच करायचं असा जेत्यांचा दंडक आहे. पण आतां मात्र त्यांची वेळ भरत आली आहे. एकाच पुढाऱ्याच्या हुकमतीखालीं साऱ्या लोकांनीं नांदायचं, एकाच हुकूमशहाच्या इच्छेवर साऱ्या देशाचं भवितव्य टांगून ठेवायचं, अशी त्यांच्या देशांतली पद्धत आहे. त्यामुळें इतर देशांतले लोकही आपल्यासारखेच

असतील असं त्यांना वाटतं. आमच्याविषयींही त्यांनीं अशीच खुळी कल्पना करून घेतलेली दिसते. दहा-पांच पुढाऱ्यांचीं डोकीं उडवलीं कीं काम भागेल असं त्यांना वाटत असावं. पण आम्ही स्वतंत्र लोक आहोंत. आमच्यापैकीं प्रत्येकजण पुढारीच आहे. आमच्यांत आपोआपच शेकडों पुढारी संकट-प्रसंगीं निर्माण होतात आणि आपल्या देशाचं भवितव्य ठरवितात. पण ह्या गोष्टीची कल्पना शत्रूला कोठून असणार ? ”

मेयरनीं डॉक्टरांच्या खांद्यावर हात ठेवून म्हटलें, “ डॉक्टर, कसं अगदीं माझ्या मनांतलं बोललास तूं ! आम्ही गरीब असलों तरी स्वाभिमानी आहोंत. परक्यांच्या सत्तेखालीं मुकाट्यानें मान वाकवून ताबेदारीचं लाचार जिणं जगण्याची आम्हांला कधीं संवयच नाहीं ... ”

“ खात्रीनें नाहीं. आज आम्ही निःशस्त्र, दुर्बल असलों तरी बाहेरच्या जगाची मदत मिळवून सबळ होऊं ... ”

पुन्हा दोघे स्तब्ध राहिले. नंतर जराशानें मेयर म्हणाले, “ डॉक्टर, तुझ्याशीं आज खूपखूप बोलावसं वाटतंय् मला. पुन्हा कधीं असं मोकळ्या मनानें आपणांला बोलायला मिळेलसं वाटत नाहीं ... मनांत किती तरी क्षुद्र विचार येताहेत ... ” बोलतां बोलतां त्यांनीं मध्येंच खाकरून आपल्या बोलण्याकडे पहारेकऱ्याचें लक्ष आहे कीं काय तें पाहाण्यासाठीं त्याच्याकडे नजर टाकली. पण त्या पहारेकऱ्यानें आपण कांहींच ऐकत नसल्याचें दर्शविलें. मेयर पुढें बोलूं लागले, “ डॉक्टर, मरणासंबंधींचे विचार माझ्या मनांत चालले आहेत ... नेहमींच्या शिरस्त्याप्रमाणें शत्रू आपणां दोघांनाही ठार करणार ह्यांत शंका नाहीं. तुला काय वाटतं ? ”

“ खरं आहे तुझं म्हणणं. ” असें म्हणत डॉक्टर एका खुर्चीवर बसण्यासाठीं गेले. पण त्या खुर्चीचें आच्छादन फाटलेलें दिसलें त्यांना. म्हणून तिला थोपटीत—जणूं त्या थोपटण्यानें तें तिचें फाटकें आच्छादन धड होणार होतें—तिच्यावर ते हलकेच बसले.

मेयर बोलूं लागले, " डॉक्टर, तुला म्हणून सांगतों ... मनांतून घाबरलोंय् मी ... जीव वांचविण्यासाठीं मनांत किती तरी विचार येऊन जातात. एकदा वाटतं, कुठें तरी पळून जाऊन परागंदा व्हावं ... एकदा वाटतं, शत्रूला शरण जाऊन जीवदान मागावं, ... येन केन प्रकारेण मरण टाळावं! पण पुन्हा ह्या भ्याड नि नामर्द विचारांची माझी मलाच मोठी शरम वाटते. "

" पण तूं असं कांहीं अजून केलंस नाहींस ना ? "

" केलं नाहीं आणि करणारही नाहीं! मरण चुकविण्यासाठीं मी कोणताही वाममार्ग कालत्रयीं पत्करणार नाहीं! "

" मग झालं तर! "

" पण असले भ्याड, नेभळे विचार माझ्या मनांत यावेतच कां, ह्याचंच मला राहून राहून आश्चर्य वाटतंय्. "

" ह्यांत आश्चर्य कसलं ? आपला मृत्यु समोर दिसूं लागल्यावर असले विचार कुणाच्याही मनांत येणं अगदीं स्वाभाविक आहे. अरे, माझ्याही मनांत असले विचार आले नसतील असं का तुला वाटतं ? "

मेयरसाहेब आपल्याच विचारांच्या तंद्रींत होते. ते म्हणाले, " डॉक्टर, मी एक क्षुद्र सामान्य माणूस आहें. पण मला वाटतं, सामान्य व्यक्तीच्याही मनांत चैतन्याचा असा एक स्फुल्लिंग असतो कीं प्रसंगविशेषीं त्या स्फुल्लिंगांतून एकादी ज्वाला निर्माण व्हायला फारसा विलंब लागत नाहीं. माझीच गोष्ट घे — भोवतालच्या परिस्थितीनें गांगरून जाऊन स्वतःचे प्राण कसे वांचवावेत ह्याचा मी विचार करूं लागतांच अनेक प्रकारचे बरे वाईट, उलट सुलट विचार माझ्या मनांत उसळले. पण आतां त्या विचारांचं वादळ नष्ट होऊन वेगळ्याच उदात्त विचारांनीं माझं मन उन्नत झाल्यासारखं मला वाटत आहे. माझे ह्यावेळीं कोणते विचार चाललेले असतील असं तुला वाटतंय् ? ... डॉक्टर, तुला आठवतंय् ? शाळेंत शिकत असतांना आपण सॉक्रेटिसची ' ॲपोलजी ' वाचली होती. त्यांत सॉक्रेटिस एका ठिकाणीं म्हणतो, ' निष्कारण अकालीं मरण ओढून आणणारं हें विक्षिप्तपणाचं विचित्र जीवन

जगण्याची तुला खंत कशी वाटत नाहीं ?' असं जर मला कुणीं विचारलं तर मी त्याला साफ सडेतोड उत्तर देईन कीं, 'भल्या गृहस्था ! तूं चुकतो आहेस. कोणत्याही सरळमार्गी सज्जनानें स्वतःच्या जगण्यामरण्याची चिंता करूं नये. त्यानें फक्त एवढाच विचार करावा कीं, आपण जें करतों तें चांगलें आहे कीं वाईट आहे, लोकांच्या हिताचं आहे कीं अहिताचं आहे ? ...' आठवतं ना तुला ?"

"हो - हो, न आठवायला काय झालं ? हें तर आठवतंच पण आपल्या विद्यार्थी-जीवनांतल्या आणखी किती तरी गंमतीच्या गोष्टी मला आठवतात." डॉक्टर म्हणाले.

"तुझ्याइतकी माझी स्मरणशक्ति तीव्र नाहीं बुवा !" मेयर म्हणाले.

"होती कधीं ती तीव्र ? आठवणीचा खंदक तूं ! तूं मोठा स्कॉलर होतास कुठें ? पाठांतरांत सुद्धां हजार चुका तुझ्या ..."

"तुला आठवतंय् ? एकदा स्कूलबोर्डाच्या मेंबरांसमोर हेंच सॉक्रेटिसचं भाषण पाठ म्हणून दाखविण्याचा कार्यक्रम होता. मला कांहीं तें भाषण बिनचूक तोंडपाठ येत नव्हतं ... मी ओळीच्या ओळी चुकूं लागलों ... शब्दही गाळूं लागलों ..."

"आणि त्यावेळीं तूं इतका भांबावून गेलास कीं तुझ्या शर्टची मागली बाजू विजारीबाहेर लोंबत होती हें देखील तुझ्या ध्यानांत आलं नाहीं."

मेयर स्वतःशींच हसले आणि हळूच हात मागें नेऊन आतांही आपला शर्ट विजारीबाहेर लोंबतोय् कीं काय तें चाचपून पाहूं लागले. जराशानें ते म्हणाले, "सॉक्रेटिसच्या भूमिकेंत जोरजोरानें कोकलून मी त्या बोर्डाच्या मेंबरांचा सडकून धिक्कारच केला जणूं ... त्यांचे चेहेरे कसे लालभडक झाले होते !"

"अरे, पण ते संतापानें नव्हे तर हसूं दाबण्यासाठीं त्यांनीं आपला श्वास रोखून धरला होता म्हणून ! तुझा तो अजागळ अवतार नि बावळा आवेश पाहून त्यांना सारख्या हसण्याच्या उकळ्या फुटत होत्या ..."

" चाळीस वर्षांपूर्वीच्या ह्या गोड आठवणी ! "

" चाळीस नव्हे ! सेहेचाळीस ! "

इकडे ह्या दोघांचें बोलणें सुरू असतांच तिकडे बेडरूमजवळचा पहारेकरी हळूच बाहेरील दारावरच्या पहारेकऱ्यापाशीं गेला आणि शाळेंतलीं पोरें कुजबुजल्याप्रमाणें खाजगी घरगुती बाबतींत हलक्या आवाजांत गप्पागोष्टी करूं लागला.

मेयरनीं पुन्हा वर छताकडे पाहून सॉक्रेटिसचें भाषण आठवण्याचा प्रयत्न करीत डॉक्टरना विचारलें, " पुढें काय रे ? "

डॉक्टरनीं त्यांना सुचविलें, " मला देहान्त शासन देणाऱ्यांनों ... "

इतक्यांत कर्नल लान्सर तेथें सावकाशपणें आले. पहारेकरी शिस्तींत उभे राहिले. डॉक्टरांचे शब्द ऐकून ते दारांतच थबकले.

मेयर म्हणाले, " हां बरोबर ! आतां आठवलं मला सगळं. सॉक्रेटिस म्हणतो, ' मला—एका निरपराधी माणसाला देहान्ताची सजा फर्मावणाऱ्या जुलमी अधिकाऱ्यांनों ! मी तर आतां मरणारच आहें. माझं भवितव्य निश्चितच झालेलं आहे. पण तुमचंही भवितव्य ह्याच वेळीं मी तुम्हांला सांगून ठेवतों. माझं हें भाकित खास चुकणार नाहीं. कारण, मरणोन्मुख माणसाला भविष्य-कालाच्या ज्ञानाची देणगी अंतकाळीं निसर्गतःच लाभत असते ! ऐका तुमचं भवितव्य ! माझ्या मृत्यूनंतर लवकरच' ... "

" हां—हां ! मृत्यूनंतर नव्हे, निर्याणानंतर ! " डॉ. विंटर मध्येंच म्हणाले, " सॉक्रेटिसनें तिथें मृत्यू –death– असा शब्द वापरलेला नाहीं. निर्याण –departure– असाच अत्यंत मार्मिक सार्थ शब्द घातलेला आहे. "

" अहो डॉक्टरसाहेब ! ' डिपार्चर ' नव्हे—' डेथ 'च ! "

" अहो मेयरसाहेब ! ' डेथ ' नव्हे—' डिपार्चर 'च ! "

त्या दोघा बाळमित्रांचा असा प्रेमळ संवाद चालू असतांनाच कर्नल लान्सरनीं हलक्या पावलांनीं दिवाणखान्यांत हळूच प्रवेश केला. त्यांनीं आपल्या

आगमनाची चाहूल लागूं दिली नाहीं. आणि त्या दोघांनीही त्याची दखल घेतली नाहीं.

मेयर म्हणाले, " बरं तर बुवा निर्याणानंतर! ' माझ्या निर्याणानंतर माझ्यापेक्षांही भयंकर भवितव्य लवकरच तुम्हां सर्वांच्या वांट्याला येणार आहे. ' " —आणि मग साक्षात् सॉक्रेटिसच न्यायासनासमोर उभा राहून निर्भयपणानें अधिकाऱ्यांना उद्देशून भाषण करीत आहे, अशा आविर्भावानें हातवारे करीत मेयरसाहेब आवेशानें बोलूं लागले, " ' जुलुमी अधिकाऱ्यांनो! लक्षांत ठेवा. तुम्हांला तुमच्या दुष्कृत्यांचीं कडू फळं चाखावींच लागणार आहेत. तुमच्या पापी चारित्र्याचीं ओंगळ लक्तरं मी चवाठ्यावर मांडलीं, वरवरच्या सोज्वळ संभावितपणाखालीं दडलेलं तुमच्या दुष्ट राक्षसी वृत्तीचं हिडीस स्वरूप मी निधड्या छातीनें जगापुढं उजेडांत आणलं म्हणून तुम्ही मला दोषी ठरवून आज अशी खुनशीपणानें देहान्ताची शिक्षा दिलीत! तुम्हांला वाटत असेल कीं माझी वाट लावल्यानंतर तुमच्या पापांचा जाब विचारणारा जगांत दुसरा कुणी पुढें येणार नाहीं. पण हा तुमचा भ्रम आहे. हजारों तरुण माझ्या मृत्यूचा सूड तुमच्यावर उगवून घेतील. त्या तरुणांना काबूंत ठेवून आत्तापर्यंत मीं त्यांचा उत्साह थोपवून धरलेला आहे. पण तो त्यांच्या उत्साहाचा थोपविलेला प्रवाह विवेकाचे बांध फोडून आवेगानें उसळणार आणि दुप्पट वेगानें वाहूं लागणार! ते तरुण आहेत म्हणूनच उतावीळ, अविचारी आहेत. ते तुमचा अखेरपर्यंत पिच्छा पुरवून तुम्हांला ' दे माय धरणी ठाय ' करून सोडल्याखेरीज राहाणार नाहींत. तुमचे पाशवी अत्याचार ते लोक आतां फार दिवस चालूं देणार नाहींत '... " एवढें बोलून मेयरसाहेब किंचित् थांबले नि म्हणाले, " इतकंच भाषण आठवतंय् मला ... पुढचं विसरून गेलोंय् ... "

" तरी बरंच आठवलं तुला. सेहेचाळीस वर्षांपूर्वी इतकं दिखील तूं तोंडपाठ म्हणूं शकत नव्हतास. "

" पुढें काय बरं? " मेयरसाहेब पुढचें भाषण आठवूं लागले तोंच एकदम

कर्नलसाहेब कडाडले, " मेयरसाहेब, हें काय मांडलंय् तुम्ही ? असलं भाषण ... "

" मी बोलत नाहीं ... सॉक्रेटिस बोलतो आहे ! " मेयर स्मितपूर्वक मध्येंच म्हणाले.

" बंद करा ही बडबड. " कर्नल हुकुमी स्वरांत गरजले.

इतक्यांत धावऱ्या धावऱ्या येऊन लेफ्टनंट प्रॅकल सांगूं लागला, " कर्नलसाहेब, डायनामाइट जवळ बाळगणारे बरेच लोक सापडले आहेत. "

" तुम्ही त्यांना अटक केलीत ना ? "

" होय तर ! "

" त्यांच्यावर सक्त देखरेख ठेवायला सांगा कॅप्टन लॉफटना — " इतक्यांत लांबून स्फोटाचा आवाज ऐकूं आला. प्रॅकल घाईघाईनें निघून गेला. कर्नल मेयरकडे वळून म्हणाले, " असल्या गोष्टी ह्यापुढें चालायच्या नाहींत. "

" तें कसं शक्य आहे ? "

" इथल्या लोकांच्या चांगल्या वर्तणुकीबद्दल जामीन म्हणून मीं तुम्हांला अटक केलेली आहे. "

" तें ठीक आहे. पण ... "

" गांवांत कांहीं अत्याचार झाले तर त्याबद्दल तुम्हांला तुमच्या प्राणाचं मोल द्यावं लागेल ! "

" होय. पण तरी सुद्धा हे प्रकार आतां थांबणार नाहींत ! तुम्हांला ठाऊक नाहीं कर्नलसाहेब. आपल्या कार्यांत माझा अडथळा होतोय् असं जर लोकांना आढळून आलं, तर ते माझी पर्वा न करतां आपलं कार्य तसंच नेटानें पुढें चालू ठेवतील ... "

" पण समजा, आपण फ्यूज पुन्हा पेटवला तर मेयरना तत्काळ गोळी घातली जाईल असं जर लोकांना कळलं तर ते काय करतील ? "

" मला वाटतं ते फ्यूज पेटवतील ! " हताशपणें डॉ. विंटरकडे बघत मेयर म्हणाले. तितक्यांत बेडरूममधून बाईसाहेब बाहेर आल्या आणि एक सोन्याची

साखळी मेयरसाहेबांच्या हातांत देत म्हणाल्या, “ हें घ्या तुमचं मेयरपदाचं अधिकार–चिन्ह ! हें सुद्धा कसं जिथें तिथें विसरतां ? बिछान्यांत पडलं होतं . . .”

मेयरसाहेबांनीं स्मितपूर्वक कृतज्ञतेच्या नजरेनें आपल्या पत्नीकडे पाहून ती साखळी गळ्यांत घातली. आणि मग कर्नलकडे वळून म्हटलें, “ समजलं कर्नलसाहेब ? लोक फ्यूज पेटवतील ! ”

“ पण समजा, पेटवूं नका असं तुम्हीं सांगितलं तरी देखील ? ”

“ हो–हो ! मी नको म्हटलं तरी ते खुशाल माझ्या डोळ्यांदेखत फ्यूजला काडी लावतील ! . . . कर्नलसाहेब माझं जगणं मरणं आतां माझ्या इच्छेवर नव्हे तर सर्वस्वीं तुमच्या मर्जीवर अवलंबून आहे. परंतु मी कोणत्या प्रकारचं मरण पत्करायचं हें ठरविण्याचा पूर्ण हक्क मात्र मलाच आहे . . . तुम्ही लढूं नका असं मी लोकांना सांगितलं तर त्यांना फारच वाईट वाटेल. पण ते लढायचे मात्र थांबणार नाहींत. उलट, मी त्यांना लढायला प्रोत्साहन दिलं तर मात्र त्यांना मनापासून आनंद होईल. आणि प्राप्त परिस्थितींत लोकांना लढ्याचा आदेश देण्यांत मलाही धन्यताच वाटेल . . . मी स्वतः जरी फारसा शूर नसलों तरी लोकांना थोडं तरी जास्त शूर बनविल्याचं मला समाधान लाभेल . . . आणि एर्वीतेवीं माझं मरण जर टळणारच नाहीं तर मग मरतां मरतां सहजासहजीं लाभणारं हें समाधान तरी मीं कां दूर लोटावं ? माझ्या लोकांना स्वातंत्र्ययुद्धांत प्रोत्साहन दिल्याचं श्रेय तरी मीं कां गमावावं ? ”

“ पण तुमच्याविषयीं भलभलते गैरसमज लोकांत पसरवून तुमच्या शब्दाला कुणी कवडीचीही किंमत देणार नाहीं अशी परिस्थिति आम्ही निर्माण करूं. तुम्ही आमच्याजवळ गयावया करून आपल्या प्राणांची भीक मागितलीत, तुम्ही आम्हांला सामील झालांत, अशीही कंडी आम्ही उठवूं. ”

“ पण तुमच्या असल्या कंड्यांवर विश्वास ठेवण्याइतके आमचे लोक मूर्ख नाहींत, समजलांत ? ”

डॉ. विंटर मध्येंच बोलूं लागले, “ शिवाय, तुमच्या खोट्या प्रचाराचं तंत्र आतां साऱ्या जगाला ठाऊक झालेलं आहे. तुम्हां लोकांना तुमची

स्वतःचीं रहस्यं सुद्धां धडपणें सांभाळतां येत नाहींत. तुमचाच एक सैनिक एके दिवशीं रात्रीं दारू पिऊन बरळत होता कीं, माशांनीं चिकटपट्टी जिंकून त्यांतच कायमची समाधि घेतली ! आणि त्याचे आत्मविटंबनेचे शब्द आतां साऱ्या जगाच्या जिभेवर नाचताहेत ! लोकांनीं तर त्यावरून एक गाणंच रचलं आहे —

> ' चिकटपट्टिला अम्ही जिंकलें '
> म्हणती गर्वानें माशा
> फुकटच मरती त्यांत अडकुनी
> गुंडाळुनि अपुला गाशा !

असें म्हणून डॉक्टर हसूं लागले. कर्नलनीं डॉक्टरांच्याकडे जळफळती दृष्टी फेकली.

तोंच खाणीच्या बाजूनें कर्कश शिटी वाजल्याचा आणि त्याच्याच पाठोपाठ एक प्रचंड स्फोट झाल्याचा आवाज ऐकूं आला. लगेच मेयर म्हणाले,

" पाहिलंत कर्नल ? हें आतां असंच चालणार ! तुम्ही कितीही प्रयत्न केलात तरी ही परिस्थिति आतां निवळणार नाहीं. तुमचा सर्वनाश होऊन तुम्हांला हा गांव सोडून जावं लागणार हें निश्चित. जिताचं जिणं जगण्यांत जनतेला मरणप्राय दुःख होतं आणि म्हणूनच जनता अखंड अजिंक्यच राहाते ! स्वतंत्र माणसं आपण होऊन युद्धाचा वणवा कधींच पेटवीत नाहींत, पण एकदा तो पेटलाच तर मग मात्र प्राणांतींही माघार घेत नाहींत. पराभव झाला तरी ते तसेच मरेपर्यंत लढत राहातात. एकाच पुढाऱ्याच्या मागून मेंढरांप्रमाणें धावणाऱ्या लोकांना मात्र हें कधींही साधायचं नाहीं. आणि म्हणूनच परप्रत्ययनेयबुद्धीचे लोक छोट्या मोठ्या चकमकींत तेवढे यशस्वी होतात आणि अखेर महायुद्ध मात्र स्वतंत्र लोकच नेहमीं जिंकतात ! तुमच्यासारख्या मेंढरांच्या वृत्तीच्या लोकांना जागतिक महायुद्ध जिंकतां येणंच शक्य नाहीं. ह्याचं प्रत्यंतर तुम्हांला लवकरच येईल ... "

पण मेयरसाहेबांच्या ह्या बोलण्याचा कर्नलसाहेबांच्या मनावर कांहींच

वा: वा
९९३
३१/३/८९

परिणाम झाला नाहीं, ते जास्तच ताठरपणानें निश्चयी स्वरांत म्हणाले,

“ अधिक बडबड नको आहे. माझा हुकूम स्पष्ट आहे. मी अकरा वाजण्याची मुदत दिली होती. ती आतां संपत आली आहे. गांवांत आतां ह्यापुढें कुठेंही अत्याचार घडून आला तर ओलीस ठेवून घेतलेल्या लोकांना तत्काळ देहान्त प्रायश्चित्त भोगावं लागणार ! ”

“ पण हें सगळं निष्फळ ठरणार हें ठाऊक असूनही तुम्ही आपल्या हुकुमाची अंमलबजावणी करणार ? ” डॉ. विंटरनीं विचारलें.

“ अलबत् ! पण मेयर, तुम्ही जर लोकांना उद्देशून, मी सांगतों तशी जाहीर घोषणा केलीत तर अनेकांचे प्राण वांचविल्याचं श्रेय तुम्हांला मिळाल्यावांचून राहाणार नाहीं. अजून वेळ गेलेली नाहीं . . . ”

“ हा सगळा काय प्रकार चाललाय् ? ” बाईसाहेबांनीं संत्रस्त मुद्रेनें मध्येंच विचारलें.

“ खुळेपणाचा बाजार ! ”

“ पण मेयरला अटक होऊं शकत नाहीं. ” बाईसाहेब म्हणाल्या. त्यावर मेयर किंचित् हसून बोलले,

“ खरंच नाहीं. मेयरपदाची कल्पना स्वतंत्र लोकांची आहे . . . ”

पण मेयरसाहेबांचें बोलणें संपलें नाहीं तोंच दूर अंतरावर एक भयंकर स्फोट होऊन त्याचा प्रतिध्वनि सभोंवारच्या टेकड्यांना थडकून सर्वत्र घुमला !

“ कसला आवाज हा ? ” बाईसाहेबांनीं घाबरून विचारलें.

“ हा मेयरसाहेबांच्या अटकेचा प्रतिध्वनि ! ” डॉ. विंटर म्हणाले. तोंच पुन्हा खाणींतल्या भोंग्यानें कर्णकर्कशपणें किंचाळायला सुरुवात केली. आणि पुन्हा प्रचंड स्फोटांचे कानठळ्या बसविणारे धाड धाड आवाज ऐकूं येऊं लागले. मेयरसाहेब क्षणभर स्तब्ध राहिले आणि मग त्यांच्या मुद्रेवर समाधानाचें स्मित झळकलें. त्यांनीं एकदा आपल्या खिशांतल्या घड्याळाकडे पाहिलें आणि

नंतर तें घड्याळ आणि गळ्यांतली साखळी काढून डॉक्टर विंटरच्या हातीं देत म्हटलें, " डॉक्टर, सांभाळा हें ! ... पण माश्यांची काय हकीकत आहे ? "

" माश्यांनीं चिकटपट्टीचा पूर्णपणें कब्जा घेतला आहे ! "

" म्हणजे आतां त्या माश्या चिकटपट्टींत कायमच्या अडकून फुकट मरणार ! " मेयर म्हणाले.

इतक्यांत पुन्हा जवळपास स्फोट झाल्याचा आवाज ऐकूं आला. आणि बाहेरचें दार उघडून घाईघाईनें प्रॅकल आंत आला. कर्नलसाहेबांच्या नजरेच्या इषाऱ्यावरून त्यानें मेयरना चलण्याविषयीं सूचना दिली.

मेयरनीं आपल्या पत्नीच्या कपाळाचें चुंबन घेऊन ॲनीला हाक मारली. ॲनी धांवतच बेडरूममधून बाहेर आली. तिला मेयरनीं विचारलें, " काय ग, तूं सारं चोरून ऐकत होतीस वाटतं ? "

" ना-नाहीं ... हो-होय साहेब ! " ॲनी घुटमळत म्हणाली. मेयरनीं तिला बजावलें,

" तुझ्या बाईसाहेबांना सांभाळ ! त्यांना एकटं टाकून कुठें जाऊं नकोस ! " आणि मग डॉक्टर विंटरकडे वळून ते म्हणाले, " क्रीतो, ॲस्क्लिपियसला मी एक कोंबडा देणं आहे. माझं हें ऋण तूं फेडशील ना ? " उत्तर देण्यापूर्वी डॉ. विंटरनीं क्षणभर डोळे मिटले आणि मग ते म्हणाले, " अवश्य ! अवश्य ! तुझं ऋण फेडलं जाईल ! "

मेयरनीं प्रॅकलच्या खांद्यावर हात ठेवतांच प्रॅकलनें आपलें अंग चोरलें. मेयर आपल्या पत्नीकडे वळून म्हणाले, " अच्छा ! आम्ही चाललों... "

" पण कुठें ? " ॲनीनें आणि त्यांच्या पत्नीनें एकदम आर्त स्वरांत विचारलें.

" मायभूमीचं ऋण फेडायला ! "

असें म्हणून मेयर ऑर्डेन गंभीर मुद्रेनें लेफ्टनंट प्रॅकलबरोबर बाहेर पडले.

IRBK-0103152

IRBK-0103152